**महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५.**

**महाराष्ट्र शासन**

**शासन निर्णय क्र.मऔधो-२०२३/प्र.क्र.१८७/उद्योग-२**

**उद्योग,ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : ३१ डिसेंबर, २०२५

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र हे भारताच्या प्रगतीचे नेतृत्त्व करणारे राज्य असून, देशाच्या आर्थिक परिप्रेक्ष्यात एक प्रमुख निर्णायक शक्ती आहे. राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादनात (GDP) महाराष्ट्राचा वाटा १३.६% पेक्षा अधिक असून राज्याने २०३० पर्यंत ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्था बनण्याचा निर्धार केलेला आहे. आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राचा वाटा २५% आहे तर सेवा क्षेत्राचा वाटा ६४% आहे. राज्याचा प्रगत उत्पादन, हरित तंत्रज्ञान आणि शाश्वत पद्धतींवर असलेला रणनितीक भर औद्योगिक नवोन्मेषातील राज्याची बांधीलकी दर्शवितो. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये देशातील थेट परकीय गुंतवणुकीत (FDI) महाराष्ट्राचा सर्वाधिक सुमारे ३१% वाटा असून, महाराष्ट्राची गतिमान आणि गुंतवणूकदार-अनुकूल आर्थिक परिस्थिती दर्शवितो, जो औद्योगिक विकास आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देणाऱ्या रणनितीक धोरणांमुळे मजबूत झाला आहे. पायाभूत सुविधा विकास हा महाराष्ट्राच्या आर्थिक यशाचा एक प्रमुख सक्षमकर्ता आहे.

राज्याचे सेवा क्षेत्र हे अर्थव्यवस्थेला चालना देणारे स्त्रोत आहे. सेवाक्षेत्राच्या वाढीत महत्त्वाचे योगदान देणाऱ्या व्यापार, हॉटेल्स, परिवहन, संप्रेषण आणि प्रसारणासंबधीत सेवा यांसारख्या प्रमुख उप-क्षेत्रांनी भक्कम कामगिरी दर्शविली आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे प्राबल्य राज्याचे शहरी व औद्योगिक वैशिष्ट्य आधोरेखित करते. मुंबई व पुणे ही प्रमुख सेवा केंद्रे म्हणून कार्यरत असून त्यातून निर्माण होणाऱ्या सकारात्मक परिणामांचा लाभ राज्यातील टियर-२ व टियर-३ शहरांपर्यंत पोहचत आहेत.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने (MEAC) राज्याला ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्था बनविण्यासाठी महत्त्वाकांक्षी आराखडा सादर केला आहे. परिषदेने उत्पादन क्षेत्राला या वाढीचा निर्णायक चालना देणारा घटक मानले असून, विद्यमान उद्योगांचा विस्तार व निवडक महत्त्वाच्या क्षेत्रांत नवीन उद्योगांना आकर्षित करून राज्याच्या सकल देशांतर्गत उत्पादनातील त्याचा वाटा लक्षणीयरीत्या वाढवण्याचे ध्येय आहे. औद्योगिक धोरण-२०१९ मुळे अनुकूल व्यवसाय वातावरण निर्माण करून, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) प्रोत्साहन देऊन आणि सर्वसमावेशक, प्रादेशिकदृष्ट्या संतुलित आणि पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत विकासाला प्रोत्साहन देऊन औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्राने अग्रगण्य स्थान राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. वेगाने विकसित होत असलेले जागतिक आर्थिक परिदृश्य आणि तांत्रिक प्रगती ओळखून, राज्य या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी, विद्यमान ताकदींवर भर देण्यासाठी आणि जागतिक बाजारपेठेत महाराष्ट्राची स्पर्धात्मकता राखून नाविन्यपूर्ण उपाययोजना सादर करण्यासाठी एक नवीन उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण तयार करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे नवीन उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण पुढील दशकासाठी एक परिवर्तनाचा मार्ग दर्शविते. या धोरणाचे उद्दीष्ट महाराष्ट्राला एक प्रमुख जागतिक व्यवसाय गंतव्यस्थान (Global Business Destination) म्हणून प्रस्थापित करणे असून भरीव गुंतवणूक आकर्षित करणे, नवोन्मेषाला चालना देणे व तंत्रज्ञानाचा अवलंब वाढवणे हा या धोरणाचा उद्देश आहे. या धोरणात प्रामुख्याने प्रगत उत्पादन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे, पायाभूत सुविधांचा विकास वाढवणे, शाश्वत व हरित उत्पादन पध्दतींना चालना देणे तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) क्षेत्राला बळकटी देणे यांचा समावेश आहे. व्यवसाय सुलभता वाढवून, एकल खिडकी प्रणाली मजबूत करुन आणि अनुकूल नियामक वातावरण तयार करुन हे धोरण राज्याला अत्याधुनिक उत्पादन व

औद्योगिक विकासासाठी एक अग्रगण्य जागतिक व्यवसाय गंतव्यस्थान म्हणून महाराष्ट्राचे स्थान अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न करते.

नवोन्मेषाला चालना देण्यासाठी आणि राज्याला भारतातील ट्रिलियन-डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करणारे पहिले राज्य बनविण्याकरीता स्मार्ट उत्पादनावर लक्ष केंद्रित करणे, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे, शाश्वतता व स्वावलंबनाला चालना देणे, समावेशक वाढ सुनिश्चित करणे तसेच एक सुलभ व्यवसाय वातावरण निर्माण करून महाराष्ट्राला गुंतवणुकीसाठी एक विश्वासार्ह जागतिक हब बनवणे हा धोरणाचा दृष्टिकोन आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ जाहीर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

विकसित महाराष्ट्र २०४७ साठी क्षमता बांधणीकरीता "इन्व्हेस्ट महाराष्ट्र (Invest Maharashtra)" या एकसंध डिजिटल व्यासपीठाची निर्मिती करणे, त्याद्वारे सर्व क्षेत्रांतील प्रकल्पांना एकत्रित करुन महाराष्ट्रातील गुंतवणूक प्रकल्पांचे सुव्यवस्थित अखंड गुंतवणूक व्यासपीठ विकसित करणे, संतुलित, न्याय्य आणि शाश्वत रोजगार समृद्ध वाढ निर्माण करणे, राज्यभर मूल्यवर्धित औद्योगिकीकरणाला गती देणे, प्रादेशिक विकास आणि दरडोई उत्पन्न वाढीला प्रोत्साहन देणे भांडवल कार्यक्षमता वाढवणे, शाश्वत सुधारणा, क्षेत्रीय स्पर्धात्मकता आणि क्लायमेट-स्मार्ट औद्योगिकीकरणाद्वारे महाराष्ट्राला जागतिक व्यवसाय गंतव्यस्थान म्हणून स्थापित करण्यासाठी, उत्पादन व सेवा क्षेत्रातील प्रकल्पांकरीता वित्तीय तसेच बिगर-वित्तीय प्रोत्साहने, व्यवसाय सुलभता, संस्थात्मक संरचना तसेच केंद्र व राज्य शासनाच्या इतर धोरणांचे व कार्यक्रमांचे अभिसरण करणे या बाबींवर विशेष भर देणे आवश्यक आहे. या सर्व बाबी साकल्याने विचारात घेवून महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ तयार करण्यात आले असून राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ११.१२.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत त्यावर सखोल व सविस्तर चर्चा करुन त्यास मान्यता देण्यात आली आहे. सदर पार्श्वभूमीवर पुढीलप्रमाणे शासनाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१) महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ यास मान्यता देण्यात येत आहे **(मराठी धोरण "परिशिष्ट-१" व इंग्रजी धोरण "परिशिष्ट-२" सोबत जोडले आहे).** सदर धोरणाचा कालावधी ५ वर्षे अथवा नवीन धोरण जाहीर होईपर्यंत वैध असेल.

२) उद्योग विभागाचे नाव बदलून *उद्योग, गुंतवणूक व सेवा विभाग (Industries, Investment and Services Department)* असे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच उद्योग विभागाच्या अधिपत्याखालील उद्योग संचालनालयाचे नाव *उद्योग आयुक्तालय (Commissionerate of Industries)* असे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) 'इनव्हेस्ट महाराष्ट्र' या राज्याच्या धोरणात्मक उपक्रमास कंपनी अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम ८ कंपनी किंवा संस्था म्हणून स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. याकरीता रु. ३,००० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी स्वतंत्र *सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम आयुक्तालय (Commissionerate of MSME)* निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) सेवा आधारित उद्योग आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या विकासाचे मार्गदर्शन करण्यासाठी स्वतंत्र *सेवा आयुक्तालय (Commissionerate of Services)* निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) सदर धोरणाच्या अंमलबजावणीसाठी उत्पादन व सेवा क्षेत्रातील प्रकल्पांच्या प्रोत्साहनांकरीता धोरण कालावधीत रु.१,१८,२७५ कोटी इतक्या अंदाजित खर्चास मान्यता देण्यात येत आहे. तसेच त्याकरीता आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) धोरणात प्रस्तावित प्रोत्साहने ही सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत संबंधित औद्योगिक व सेवा घटकांना अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच प्रचलित सामुहिक प्रोत्साहन योजना-२०१९ यामध्ये धोरणातील तरतुदीनुसार आवश्यक सुधारणा करण्यात येऊन नवीन सामुहिक प्रोत्साहन योजना जाहीर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) राज्यात अतिरिक्त थेट परकीय गुंतवणूक (FDI) आणण्याच्या अनुषंगाने त्यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना (Operational Guidelines) शासन मान्यतेने स्वतंत्ररित्या निर्गमित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**२.** मा. मंत्रिमंडळाने दिलेली मान्यता विचारात घेऊन, या शासन निर्णयातील संबंधित तरतूदींच्या संदर्भात विविध विभागांकडून स्वतंत्रपणे शासन निर्णय/अधिसूचना तातडीने निर्गमित करणे आवश्यक आहे. त्यानुसार संबधित विभागाकडून तत्संबधी आदेश/ मार्गदर्शक तत्वे/ शासन निर्णय/ विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा/ अधिसूचना तातडीने निर्गमित करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**३.** महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ यातील मराठी भाषेतील तरतुदींच्या अर्थविवरणासाठी इंग्रजी भाषेतील तरतुदी विचारात घेण्यात याव्यात. सदर धोरणातील तरतुदींचे अर्थविवरण करण्याचा अधिकार शासनास असेल व तो अंतिम समजण्यात येईल.

**४.** सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाच्या दिनांक ११.१२.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत मा. मंत्रिमंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**५.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून, त्याचा संकेताक २०२५१२३११३३२४९७९१० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( डॉ. पी. अन्बलगन )**
**सचिव (उद्योग), महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.सभापती,विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
२. मा. अध्यक्ष,विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
३. मा. उपसभापती, विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. उपाध्यक्ष,विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
५. मा. विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधान परिषद यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
६. मा. विरोधी पक्षनेता,महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
९. मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (नगर विकास) यांचे प्रधान सचिव,मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
१०. मा.उप मुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई.
११. मा. मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

१२. मा. राज्य मंत्री (उद्योग) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१४. मा. राज्य मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. अपर मुख्य सचिव (ऊर्जा), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०. अपर मुख्य सचिव, कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२१. अपर मुख्य सचिव, कृषि,पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यसंवर्धन विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. प्रधान सचिव, नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई.
२३. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग, मंत्रालय, मुंबई.
२४. प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२५. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२६. प्रधान सचिव (कामगार), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७. प्रधान सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई.
२८. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२९. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३०. प्रधान सचिव (पर्यटन), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३१. सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
३२. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
३३. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग.
३४. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पूर्व), मुंबई.
३५. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, मुंबई.
३६. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र इंडस्ट्रीयल टाऊनशिप लि., मुंबई.
३७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य औद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळ मर्या., मुंबई.
३८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई.
३९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, मुंबई.
४०. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ, मुंबई.
४१. सर्व महानगरपालिका आयुक्त.
४२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड, मुंबई.
४३. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
४४. विभागीय आयुक्त, कोकण/पुणे/नाशिक/नागपूर/छत्रपती संभाजीनगर/अमरावती.
४५. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४६. सर्व सह सचिव /अवर सचिव/ कक्ष अधिकारी (उद्योग), उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
४७. प्रधान सचिव (उद्योग) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय, मुंबई.
४८. उप सचिव (उद्योग-२) यांचे स्वीय सहायक, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
४९. निवड नस्ती (उद्योग-२).

परिशिष्ट-१

# महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५



**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **प्रस्तावना** | **३** |
| **प्रकरण १:** धोरणाचा आढावा (दृष्टिकोन व उद्दीष्टे) | **५** |
| **प्रकरण २: उद्दिष्ट १.** संस्थात्मक सुधारणा - विकसीत महाराष्ट्र-२०४७ साठी क्षमता बांधणी<br>संरचनात्मक सुधारणा<br>(सुशासन आणि कार्यक्षमता; गुंतवणूक प्रोत्साहनाला गती देणे; पुढील पिढी: व्यवसाय सुलभता)<br>परिसंस्थेचे पोषण<br>(औद्योगिक पायाभूत सुविधा आणि स्मार्ट उत्पादन; गतिमान धोरण परिसंस्था; प्राधान्य क्षेत्र (उत्पादन); एमएसएमई: पुढील स्तरावरील वाढ; उद्योग म्हणून सेवा क्षेत्र आणि प्राधान्य क्षेत्र; संशोधन आणि विकास आणि नवोन्मेष; उत्कृष्टता पुरस्कार) | **७** |
| **प्रकरण ३: उद्दिष्ट २**. शाश्वत वाढ - संतुलित, न्याय्य आणि शाश्वत रोजगार समृद्ध वाढ निर्माण करणे<br>रोजगार आणि समावेशकता<br>(रोजगार सहाय्य; व्यवसाय केंद्रे म्हणून जिल्हा; समावेशकता उपाययोजना)<br>कौशल्य विकास आणि शाश्वतता<br>(कामगारांचे कौशल्य विकास; शाश्वत आणि चक्रीय अर्थव्यवस्था) | **४६** |
| **प्रकरण ४: उद्दिष्ट ३.** वाढलेली स्पर्धात्मकता - अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी भांडवल कार्यक्षमता वाढवणे<br>आर्थिक प्रोत्साहन<br>(उद्योग प्रकारानुसार (एमएसएमई, मोठे, विशाल आणि अति विशाल); उद्योग म्हणून सेवा; अँकर व्हेंडर; आयात पर्याय; उदयोन्मुख जिल्हे; सर्व कार्यबल गटांना बळकट करणे; शाश्वतता आणि उत्कृष्टता)<br>वित्तपुरवठा प्रवेश वाढवणे<br>(सरकारी संस्थांसाठी; उपक्रमांसाठी) | **५५** |
| **जोडपत्रे**<br>जोडपत्र १: तालुके / क्षेत्रांचे वर्गीकरण<br>जोडपत्र २: सेवा क्षेत्र वर्गीकरण<br>जोडपत्र ३: एनएसडीसी अंतर्गत उल्लेखित ३६ क्षेत्र निहाय कौशल्य परिषदा<br>जोडपत्र ४: संक्षेपांची यादी | **७१** |

**प्रस्तावना**

महाराष्ट्र हे भारताच्या प्रगतीचे नेतृत्त्व करणारे राज्य असून, देशाच्या आर्थिक परिप्रेक्ष्यात एक प्रमुख निर्णायक शक्ती आहे. राष्ट्रीय सकल देशांतर्गत उत्पादनात (GDP) महाराष्ट्राचा वाटा १३.६% पेक्षा अधिक आहे. राज्याने २०३० पर्यंत ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्था बनण्याचा निर्धार केलेला आहे.

आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये राज्याच्या सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राचा वाटा २५% आहे तर सेवा क्षेत्राचा वाटा ६४% आहे. राज्याचा प्रगत उत्पादन, हरित तंत्रज्ञान आणि शाश्वत पद्धतींवर असलेला रणनितीक भर औद्योगिक नवोन्मेषातील राज्याची बांधीलकी दर्शवितो. आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये देशातील थेट परकीय गुंतवणुकीत (FDI) महाराष्ट्राचा सर्वाधिक सुमारे ३१% वाटा असून, महाराष्ट्राची गतिमान आणि गुंतवणूकदार-अनुकूल आर्थिक परिस्थिती दर्शवितो, जी औद्योगिक विकास आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देणाऱ्या रणनितीक धोरणांमुळे मजबूत झाली आहे.

राज्याचे सेवा क्षेत्र हे अर्थव्यवस्थेला चालना देणारे स्त्रोत आहे. सेवाक्षेत्राच्या वाढीत महत्त्वाचे योगदान देणाऱ्या व्यापार, हॉटेल्स, परिवहन, संप्रेषण आणि प्रसारणासंबधीत सेवा यांसारख्या प्रमुख उप-क्षेत्रांनी भक्कम कामगिरी दर्शविली आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत सेवा क्षेत्राचे प्राबल्य राज्याचे शहरी व औद्योगिक वैशिष्ट्य आधोरेखित करते. मुंबई व पुणे ही प्रमुख सेवा केंद्रे म्हणून कार्यरत असून त्यातून निर्माण होणाऱ्या सकारात्मक परिणामांचा लाभ राज्यातील टियर-२ व टियर-३ शहरांपर्यंत पोहचत आहेत.

पायाभूत सुविधा विकास हा महाराष्ट्राच्या आर्थिक यशाचा एक प्रमुख सक्षमकर्ता आहे. राज्यात ३.२८ लाख कि.मी. पेक्षा अधिक रस्त्यांचे जाळे व सुमारे ६३१०.९४ कि.मी. रेल्वेचे जाळे सर्वत्र पसरलेले असल्याने माल व प्रवासी वाहतूक कार्यक्षम हालचाल सुलभ करतात (मार्च-२०२४). मुंबई बंदर व जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (JNPA) हे देशातील निम्म्याहून अधिक कंटेनर वाहतूक हाताळतात. याशिवाय, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने प्रकाशित केलेल्या कार्यचलन कामगिरी दर्शकानुसार (Operating Performance Profile) या बंदराने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात ७.३० दशलक्ष TEUs कंटेनर्सची वाहतूक हाताळली. हे सर्व प्रमुख बंदरांद्वारे हाताळल्या जाणाऱ्या एकूण कंटेनर वाहतुकीच्या अंदाजे ५३.९३% आहे, जे १३.५४१ दशलक्ष TEUs होते. तसेच, आगामी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाची क्षमता ९ कोटी प्रवासी आणि २५ लाख मेट्रिक टन माल हाताळण्याची असून ते पूर्ण क्षमतेसह कार्यान्वित झाल्यानंतर राज्याच्या हवाई संपर्कात व आर्थिक संधीमध्ये लक्षणीय वाढ होईल.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने (MEAC) राज्याला ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्था बनविण्यासाठी महत्त्वाकांक्षी आराखडा सादर केला आहे. परिषदेने उत्पादन क्षेत्राला या वाढीचा निर्णायक चालना देणारा घटक मानले असून, विद्यमान उद्योगांचा विस्तार व निवडक महत्त्वाच्या क्षेत्रांत नवीन उद्योगांना आकर्षित करून राज्याच्या सकल देशांतर्गत उत्पादनातील त्याचा वाटा लक्षणीयरीत्या वाढवण्याचे ध्येय आहे.

औद्योगिक धोरण-२०१९ मुळे अनुकूल व्यवसाय वातावरण निर्माण करून, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSMEs) प्रोत्साहन देऊन आणि सर्वसमावेशक, प्रादेशिकदृष्ट्या संतुलित आणि पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत विकासाला प्रोत्साहन देऊन औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्राने अग्रगण्य स्थान राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. वेगाने विकसित होत असलेले जागतिक आर्थिक परिदृश्य आणि तांत्रिक प्रगती ओळखून, राज्य या आव्हानांना तोंड देण्यासाठी, विद्यमान ताकदींवर भर देण्यासाठी आणि जागतिक बाजारपेठेत महाराष्ट्राची स्पर्धात्मकता राखण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाययोजना सादर करण्यासाठी एक नवीन उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण तयार करण्यात आले आहे.

महाराष्ट्राचे नवीन उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण पुढील दशकासाठी एक परिवर्तनाचा मार्ग दर्शविते. या धोरणाचे उद्दीष्ट महाराष्ट्राला एक प्रमुख जागतिक व्यवसाय गंतव्यस्थान (Gloabal Business Destination) म्हणून प्रस्थापित करणे असून भरीव गुंतवणूक आकर्षित करणे, नवोन्मेषाला चालना देणे व तंत्रज्ञानाचा अवलंब वाढवणे हा या

धोरणाचा उद्देश आहे.  या धोरणाच्या प्रमुख क्षेत्रांमध्ये प्रगत उत्पादन तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देणे, पायाभूत सुविधांचा विकास वाढवणे, शाश्वत व हरित उत्पादन पध्दतींना चालना देणे तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) क्षेत्राला बळकटी देणे यांचा समावेश आहे. व्यवसाय सुलभता वाढवून, एक खिडकी प्रणाली मजबूत करुन आणि अनुकूल नियामक वातावरण तयार करुन हे धोरण राज्याला अत्याधुनिक उत्पादन व औद्योगिक विकासासाठी एक अग्रगण्य जागतिक व्यवसाय गंतव्यस्थान म्हणून महाराष्ट्राचे स्थान अधिक भक्कम करण्याचा प्रयत्न करते.

महाराष्ट्र या महत्त्वाकांक्षी प्रवासाला सुरुवात करत असताना, नवीन उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण परिवर्तनकारी बदलासाठी उत्प्रेरक म्हणून काम करेल, शाश्वत आणि सर्वसमावेशक विकासाला चालना देईल आणि त्याचबरोबर जागतिक स्तरावरील एक आघाडीचे व्यवसाय केंद्र म्हणून राज्याचे स्थान मजबूत करेल.

**प्रकरण १ : धोरणाचा आढावा**

**अ) धोरणाचा दृष्टिकोन**

नवोन्मेषाला चालना देण्यासाठी आणि राज्याला भारतातील ट्रिलियन-डॉलरची अर्थव्यवस्था निर्माण करणारे पहिले राज्य बनविण्याकरीता स्मार्ट उत्पादनावर लक्ष केंद्रित करणे, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे, शाश्वतता व स्वावलंबनाला चालना देणे, समावेशक वाढ सुनिश्चित करणे तसेच एक सुलभ व्यवसाय वातावरण निर्माण करून महाराष्ट्राला गुंतवणुकीसाठी एक विश्वासार्ह जागतिक हब बनवणे हा धोरणाचा दृष्टिकोन आहे.

**ब) धोरणाची उद्दिष्टे**

१. **संस्थात्मक सुधारणा - विकसित महाराष्ट्र २०४७ साठी क्षमता बांधणी:** "इन्व्हेस्ट महाराष्ट्र (Invest Maharashtra)" या एकसंध डिजिटल व्यासपीठ निर्मिती करणे, त्याद्वारे सर्व क्षेत्रांतील प्रकल्पांना एकत्रित करुन महाराष्ट्रातील गुंतवणूक प्रकल्पांची सुव्यवस्थित अखंड गुंतवणूक व्यासपीठ विकसित करणे. या व्यासपीठाद्वारे महाराष्ट्रातील आंतर-क्षेत्रीय गुंतवणूक पाईपलाइन्सना जागतिक आणि देशांतर्गत गुंतवणूकदारांसाठी उपलब्ध असलेल्या एकल-दृश्य डिजिटल स्वरुपात सुलभीकरण करण्यात येईल. याव्यतिरिक्त, उद्योग विभागांतर्गत 'उद्योग', 'एमएसएमई' आणि 'सेवा' यासाठी सर्मपित आयुक्तालये निर्माण करण्यात येतील व यासाठी विभागाचे 'उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभाग' असे नामकरण करण्यात येईल.

२. **शाश्वत वाढ - संतुलित, न्याय्य आणि शाश्वत रोजगार समृद्ध वाढ निर्माण करणे:**

**राज्यभर मूल्यवर्धित औद्योगिकीकरणाला गती देण्याकरीता:**

- महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत उद्योग क्षेत्रांचा वाटा २०२४ मध्ये २५% GSVA वरून २०३६ मध्ये २७% आणि २०४७ पर्यंत ३०% पर्यंत वाढवणे व उत्पादनाचा वाटा आर्थिक वर्ष २०२५ मध्ये १३.८% वरून २०४७ पर्यंत २०% पर्यंत वाढवण्याचा आराखडा निश्चित करण्याच्या दृष्टिकोनाला चालना देणे.
- धोरण कालावधीत उत्पादन आणि सेवांमध्ये सुमारे ५० लाख प्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणे.
- MSME क्षेत्रातील उद्यम-नोंदणीकृत उद्योगांना १ कोटी (६५ लाख औपचारिक, २५ लाख प्रगतीपथावर, १० लाख उद्यम पोर्टलवर अतिरिक्त जोडले जातील) पर्यंत औपचारिक करणे आणि वाढविणे.
- प्रादेशिक विकास आणि दरडोई उत्पन्न वाढीला प्रोत्साहन देणे.

३. **वाढलेली स्पर्धात्मकता - अर्थपूर्ण बदल घडवून आणण्यासाठी भांडवल कार्यक्षमता वाढवणे:** शाश्वत सुधारणा, क्षेत्रीय स्पर्धात्मकता आणि क्लायमेट-स्मार्ट औद्योगिकीकरणाद्वारे महाराष्ट्राला जागतिक व्यवसाय गंतव्यस्थान (GBD) म्हणून स्थापित करणे. धोरणाचा उद्देश एकूण रु.७०.५ लाख कोटी ($ ८५० अब्ज) गुंतवणूक आकर्षित करणे आहे, ज्यामध्ये उत्पादनातून ₹ ४१.५ लाख कोटी ($ ५०० अब्ज) आणि सेवांमधून रु.२९ लाख कोटी ($३५०अब्ज) यांचा समावेश आहे. धोरणात उत्पादन निर्यातीत रु.१२.४५ लाख कोटी ($१५० अब्ज) देखील लक्ष्य ठेवण्यात आले आहे.


उपरोक्त उद्दिष्ट्ये प्रकरणाच्या स्वरुपात मांडण्यात आलेली आहेत आणि सन २०३० पर्यंत महाराष्ट्राच्या ट्रिलियन-डॉलर अर्थव्यवस्थेच्या विकासाचे प्रमुख चालक म्हणून काम करण्याकरीता विशिष्ट सक्षमकर्त्यांमध्ये वर्गीकृत करण्यात आलेली आहेत.

**क) धोरणाची वैधता**

हे धोरण जाहीर झालेल्या तारखेपासून पाच वर्षे किंवा पुढील धोरण येईपर्यंत लागू राहील. धोरणाची परिणामकारकता तपासण्यासाठी धोरणाचा कालावधी संपुष्टात येईपर्यंत वर्षातून एकदा धोरणाचे पुनरावलोकन करण्यात येईल. तथापि, कायदे किंवा नियमांमधील बदलांची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा धोरणाच्या उद्दिष्टपूर्तीतील परिणामकारकतेचे मूल्यांकन करून, ठरविलेल्या पुनरावलोकन कालावधीपूर्वीही त्यात सुधारणा करण्यात येईल.

**धोरण सारांश**

उपरोक्त तीन धोरणात्मक उद्दिष्टांना प्रभावीपणे साध्य करण्यासाठी, धोरण संबंधित सक्षमकर्त्यांसह प्रमुख तत्त्वांच्या संचामार्फत मार्गदर्शन केले जाईल. ही मार्गदर्शक तत्त्वे धोरणाची उद्दिष्टे संरचित आणि प्रभावी पद्धतीने पूर्ण करण्याची खात्री करण्यासाठी महत्त्वपूर्ण असून धोरणाच्या अंमलबजावणीचा पाया म्हणून काम करतील. ही तत्त्वे आणि सक्षमकर्ते खालील आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे वित्तीय आणि बिगर-वित्तीय अशा दोन मुख्य प्रकारच्या हस्तक्षेपांमध्ये वर्गीकृत केले आहेत. हे वर्गीकरण धोरण चौकटीला समर्थन देणाऱ्या व्यापक रणनितीक किंवा नियामक कृतींपासून आर्थिक उपाय स्पष्टपणे स्वतंत्र करण्यास मदत करते.




**प्रकरण २ : उद्दिष्ट १**

**संस्थात्मक सुधारणा — विकसित महाराष्ट्र २०४७ साठी क्षमता बांधणी**

**२.१ संरचनात्मक सुधारणा**

**२.१.१ सुशासन आणि कार्यक्षमता**




**उद्योग, गुंतवणूक व सेवा विभागाची रचना**

**२.१.१ (अ) उद्योग विभागाचे नामकरण**

विकसित भारत २०४७ च्या अनुषंगाने, महाराष्ट्र राज्य २०२९ पर्यंत ट्रिलियन डॉलर्स अर्थव्यवस्था बनण्याचे उद्दिष्ट ठेवते. याशिवाय, आर्थिक सल्लागार परिषदेच्या शिफारशीनुसार तसेच नीती आयोगाच्या G-Hub उपक्रमानुसार मुंबई महानगर क्षेत्राला (**MMR**) विकास केंद्र म्हणून विकसित करण्यासाठी आणि महाराष्ट्रासाठी व्हिजन २०४७ डॉक्युमेंटनुसार वाढीचा प्रमुख आधारामध्ये विशेषतः सेवा आणि उद्योग या दोन प्रमुख क्षेत्रांमधील गुंतवणूक असणार आहे. हे प्रतिबिंबित करण्यासाठी, उद्योग विभागाचे नाव यापुढे **"उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभाग"** असे करण्यात येत आहे, ज्यामध्ये तीनही क्षेत्रांची सुस्पष्ट जबाबदारी असेल. तसेच, नवीन औद्योगिक धोरणाचे शीर्षक आता 'उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण-२०२५' असे करण्यात येत आहे, जेणेकरुन राज्यभरात आंतर-क्षेत्रीय गुंतवणूक आकर्षित होऊन सुलभरित्या अंमलात आणण्यासाठी मदत होईल.

**२.१.१ (ब) उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभाग, महाराष्ट्र शासन**

महाराष्ट्राचा उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभाग (यापूर्वीचा उद्योग विभाग) ही राज्यातील औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी, गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी तसेच व्यवसाय सुलभतेसाठी धोरणे तयार करुन अंमलात आणण्यासाठी जबाबदार असलेली सर्वोच्च संस्था आहे. हा विभाग सर्वसमावेशक आणि प्रादेशिकदृष्ट्या संतुलित विकासावर लक्ष केंद्रित करून, मोठे तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना समर्थन देतो. त्याचबरोबर नवोन्मेष, पायाभूत सुविधांची निर्मिती आणि उद्योजकता यांना प्रोत्साहन देतो. उद्योग विभाग एक मजबूत संस्थात्मक चौकटीद्वारे कार्य करत असून यामध्ये विविध विशेष संस्थांचा समावेश आहे. या संस्थांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे महाराष्ट्राचे औद्योगिक परिवर्तन साध्य होत असून राज्याला भारतात व जागतिक स्तरावर एक पसंतीचे गुंतवणूकीचे गंतव्यस्थान म्हणून स्थान प्राप्त होत आहे.

## I. 'इनव्हेस्ट महाराष्ट्र'उपक्रम

राज्याचा हा धोरणात्मक उपक्रम असून कलम ८ कंपनी किंवा संस्था म्हणून स्थापन करण्यात येईल, ज्याचा उद्देश आर्थिक विकासाला चालना देऊन आणि गुंतवणूकदारांचा विश्वास दृढ करून महाराष्ट्राला अग्रगण्य स्थान म्हणून प्रस्थापित करणे हा आहे. उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागांतर्गत संबंधित क्रियाकलाप एकत्रित करून गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी मैत्री कायद्यांतर्गत असलेली वैधानिक संस्था एकीकृत ओळख स्थापित करण्याचा प्रयत्न करते, ज्यामुळे देशांतर्गत आणि परदेशी थेट गुंतवणूकीसाठी एक अग्रगण्य हब म्हणून राज्याची प्रतिष्ठा बळकट करते. इनव्हेस्ट महाराष्ट्र अंतर्गत रु.३,००० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात येत आहे. या अंतर्गत महसूल निर्मिती आणि स्केलेबल परिणामांवर लक्ष केंद्रित करण्याकरीता उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील (कलम २.२.३ (क) आणि २.२.५ (ब) मध्ये सूचीबद्ध केल्याप्रमाणे) फ्रंटियर आणि उदयोन्मुख क्षेत्रांना सहाय्य करण्यासाठी सर्मपित ₹१,००० कोटी कॅटॅलिटिक फंडची निर्मिती करण्यात येईल. लक्षियत समर्थन आणि सुविधांद्वारे गुंतवणूकदारांचा प्रवास सुलभ करण्यासाठी हा उपक्रम शाश्वत आर्थिक विकासाला चालना देण्यावर लक्ष केंद्रित करतो. औद्योगिक विकासाला चालना देणारे आणि गुंतवणूक आकर्षित करणारे उपक्रम प्रभावीपणे अंमलात आणण्याकरीता इन्व्हेस्ट महाराष्ट्र हा उपक्रम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मैत्री, महाराष्ट्र इंडस्ट्रीयल टाऊनशिप लि., महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ, पर्यावरण आणि वातावरणीय बदल विभाग, कामगार विभाग, वस्तू व सेवाकर विभाग आणि इतर सर्व संबंधित कार्यालयांशी समन्वयाने कार्य करेल.

**प्रशासकीय रचना:**

| | | |
|---|---|---|
| • अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उद्योग, गुंतवणूक आणि सेवा | - | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| • विकास आयुक्त, उद्योग | - | मुख्य कार्यान्वयन अधिकारी |

**प्रशासकीय परिषद:**

| | |
|---|---|
| • मा. मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| • मा. उप मुख्यमंत्री १ व २ | सह अध्यक्ष |
| • मा. मंत्री (उद्योग) | उपाध्यक्ष |
| • मा. राज्यमंत्री (उद्योग) | सदस्य |
| • मा. मुख्य सचिव | कार्यकारी अध्यक्ष |
| • अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, उद्योग, गुंतवणूक आणि सेवा | सदस्य सचिव |
| • अतिरिक्त मुख्य सचिव, वित्त | सदस्य |
| • अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, नियोजन | सदस्य |
| • अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, ऊर्जा | सदस्य |
| • अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, कामगार | सदस्य |
| • अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, पर्यावरण | सदस्य |
| • अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, कौशल्य विकास | सदस्य |
| • अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, उच्च आणि तंत्रशिक्षण | सदस्य |
| • अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, पर्यटन विभाग | सदस्य |

**इन्वेस्ट महाराष्ट्र या उपक्रमाची प्रमुख वैशिष्टे खालीलप्रमाणे आहेत:**

**अ. सरकार-गुंतवणूकदार आंतरसंवाद:** हे आंतरसंवाद गुंतवणूकदार आणि सरकारी अधिकाऱ्यांमधील प्राथमिक संपर्क म्हणून काम करेल जेणेकरून सामंजस्य करार सुलभ करणे, प्रगतीवर लक्ष ठेवणे आणि करारांच्या सुलभ अंमलबजावणीची सुनिश्चिती करणे यासाठी सहाय्य केले जाईल. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये सहभाग

घेणे, रोड शो आणि जागरूकता मोहिमा आयोजित करणे आणि व्यवसायांना संभाव्य भागीदारांशी जोडण्यासाठी खरेदीदार-विक्रेता मेळावे आयोजित करणे या माध्यमातून गुंतवणुकीच्या संधींना प्रोत्साहन दिले जाईल.

**ब. 'कंट्री डेस्क'ची स्थापना:** जागतिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी व व्यापार संबंध मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्य, प्रमुख आंतरराष्ट्रीय गुंतवणूकदार देशांसाठी आंतरराष्ट्रीय व्यापार आणि गुंतवणूक प्रोत्साहन यासाठी मध्यवर्ती हब म्हणून मुंबईत **कंट्री डेस्क** स्थापन करेल. नवी दिल्ली, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद तसेच यूएसए, ईयू (स्वीडन आणि जर्मनी), दुबई, तैवान, ऑस्ट्रेलिया आणि जपान यासारख्या आंतरराष्ट्रीय ठिकाणी देखील कंट्री डेस्क स्थापन केले जातील. भविष्यात इतर ठिकाणांचा देखील विचार केला जाऊ शकतो. हे डेस्क बाजारपेठेतील माहिती, धोरण मार्गदर्शन, नियामक समर्थन आणि गुंतवणूक जुळणी सेवा प्रदान करतील, ज्यामुळे परदेशी व्यवसायांसाठी अखंड प्रवेश आणि विस्तार सुनिश्चित होईल. उद्योग संस्था, व्यापार संघटना आणि राजनैतिक मोहिमा यांच्या सहकार्याने चालवले जाणारे कंट्री डेस्क मंजुरी सुलभ करतील, गुंतवणूकदारांच्या समस्यांचे निराकरण करतील आणि महाराष्ट्राला एक पसंतीचे जागतिक व्यवसाय हब म्हणून समर्थन देतील.

**क. रणनितीक जागतिक भागीदारी व अनिवासी भारतीयांचा (NRI) सहभाग:** राज्यातील अत्यंत प्रभावशाली अनिवासी भारतीयांचा सहभाग वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य "गर्जे महाराष्ट्र ग्लोबल" यांसारख्या संघटनांशी सहयोग करेल, या माध्यमातून जागतिक व्यवसायांना एकत्र आणणे, व्हेंचर कॅपिटालिस्ट (VCs) व खाजगी समभाग (PE) फर्म्सना गुंतवणूक करण्यासाठी प्रोत्साहन देणे, नवउद्योगांना मार्गदर्शन करणे आणि महाराष्ट्राच्या आंतरराष्ट्रीय व्यवसाय पोहोच यांना गती देण्यासाठी चालना दिली जाईल. राज्याची जागतिक आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी राज्य, ASSOCHAM, CII, FICCI यासारख्या आघाडीच्या व्यापारी संस्था व जागतिक व्यवसाय परिषदांसोबत सहयोग करेल तसेच अमेरिका, युके, स्वीडन, जर्मनी, जपान, सिंगापूर, युएई या प्रमुख आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्रांमध्ये महाराष्ट्र डेस्क स्थापन करेल. हे डेस्क थेट परकीय गंतवणूक आकर्षित करतील, निर्यातीला चालना देतील, धोरण मार्गदर्शन, सुविधा आणि व्यवसाय जुळणी यासह गुंतवणूकदारांना सर्वंकष सहाय्य करतील.

## II. महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष (MAITRI)

गुंतवणूकदारांना कार्यक्षम आणि पारदर्शक सेवा प्रदान करण्यासाठी मैत्री अधिनियम-२०२३ अंतर्गत सुरु करण्यात आलेली मैत्री (महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा कक्ष) ही राज्याची एकल-खिडकी सुविधा यंत्रणा आहे. पूर्णपणे ऑनलाइन असणाऱ्या मैत्री पोर्टलवर विविध विभागांमधील १२५ हून अधिक सेवा एकत्रितपणे दिल्या जातात (१७५ इतक्या लक्ष्यासह). मंजुरी सुलभरित्या दिली जाते, वास्तविक वेळेत कामाचा पाठपुरावा केला जातो, कृत्रिम बुध्दीमत्तेवर आधारित असणाऱ्या चॅटबॉट्स आणि डॅशबोर्डद्वारे गुंतवणूकदारांच्या समस्यांचे निराकरण करण्यात येते. प्रोत्साहन गणक आणि गुंतवणूकदार विझार्ड सारखी साधने उपलब्ध करून मैत्री, महाराष्ट्राच्या गुंतवणूकदार सुविधा परिसंस्थेचा आधारस्तंभ बनली आहे, त्यामुळे व्यवसाय करण्यास सुलभता येते आणि राज्यभर औद्योगिक प्रतिष्ठान जलद गतीने सुरू आहे.

## III. विकास आयुक्त, उद्योग

उद्योग संचालनालयाचे नामकरण उद्योग आयुक्तालय असे करण्यात येत आहे. ही उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाची कार्यकारी कार्यालय म्हणून कार्य करते. हे कार्यालय राज्य औद्योगिक धोरणे आणि योजनांची प्राथमिक स्तरावरील अंमलबजावणी सुनिश्चित करते. सामूहिक प्रोत्साहन योजना (PSI) आणि क्षेत्र-विशिष्ट धोरणे अंमलात आणण्यासाठी मध्यवर्ती भूमिका बजावते. हे कार्यालय गुंतवणूक प्रोत्साहनासाठी जबाबदार असेल आणि संधी ओळखण्यासाठी, धोरणांची प्रसिध्दी करण्यासाठी आणि भागधारकांच्या सहभागाला समर्थन देण्यासाठी पाठिंबा देईल. सहा प्रादेशिक कार्यालये, नांदेडमधील एक उप-प्रादेशिक कार्यालय आणि प्रत्येक जिल्ह्यात असलेल्या जिल्हा उद्योग केंद्रांअंतर्गत (DICs) समर्पित आयुक्तालय यांच्या माध्यमातून कार्यरत असलेले आयुक्तालय प्रोत्साहने देणे, तक्रारींचे

निराकरण करणे आणि स्थानिक पातळीवर उद्योजकतेला चालना देणे, इ.मुळे औद्योगिक सेवा आणि योजना शेवटच्या टप्प्यापर्यंत पोहोचतील याची खात्री देते.

### IV. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम आयुक्तालय

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांसाठी योजनांची अंमलबजावणी आणि प्रशासन मजबूत करण्यासाठी, महाराष्ट्र शासन सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी एक समर्पित आयुक्तालय स्थापन करेल. उद्योग, गुंतवणूक व सेवा विभागाअंतर्गत तसेच MSME आयुक्त यांच्या नेतृत्वाखालील हे आयुक्तालय MSME उपक्रमांशी संबंधित धोरणे तयार करणे, अंमलबजावणी करणे, त्यांचे संनियंत्रण करणे, कर्ज आणि बाजारपेठांमध्ये प्रवेश सुलभ करणे, नवोन्मेषांना प्रोत्साहन देणे आणि तक्रारींचे वेळेवर निराकरण करणे यांसाठी नोडल संस्थात्मक यंत्रणा म्हणून कार्य करेल. हे आयुक्तालय उद्योग आयुक्तालय, जिल्हा उद्योग केंद्रे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागांतर्गत इतर संबंधित संस्थांसमवेत समन्वय साधून कार्य करेल आणि महाराष्ट्र राज्य लघु विकास महामंडळाच्या (MSSIDC) कामकाजावर देखरेख करेल. हे आयुक्तालय भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI), राष्ट्रीय लघु उद्योग महामंडळ (NSIC) आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग - विकास संस्था (MSME-DIs) यासारख्या राष्ट्रीय संस्थांशी देखील समन्वय साधेल. या आयुक्तालयात समूह विकास, सेवा क्षेत्रातील MSME, निर्यात सुविधा आणि सर्वसमावेशक उद्योजकतेसाठी अंतर्गत समर्पित कक्ष देखील असतील, यामुळे राज्यभर सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची वाढीसाठी अधिकाधिक लक्ष्य साध्य करणे आणि प्रतिसादात्मक पाठबळ देणारी संरचना उभी करणे शक्य होईल.

### V. सेवा आयुक्तालय

**समावेशक बहु-विभागीय मॉडेल**

सेवा-आधारित उद्योग आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या विकासाचे मार्गदर्शन करणारी एक धोरणात्मक नोडल संस्था म्हणून कार्य करण्यासाठी महाराष्ट्र एक समर्पित सेवा आयुक्तालय स्थापन करेल. या संस्थेचे सेवा आयुक्त हे प्रमुख असतील. या आयुक्तालयात माहिती तंत्रज्ञान, पर्यटन, कौशल्य विकास, उच्च आणि तंत्रशिक्षण, नगर विकास आणि सांस्कृतिक कार्य यासारख्या प्रमुख विभागांचे वरिष्ठ अधिकारी असतील. हे अधिकारी प्रशासकीय मंडळाचे पदसिद्ध सदस्य म्हणून काम करतील. ही रचना केंद्रीकृत नेतृत्वासाठी विभागांमध्ये मजबूत समन्वय सुनिश्चिती करेल. हे मॉडेल एकीकृत धोरण दिशा, गुंतवणूक सुविधा आणि कार्यक्रमाधारित सहाय्य प्रदान करुन डिजिटल अर्थव्यवस्था, सर्जनशील उद्योग आणि प्रगत तंत्रज्ञान - जसे की कृत्रिम बुध्दीमत्ता, स्पेस टेक, ब्लॉकचेन आणि क्वांटम कॉम्प्युटिंग - यासारख्या समांतर विभागीय क्षेत्रांच्या विकासास समर्थन देईल.

### VI. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम, १९६१ अंतर्गत सन १९६२ मध्ये स्थापन झालेली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही औद्योगिक पायाभूत सुविधांच्या विकासासाठी राज्याची प्रमुख संस्था आहे. विशेष नियोजन प्राधिकरण (SPA) म्हणून, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मोठे, लघु आणि क्षेत्र-विशिष्ट औद्योगिक पार्क्ससह २.५ लाख एकर क्षेत्रावरील ३०० पेक्षा अधिक औद्योगिक वसाहतींचे नियोजन आणि विकास करते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ जमीन वाटप, उपयुक्तता तरतूद व मंजुरी सुलभ करते तसेच दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीअल कॉरिडोर (DMIC) आणि जागतिक गुंतवणूक क्षेत्रांतील प्रकल्पांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या संस्थेच्या सक्रिय नियोजन आणि सुविधा देण्याच्या भूमिकेमुळे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ राज्याच्या औद्योगिक विकासाचा कणा बनली आहे. **सर्व एमआयडीसी क्षेत्रे औद्योगिक वसाहत म्हणून घोषित केले जातील.**

### VII. महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाउनशिप लिमिटेड (MITL)

महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप मर्यादित ही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि नॅशनल इंडस्ट्रियल कॉरिडॉर डेव्हलपमेंट अँड इम्प्लीमेंटेशन ट्रस्ट (NICDIT) यांचा संयुक्त उपक्रम असून या संस्थेकडे दिल्ली-मुंबई

इंडस्ट्रियल कॉरिडॉर (DMIC) कार्यक्रमांतर्गत जागतिक दर्जाचे औद्योगिक टाउनशिप विकसित करण्याचे काम सोपवण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर येथील शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्र (AURIC) हे उद्योग, निवासी आणि वाणिज्य यासाठी एकात्मिक क्षेत्र असलेले १०,००० एकरचा स्मार्ट औद्योगिक शहर (Smart Industrial City) हा प्रमुख उपक्रम आहे. यामध्ये औद्योगिक वापरासाठी ६०% जमीन आणि उर्वरित जमीन शहरी पायाभूत सुविधांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लिमिटेड हे स्मार्ट व शाश्वत विकासाचे उदाहरण असून जागतिक गुंतवणूकदारांना कार्यान्वयनासाठी आधुनिक व प्लग-अ‍ॅण्ड-प्ले यांसारख्या योजनांना पोषक परिसंस्था उपलब्ध करुन देते.

कोकण विभागातील रायगड जिल्ह्यात दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र विकसित केले जात असून ते दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉरशी जोडले जाणारे दुसरे नोड आहे. महाराष्ट्रातील दिघी बंदर स्मार्ट औद्योगिक शहर हे पहिले ग्रीनफील्ड औद्योगिक क्षेत्र असून त्याचा दिघी बंदराच्या (५५ किमी) जवळील क्षेत्राचा वापर बंदर-नेतृत्व विकासासाठी होईल. एकूण १२,१४०.८७२ हेक्टर इतके अधिसूचित क्षेत्र असून ते दोन टप्प्यात विभागले गेले आहे. पहिल्या टप्प्यात ६३२७ हेक्टर विकसित केले जात आहे, त्यापैकी २४५० हेक्टर क्षेत्र महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लिमिटेडच्या अखत्यारित येते.

### VIII. जिल्हा उद्योग केंद्रे (DIC)

महाराष्ट्रातील जिल्हा पातळीवर औद्योगिक आणि उद्योजकीय विकासासाठी जिल्हा उद्योग केंद्रे संस्थात्मक कणा म्हणून कार्य करतात. राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या विकसित होत असलेल्या प्राधान्यक्रमांशी आणि गतिमान जागतिक आर्थिक स्थितीशी जुळवून घेण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राची संरचनात्मक पुनर्रचना केली जात आहे. प्रस्तावित चौकटीअंतर्गत, जिल्हा उद्योग केंद्राची प्रशासकीय यंत्रणा तीन भिन्न स्तरांवर कार्य करेल. एका महाव्यवस्थापकाकडे जिल्हा उद्योग केंद्राचे कामकाज असेल. तसेच जिल्हा उद्योग केंद्रामध्ये उद्योग आयुक्तालय, एमएसएमई आयुक्तालय आणि सेवा आयुक्तालय - या तीनही कार्यालयांचे समर्पित कार्यालये असतील. प्रत्येक जिल्हा उद्योग केंद्रांमध्ये सहाय्यक महाव्यवस्थापक किंवा उपमहाव्यवस्थापक पातळीवरील अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली समर्पित कार्यालये असतील. या कार्यालये त्या त्या स्तरावरील कामकाजावर देखरेख करतील. महाराष्ट्रातील जिल्हा उद्योग केंद्रांतील मनुष्यबळाचा काही भाग तीन आयुक्तालयांकरिता नेमण्यात येईल व उर्वरित मनुष्यबळ सामान्य प्रशासन आणि आंतर-कार्यात्मक भूमिकांना सहाय्य करतील.

या पुनर्रचनेचे उद्दिष्ट कार्यात्मक विशेषीकरण वाढवणे, सेवा वितरण सुधारणे आणि सर्वसमावेशक, तंत्रज्ञान-चालित आणि प्रादेशिकदृष्ट्या संतुलित औद्योगिक विकासाच्या महाराष्ट्राच्या व्यापक उद्दिष्टांशी धोरणांचे संरेखन सुनिश्चित करणे आहे.

### IX. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित (MSSIDC)

महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची स्थापना सन १९६२ मध्ये करण्यात आली आहे. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित हे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना आणि कारागिरांना विपणन, खरेदी, पायाभूत सुविधा आणि तांत्रिक सहाय्य यामध्ये महत्त्वपूर्ण सहाय्य प्रदान करते. ही संस्था विणकाम केंद्र आणि एम्पोरियाच्या माध्यमातून पारंपारिक हस्तकलेला चालना देते जसे की, पैठणमधील पैठणी साडी विणकाम केंद्र. RAMP (Rising And Acclerating MSME Performance) कार्यक्रमांतर्गत १ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना पाठिंबा देणे, रोजगार निर्मिती करणे आणि ग्रीनफिल्ड आणि ब्राउनफील्ड गुंतवणुकीला चालना देणे हे महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाने उद्दिष्ट ठेवले आहे. RAMP हा कार्यक्रम महाराष्ट्राच्या १ ट्रिलियन डॉलर्सच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यात महत्त्वपूर्ण योगदान देते.

### X. महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ (MSKVIB)

मुंबई खादी आणि ग्रामोद्योग अधिनियम, १९६० अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ पारंपारिक उद्योग आणि ग्रामीण उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहे. हे मंडळ पंतप्रधान

रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) आणि मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) यासारख्या योजना राबवते, ज्याअंतर्गत कारागिरांना आर्थिक मदत आणि प्रशिक्षण उपलब्ध करुन दिले जाते. हस्तनिर्मित कागद, मधमाशीपालन आणि सुतारकाम-लोहारकाम यासारख्या समर्पित शाखांसह, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ सांस्कृतिक वारसा जपत आहे तसेच ग्रामीण उपजीविकाही वाढवत आहे. त्याचे विपणन उपक्रम आणि प्रदर्शने कारागिरांना बाजारपेठेतील प्रवेश वाढविण्यासाठी व्यासपीठ प्रदान करतात तसेच पारंपारिक हस्तकला टिकवून ठेवण्यासाठी सहाय्य करतात. पीएम विश्वकर्मा ही केंद्र सरकारची योजना आहे ज्याचा उद्देश पारंपारिक कारागीर आणि कारागीरांना कौशल्य प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य आणि बाजारपेठ उपलब्ध करून देणे असा आहे. ही योजना महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाशी सुसंगत असून स्थानिक पातळीवर राबविण्यासाठी त्यांच्या तळागाळातील नेटवर्कचा वापर करण्यात येतो, ज्यामुळे कारागिरांना औपचारिक मान्यता आणि शाश्वत उपजीविकेचा लाभ मिळतो.

### XI. महाराष्ट्र राज्य औद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळ मर्यादित (SICOM)

सन १९६६ मध्ये महाराष्ट्र राज्य औद्योगिक आणि गुंतवणूक महामंडळ मर्यादितची स्थापन करण्यात आलेली आहे. ही एक धोरणात्मक, आर्थिक आणि सल्लागार संस्था म्हणून काम करते. मूळतः पूर्णपणे सरकारी मालकीची असलेली, सिकॉम ही आता एक सार्वजनिक-खाजगी भागीदारी संस्था असून राज्यातील विभागांना वित्तपुरवठा, सार्वजनिक-खाजगी भागीदारी व्यवहारांसंदर्भात सल्ला आणि धोरणविषयक सल्ला उपलब्ध करुन देते. या संस्थेने मिहान (Multi-modal International Cargo Hub and Airport at Nagpur) आणि मुंबई-पुणे दृतगती महामार्ग यासारख्या महत्त्वाच्या प्रकल्पांना सहाय्य केले असून उत्पादन आणि पायाभूत सुविधांमध्ये खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीला पाठिंबा दिला आहे. त्यांच्या बहुआयामी संघाद्वारे, सिकॉम राज्यभर गुंतवणूकीला प्रोत्साहन, औद्योगिक नियोजन आणि पायाभूत सुविधा विकासाला चालना देत आहे.

### XII. महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ (MSFC)

राज्य वित्तीय महामंडळ अधिनियम, १९५१ अंतर्गत स्थापन झालेले महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ राज्यातील लघु आणि मध्यम उद्योगांना वित्तपुरवठा करण्यासाठी एक प्रमुख संस्थात्मक यंत्रणा म्हणून काम करत आहे. मुदत-कर्ज देणारी एक विकास वित्तीय संस्था म्हणून महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळाला बळकटी दिली जाईल जेणेकरून ते एमएसएमईच्या विकसित गरजांशी सुसंगत संरचित पत समर्थन, पुनर्वित्त पर्याय आणि क्षेत्र-विशिष्ट वित्तीय उत्पादने प्रदान करेल. हे धोरण महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ इतर राज्य आणि केंद्रीय वित्तीय योजनांमध्ये एकत्रीकरणाला प्रोत्साहन देईल जेणेकरून पत प्रवेश सुलभ होईल, वित्तपुरवठा वेळ कमी होईल व टियर २ आणि टियर ३ क्षेत्रांमध्ये औद्योगिक विकासाला गती मिळेल.

### XIII. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (MCED)

महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र १९८८ पासून प्रात्यक्षिक प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देऊन इच्छुक उद्योजकांना सक्षम बनवत आहे. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राद्वारे अगणित उद्योजक घडवले असून त्यांनी यशस्वी उपक्रम निर्माण केले आहेत. रोजगार निर्मिती आणि मार्गदर्शनाद्वारे त्यांच्या समुदायांवर सकारात्मक परिणाम होत आहे. हे केंद्र उच्च दर्जाचे उद्योजकता कार्यक्रम देण्याव्यतिरिक्त प्रशिक्षणार्थींना त्यांची व्यावसायिक उद्दिष्टे साध्य होईपर्यंत सतत पाठिंबा प्रदान करते. कालानुरुप हे केंद्र ऑनलाइन प्रशिक्षणात विस्तारित झाले आहे आणि विकसित होत असलेल्या उद्योजकीय परिदृश्यात अग्रणी राहण्यासाठी इंडस्ट्री ४.० सोबत सक्रियपणे सहभागी होत आहे.

## २.१.२ गुंतवणूक प्रोत्साहनाला गती देणे

### २.१.२(अ) मॅग्नेटिक महाराष्ट्र - प्रमुख गुंतवणूक शिखर परिषद

महाराष्ट्राची आर्थिक लवचिकता, जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा आणि गुंतवणूकदार-अनुकूल धोरणे अधोरेखित करण्यासाठी दर दोन वर्षांनी एक उच्च-स्तरीय जागतिक गुंतवणूक शिखर परिषद आयोजित केली जाईल. ही

परिषद उद्योग क्षेत्रातील आघाडीचे व्यावसायिक नेते, धोरणकर्ते व गुंतवणूकदारांना आकर्षित करुन महाराष्ट्राला एक प्रमुख व्यवसाय हब म्हणून स्थान देण्यास सहाय्य करेल.

जागतिक स्तरावरील आकर्षण अधिक वाढवण्यासाठी राज्याने मॅग्नेटिक महाराष्ट्र १.० सुरु केले. ज्यामध्ये महाराष्ट्राची आर्थिक लवचिकता, जागतिक दर्जाची पायाभूत सुविधा आणि गुंतवणूकदार-अनुकूल धोरणे अधोरेखित झाली, ज्यामुळे रु. १२ लाख कोटीहून अधिक गुंतवणूक वचनबद्धता निर्माण झाली. कोविड काळात मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० आयोजित करण्यात आले होते, ज्यामध्ये बैठका आणि गुंतवणूकदार गोलमेज बैठका आभासी पद्धतीने आयोजित करण्यात आल्या होत्या. प्रचलित आव्हानांना न जुमानता, राज्याने रु.१.१२ लाख कोटींच्या सामंजस्य करारांवर यशस्वीरित्या स्वाक्षरी केली. या यशावर आधारित, मॅग्नेटिक महाराष्ट्र हा द्वैवार्षिक उपक्रम जागतिक गुंतवणूकदारांसोबत संबंध वाढवेल, ज्यामुळे शाश्वत आणि भविष्यासाठी तयार औद्योगिकीकरणात राज्याचा दर्जा मजबूत होईल.

त्याशिवाय, महाराष्ट्राची जागतिक पोहोच वाढविण्यासाठी आणि गुंतवणूकदारांचा विश्वास बळकट करण्यासाठी बहुपक्षीय संस्था, व्यापार परिषदा आणि व्यवसाय नेटवर्कशी सहयोग करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यासपीठांमध्ये सक्रियपणे सहभागी होईल. या धोरणात्मक हस्तक्षेपांद्वारे, महाराष्ट्राचे उद्दिष्ट एक प्रमुख जागतिक व्यवसाय गंतव्यस्थान म्हणून स्वतःला स्थापित करणे, शाश्वत गुंतवणूक, नवोन्मेष आणि आर्थिक विस्ताराला चालना देणे असे आहे.

### २.१.२(ब) गुंतवणूक प्रोत्साहन जनजागृती कार्यक्रम

महाराष्ट्राचे जागतिक उपस्थिती बळकट करण्यासाठी आणि गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी अमेरिका, युरोपियन युनियन, युके, जपान, रशिया, दक्षिण कोरिया, तैवान, युएई, सिंगापूर आणि आग्नेय आशिया यासारख्या प्रमुख गुंतवणूक हबमध्ये लक्षित डिजिटल आणि मीडिया मोहिमांचा वापर करून राज्य एक व्यापक जागतिक जनजागृती कार्यक्रम सुरू करेल. महाराष्ट्र राज्याचे औद्योगिक क्षमता, धोरणात्मक प्रोत्साहने आणि उदयोन्मुख संधी दर्शविण्यासाठी शासकीय शिष्टमंडळे, उद्योग क्षेत्रातील नेते आणि क्षेत्रातील तज्ञ यांच्यासह उच्च-प्रभावी रोड शो आणि गुंतवणूक शिखर परिषदा आयोजित केल्या जातील. महाराष्ट्राचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व करण्यासाठी व गुंतवणुकदार व्यवसाय-अनुकूल प्रतिमा मजबूत करण्यासाठी जागतिक व्यावसायिक नेते, उद्योग प्रणेते आणि सांस्कृतिक प्रभावशाली व्यक्तींशी रणनितीक भागीदारी केली जाईल.

### २.१.२(क) जिल्हा गुंतवणूक शिखर परिषद

मॅग्नेटिक महाराष्ट्र या उपक्रमाव्यतिरिक्त राज्य दरवर्षी जिल्हास्तरीय शिखर परिषदा आयोजित करेल ज्यामुळे प्रादेशिक आर्थिक क्षमता निर्माण होतील. त्याचबरोबर ऑटोमोबाइल लीडरशिप फोरम, एरोस्पेस आणि डिफेन्स कॉन्क्लेव्ह, मशिनरी आणि इक्विपमेंट कन्व्हेन्शन्स, ॲग्रो अँड फूड प्रोसेसिंग सेमिनार, फार्मास्युटिकल्स, बायोटेक्नॉलॉजी आणि लाईफसायन्सेस सेमिनार, आयटी इनोव्हेशन समिट आणि ग्रीन एनर्जी कॉन्फरन्स यासारख्या क्षेत्र-विशिष्ट परिषदा आयोजित केल्या जातील जेणेकरून उद्योगांचा सहभाग वाढेल. प्रादेशिक गुंतवणुकीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यांमध्ये दरवर्षी जिल्हा गुंतवणूक शिखर परिषद आयोजित केली जाईल. या परिषदेद्वारे स्वाक्षरी केलेल्या सामंजस्य करारांची अंमलबजावणी व प्रगतीचा आढावा मैत्री पोर्टलशी एकत्रित ऑनलाइन डॅशबोर्डद्वारे केले जाईल. गुंतवणूकदारांच्या प्रकल्पांना जलद मंजुरी मिळावी यासाठी प्रशासनाकडून सुलभ सुविधा पुरविल्या जातील.

### २.१.२(ड) प्रदर्शने/कन्व्हेन्शन सेंटर/सेंटर्स ऑफ एक्सलन्स

महाराष्ट्रातील उद्योगांना प्रोत्साहन देणे, जागतिक कंपन्यांशी भागीदारी निर्माण करणे आणि क्षेत्रीय विशेषीकरणाला प्रोत्साहन देणे यांसाठी राज्य प्रत्येक विभागात एक जागतिक दर्जाचे प्रदर्शन/कन्व्हेन्शन सेंटर/सेंटर ऑफ एक्सलन्स निर्माण करेल. अशा एकूण ६ प्रादेशिक विभागांसाठी नवीन प्रदर्शन/कन्व्हेन्शन सेंटर/सेंटर्स ऑफ एक्सलन्स साठी प्रत्येकी रु. १०० कोटींची आर्थिक तरतूद करण्यात येईल.

प्रत्येक विभागीय-स्तरावर प्रदर्शन आणि कन्व्हेन्शन सेंटर हे पर्यटन विभागाच्या समन्वयाने विकसित केले जाईल जेणेकरून ते MICE (Meetings, Incentives, Conferences, Exhibitions) चालना देण्याशी सुसंगत राहतील. स्थानिक आतिथ्य पायाभूत सुविधा, पर्यटन ब्रँडिंग आणि हंगामी पर्यटक प्रवाहाशी जास्तीत जास्त आर्थिक परिणाम साधण्यासाठी एकात्मता सुनिश्चित करेल.

### **२.१.३ Next Gen - EoDB**

राज्य, नियम व विनियम सोपे करून, कालबद्ध आणि ऑनलाइन मंजुरी देऊन, अनुपालनाचा भार आणि व्यवसायिक खर्च कमी करून गुंतवणूकदारांना अनुकूल वातावरण निर्माण करेल. त्यासाठी उपक्रम खालीलप्रमाणे आहेत:

### **२.१.३ (अ) एकल खिडकी प्रणाली– (MAITRI)**

मैत्री पोर्टलमध्ये एआय-संचालित मंजुरी, ब्लॉकचेन-आधारित दस्तऐवज पडताळणी आणि रिअल टाईम ट्रॅकींग करणे, गुंतवणूकदारांचा अनुभव वृध्दींगत करणे यांसह प्रमुख सुधारणांमध्येही वाढ करण्यात येईल. अनुपालन अंतिम मुदत आणि अद्ययावत धोरणाची सद्यस्थिती दर्शविण्यासाठी एक स्वयंचलित अनुपालन देखरेख प्रणाली सुरू केली जाईल. याव्यतिरिक्त, एक गुंतवणूकदार विझार्ड आणि एआय-संचालित चॅटबॉट्स व्यवसायांना आवश्यक मान्यता आणि प्रोत्साहने सुनिश्चित करण्यास मदत करतील.

मोठ्या गुंतवणूकदारांना अधिक सुविधा देण्यासाठी, समर्पित रिलेशनशिप मॅनेजर इन्व्हेस्टर कॉन्सियर्ज सर्व्हिसेसद्वारे एंड-टू-एंड प्रोजेक्ट सहाय्य प्रदान करतील. मैत्री मोबाईल ॲप देखील एकात्मिक केले जाईल, जे औद्योगिक सेवा आणि गुंतवणूकदारांच्या समर्थनासाठी रिअल-टाइम, ऑन-द-गो प्लॅटफॉर्म प्रदान करेल.

राज्याने मैत्री ऑनलाइन पोर्टल (maitri.maharashtra.gov.in) द्वारे विहित वेळेत मंजुरी व परवानग्या आणि तक्रारींचे निवारण सुनिश्चित करण्यासाठी वैधानिक एकल खिडकी प्रणाली सुरू केली आहे. मैत्री पोर्टल विविध राज्य आणि राष्ट्रीय पोर्टलशी एकत्रित केले आहे, ज्यामुळे मंजुरी, सामान्य अर्ज नमुने, एआय चॅटबॉट, गुंतवणूकदार विझार्ड, प्रोत्साहन परिगणक आणि अनुपालन डॅशबोर्डचे प्रत्यक्ष वेळेचा मागोवा सहाय्यभूत करून गुंतवणूकदारांचा अनुभव वाढवते. मैत्री हे जागतिक बँकेच्या निधीतून सुरू असलेल्या महास्ट्राइड प्रकल्पाच्या कक्षेत G2B सेवा सुधारण्यासाठी मित्रा (MITRA) सोबत समन्वय साधून कार्य करेल.

मैत्री पोर्टल त्यांच्या समर्पित संपर्क व्यवस्थापक आणि मदत कक्ष (फोन नंबर: (+९१)-२२-२२६२२३६२/६१) मार्फत एंड-टू-एंड प्रोजेक्टकरीता देखील सहाय्य पुरवितात. गुंतवणूकदारांना सर्व आवश्यक मंजुरी, परवानग्या आणि परवाने मिळविण्यात मदत करण्यासाठी ते नोडल एजन्सी आणि एकल खिडकी प्रणाली म्हणून काम करते.

### **२.१.३ (ब) मोठ्या गुंतवणुकीसाठी स्वयंचलित/त्वरित परवानगी:**

औद्योगिक गुंतवणूकदारांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता, नवोपक्रम उद्योगांसाठी आवश्यक असलेले विविध परवाने/परवानग्या एकाच ठिकाणी स्वयंचलित त्वरीत प्रणालीद्वारे देण्यात येणार आहे.

राज्यात रु.१०० कोटी पेक्षा अधिक गुंतवणूक आणि थेट परकीय गुंतवणुकीच्या औद्योगिक प्रस्तावांसाठी, ताब्यातील जमिनीच्या अधीन राहून सक्षम अधिकाऱ्यांकडून सर्व देय मंजुरी मिळाल्यास अशा परवानग्या जारी केल्याच्या तारखेपासून २ वर्षांच्या आत औद्योगिक परिसर बांधण्यासाठी त्वरित परवानगी देण्यात येईल. मैत्री या सिंगल विंडो प्रणालीद्वारे त्वरित परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे. जर २ वर्षात परवानगी मिळाली नाही तर ती आपोआप रद्द होईल. मैत्री कायद्यातील तरतुदीनुसार पात्र घटकांना अशा परवानग्या देण्यासाठी विकास आयुक्त (उद्योग) सक्षम अधिकारी म्हणून काम करतील.

### **२.१.३ (क) EoDB नवोन्मेष सहाय्य**

राज्य, व्यवसाय सुलभता सुधारणे, कार्यक्षमतेत वाढ करणे आणि व्यवसायांसाठी प्रशासकीय भार कमी करणे यांसाठी योगदान देणारे नाविन्यपूर्ण प्रकल्प आणि तंत्रज्ञानासाठी अनुदाने किंवा अर्थसहाय्य देईल.

### २.१.३ (ड) व्यवसाय सुधारणा सुलभीकरणाद्वारे उद्योगांचे सक्षमीकरण

औद्योगिक वाढ, गुंतवणूक सुलभीकरण आणि नियामक कार्यक्षमतेला चालना देऊन सक्षम व्यवसाय वातावरण निर्माण करण्यासाठी राज्य वचनबद्ध आहे. या दृष्टिकोनाशी सुसंगत राहून, राज्याने व्यवसाय सुलभीकरण, उद्योगांना अधिक लवचिकता, पारदर्शकता आणि अनुपालन निश्चितता सक्षम बनवण्याच्या उद्देशाने प्रमुख विभागांमध्ये अनेक परिवर्तनकारी सुधारणा हाती घेतल्या आहेत.

गुंतवणूक प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर उद्योगांना पाठिंबा देण्यासाठी राज्य शासनाने हाती घेतलेले उपक्रम खालीलप्रमाणे आहेत:

**स्थापन-पूर्व टप्पा:**

१. गुंतवणूकदार सुविधा संस्थात्मक करण्यासाठी आणि सुनिश्चित कालबद्ध सेवा प्रदान करण्यासाठी, उद्योग विभागाने महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा (मैत्री) अधिनियम, २०२३ अधिनियमित केला आहे. हा कायदा जलद मंजुरी व संरचित तक्रार निवारणासाठी एक वैधानिक चौकट प्रदान करतो. शिवाय, मैत्री २.० पोर्टल सुरु झाल्याने विविध विभागांच्या १२७ उद्योग-संबंधित सेवांमध्ये प्रवेश सुलभ झाला आहे, ज्यामुळे अनेक नियामक स्पर्शबिंदू एकाच डिजिटल संवादमाध्यमामध्ये एकत्रित झाले आहेत तसेच प्रक्रियेची कार्यक्षमता लक्षणीयरीत्या सुधारली आहे.

२. महसूल विभागाने राबवलेल्या जमीन आणि मालमत्तेशी संबंधित सुधारणांमध्ये पारदर्शकता वाढवण्यावर व प्रक्रियात्मक विलंब कमी करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. भार नोंदणी (Encumbrance) पोर्टल सुरू केल्याने भागधारकांना मालकी आणि भार याच्याशी संबंधित सर्वसमावेशक नोंदीं सहज उपलब्ध होतील. राज्याने नोंदणीच्या दिवशीच नोंदणीकृत विलेख (Registered Deed) जारी करणे देखील अनिवार्य केले आहे. जमिनीच्या फेरफार नोंदी अद्ययावत करण्यासाठी आणि नगरपालिका मालमत्ता कर, वीज तसेच पाणी देयके प्रणालींमधील बदलांचे संकलन करण्यासाठी एक स्वयंचलित प्रणाली यंत्रणा स्थापित केली जाईल. याव्यतिरिक्त, औद्योगिक जमिनीसाठी बिगर-कृषी (NA) वापर प्रमाणपत्रांची आवश्यकता काढून टाकल्याने जमीन संपादन आणि रूपांतरण प्रक्रिया अधिक सुलभ झाल्या आहेत.

३. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने सर्व राज्य शासनाच्या मालकीच्या औद्योगिक वसाहती/पार्क्सचे नकाशे तयार करण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) स्वीकारली आहे. हे व्यासपीठ संभाव्य गुंतवणूकदारांना पायाभूत सुविधांची उपलब्धता व संबंधित कायदेशीर मंजुरींबाबत तपशीलवार माहिती प्रदान करते, ज्यामुळे माहितीपूर्ण आणि जलद निर्णय घेण्यास मदत होते.

४. ऊर्जा विभागाने नवीन वीज जोडणी मिळविण्यासाठी कागदपत्रांची आवश्यकता केवळ दोन आवश्यक कागदपत्रांपुरती मर्यादित करुन प्रक्रिया सुलभ केली आहे. बिल प्रक्रियेपूर्वी वीजदरातील बदल अधिसूचित करण्यात येऊन ऑनलाइन बिल भरणा प्रणाली सक्षम करण्यात आली आहे, त्यामुळे व्यवसायांना आर्थिक नियोजन करण्याची संधी मिळते.

**पूर्व-कार्यक्रम टप्पा:**

१. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणीय मंजूरीतुन सूट असलेल्या श्वेत-श्रेणीतील उद्योगांच्या ऑनलाइन प्रसिध्दीद्वारे पर्यावरणीय अनुपालनाला तर्कसंगत बनवले आहे. पाणी (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ आणि हवा (प्रदूषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ अन्वये संचालन परवानगी (CTO) आता पाच वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळासाठी दिली जाते. यामध्ये स्व-प्रमाणन आधारित स्वयं-नूतनीकरण सुविधा असल्यामुळे मंजुरीची वेळ आणि प्रशासकीय भार कमी होतो.

२. कराधानाच्या क्षेत्रात, वस्तू आणि सेवा कर विभागाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाद्वारे अनिवार्य केल्याप्रमाणे व्यावसायिक कर नोंदणी प्रमाणपत्रे एका कामकाजाच्या दिवसात जारी करण्याचे सुनिश्चित केले आहे.

३. औद्योगिक सुरक्षा आणि आरोग्य संचालनालयाने (DISH) कामाच्या ठिकाणी सुरक्षितता पाळताना अनुपालन सुलभ करण्याच्या उद्देशाने सुधारणा केल्या आहेत. यामध्ये कारखाना स्वयंचलित अनुज्ञप्ती नूतनीकरण, १० वर्षांसाठी अनुज्ञप्तीची वाढीव वैधता आणि कमी-जोखीम असलेल्या तपासण्यासाठी स्वयं-प्रमाणीकरण सुरू करणे समाविष्ट आहे. याव्यतिरिक्त, मध्यम-जोखीम तपासणीसाठी तृतीय-पक्ष प्रमाणपत्राची तरतूद करण्यात आली आहे, त्याद्वारे विभागाचा हस्तक्षेप कमी होतो आणि विश्वास-आधारित नियामक दृष्टिकोनाला प्रोत्साहन मिळते.

४. त्याचप्रमाणे, वैधमापनशास्त्र विभागाने वैधमापन मापनशास्त्र अधिनियम, २००९ अन्वये अनुज्ञप्तीचे स्वयंचलित नूतनीकरण सुविधा दिली आहे. विभागाने संगणकीकृत तपासणी वाटप आणि संनियत्रणासाठी एक ऑनलाइन प्रणाली कार्यान्वित केली आहे, जी वापरकर्त्यांना मागील वर्षांचे तपासणी अहवाल आणि प्रमाणपत्रे डाउनलोड करण्याची परवानगी देते. त्याशिवाय, उत्पादक, दुरुस्ती करणारा आणि डिलर अनुज्ञप्तीची वैधता मागील कालावधीपेक्षा दुप्पट करून १० वर्षांपर्यंत वाढविण्यात आली आहे.

५. कामगार विभागाने संयुक्त तपासण्या हाती घेताना, अनावश्यक तपासण्या कमी करुन पारदर्शकता वाढविण्यासाठी केंद्रीय तपासणी प्रणाली (CIS) कार्यान्वित केली आहे. महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना (रोजगाराचे नियमन आणि सेवाशर्ती) कायदा, २०१७ अंतर्गत नोंदणीपूर्वी तपासणीची आवश्यकता नाही आणि नोंदणींचे नूतनीकरण करण्याची आवश्यकता आता काढून टाकण्यात आली आहे. व्यवसाय हे सर्व लागू कामगार कायद्यांसाठी एकच, एकात्मिक विवरण (रिटर्न) ऑनलाइन दाखल करू शकतात, ज्यामध्ये डिजिटल पेमेंटची तरतूद आहे. याव्यतिरिक्त, राज्याने महिला कर्मचाऱ्यांसाठी रात्रपाळीवरील निर्बंध काढून टाकले आहेत, त्याव्दारे लैंगिक समावेशकतेस उत्तेजन दिले जात आहे आणि २४/७ कामकाज सुलभ झाले आहे.

**टीप:** खाजगी औद्योगिक पार्कचा विकास सुलभ करण्यासाठी महसूल विभागामार्फत जमीन वापरातील बदलासाठी अर्ज सादर केल्यापासून **३०** ते **६०** दिवसांच्या आत सर्व अर्जांवर प्रक्रिया करुन मंजूरी प्रदान करण्याची खातरजमा करण्यात येईल. वेळेवर आणि कार्यक्षम जमीन वापर रूपांतरण सुनिश्चित करण्यासाठी याविषयी विहीत केलेल्या कालमर्यादेच्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यासाठी महसूल विभाग आवश्यक शासन निर्णय निर्गमित करेल.

## २.२ पोषक परिसंस्था

### २.२.१ औद्योगिक पायाभूत सुविधा आणि स्मार्ट उत्पादन

वाहतूक, लॉजिस्टिक्स, वीज आणि डिजिटल कनेक्टिव्हिटीसह एकात्मिक औद्योगिक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी आणि त्यांची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी राज्य वचनबद्ध आहे. आर्थिक वाढ सुलभ करण्यासाठी औद्योगिक कॉरिडॉर, लॉजिस्टिक्स हब आणि अति-विशाल पार्क यासारख्या जागतिक दर्जाच्या औद्योगिक पायाभूत सुविधांवर देखील राज्य लक्ष केंद्रित करत आहे. प्रमुख रणनिती- ज्याचा उद्देश नवीन गुंतवणूक आकर्षित करणारे आणि औद्योगिक उत्पादन वाढवणारे व्यवसाय-अनुकूल वातावरण तयार करणे हा आहे, यामध्ये औद्योगिक लँड-बँक विकसित करणे, बंदर-नेतृत्वाखालील विकास मजबूत करणे आणि बहु-मॉडल वाहतूक नेटवर्कद्वारे कनेक्टिव्हिटी वाढवणे यांचा समावेश आहे.

राज्यात आवश्यक औद्योगिक पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाउनशिप लिमिटेड या समर्पित संस्था म्हणून कार्य करत राहतील.

### २.२.१ (अ) औद्योगिक लँड बँक

राज्याच्या औद्योगिक विकासाबरोबरच जमिनीची मागणी सुध्दा अनेक पटीने वाढेल. उद्योगांसाठी जमिनीच्या उपलब्धतेत सहजता आणण्यासाठी व जमिनीच्या संपादन तसेच वाटपात पारदर्शकता आणण्यासाठी राज्य खालील प्रमुख उपक्रमांवर लक्ष केंद्रित करेल:

- राज्य, जमीन संपादित करून एमआयडीसी आणि एमआयटीएल या संस्थेच्या माध्यमातून औद्योगिक पार्क्ससाठी, मोठ्या प्रमाणावर औद्योगिकीकरण झालेल्या क्षेत्रात तसेच औद्योगिकदृष्टया मागासलेल्या क्षेत्रात जमीन उपलब्ध करून दिली जाईल तसेच ऑनलाइन पारदर्शक यंत्रणेद्वारे भू-संपादन व जमीन वाटप यांची प्रक्रिया सुनिश्चित आणि सुव्यवस्थित करेल.
- राज्य शासन औद्योगिक पार्क्सच्या बाहेर औद्योगिक विकासासाठी जमीन, प्रादेशिक योजना आणि एकीकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमन (UDCPR) अंतर्गत औद्योगिक उद्देशांसाठी राखीव जमीनीची निवड करेल, संपादित करेल आणि वाटप करेल.
- राज्य शासन खाजगी औद्योगिक उद्यानांच्या विकासाला पाठिंबा देईल, ज्यामध्ये आवश्यक पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटी असतील आणि त्यात सलग जमीन असावी. त्याअंतर्गत सूक्ष्म उद्योगासाठी किमान ५-१० एकर, लघु उद्योगासाठी १०-२५ एकर, मध्यम उद्योगासाठी २५-५० एकर, मोठ्या उद्योगासाठी ५०-२५० एकर, विशाल उद्योगांसाठी २५०-५०० एकर आणि अतिविशाल उद्योगासाठी ५०० एकरपेक्षा जास्त जमीन असणे आवश्यक आहे.

### २.२.१(ब) औद्योगिक कॉरिडॉरचा विकास

औद्योगिक कॉरिडॉर म्हणजे औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी विशिष्ट भौगोलिक क्षेत्रासाठी निवड केलेल्या पायाभूत सुविधा गुंतवणुकीचे समूह आहे.

शहरी केंद्रांना औद्योगिक क्षेत्रांशी जोडून आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी राज्य कॉरिडॉरच्या जवळच्या उद्योगांच्या विकासाला प्रोत्साहन देईल. कॉरिडॉर ओलांडून सुस्थापित औद्योगिक समूह औद्योगिक उत्पादन घटकांना सहज प्रवेश प्रदान करणे, वाहतूक लॉजिस्टिक खर्च कमी करणे आणि वितरण कालावधी सुधारणे तसेच इन्व्हेंटरी खर्च कमी करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यास मदत होईल.

**अ. दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (DMIC)** हा महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला चालना देणारा एक परिवर्तनकारी पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. राज्यात दोन DMIC नोड्स आहेत: छत्रपती संभाजीनगर येथील शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्र, जो प्लग-अँड प्ले पायाभूत सुविधा असलेली स्मार्ट सिटी म्हणून विकसित केला गेला आहे; तसेच **दिघी पोर्ट औद्योगिक क्षेत्र**, जे सागरी आणि अंतर्गत व्यापारासाठी लॉजिस्टिक्स आणि औद्योगिक केंद्र म्हणून काम करण्यासाठी धोरणात्मकदृष्ट्या महत्वाच्या ठिकाणी स्थापित आहे. दोन्ही क्षेत्रांच्या ठिकाणी अति विशाल औद्योगिक घटकांची उभारणी अपेक्षित असून त्यामुळे औद्योगिकतेच्या प्रमाणात, स्पर्धात्मकतेत आणि गुंतवणूक आकर्षित होण्यास वाढ होईल.

**ब. समृद्धी इंडस्ट्रिअल कॉरिडॉर** जो अधिकृतपणे हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग म्हणून ओळखला जातो, हा ७०१ किमी लांबीचा, ६ पदरी द्रुतगती महामार्ग आहे, जो मुंबई आणि नागपूरला १० जिल्ह्यांमधून जोडतो. तो प्रवासाचा वेळ १६ तासांवरून ८ तासांपर्यंत कमी झाल्यामुळे दळणवळण क्षमता आणि प्रादेशिक विकास होत आहे. १८ नवीन टाउनशिप आणि २४ इंटरचेंजसह, हा कॉरिडॉर राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर कार्यक्रमाशी सुसंगत असून विदर्भ, मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रासारख्या अविकसित प्रदेशांमध्ये औद्योगिकीकरणाला चालना देतो.

**क. बेंगळुरू-मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर (BMIC)** हा भारत सरकारचा बेंगळुरू आणि मुंबई दरम्यान औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी १,००० किमीचा उपक्रम आहे. महाराष्ट्रात, सातारा नोड १२,३५५ एकरमध्ये पसरलेला

आहे, जे NH-५४८C आणि NH-५४८E या राष्ट्रीय महामार्गांद्वारे प्रमुख शहरे आणि जेएनपीएला मजबूतीने जोडलेले आहे. हा कॉरिडॉर नवोन्मेषांना चालना देणे, गुंतवणूक आकर्षित करणे आणि संतुलित प्रादेशिक विकासाला पाठिंबा देण्यासाठी प्रगत उत्पादन क्षेत्रे, लॉजिस्टिक्स हब आणि शाश्वत पायाभूत सुविधांना एकत्रित करतो.

ङ **कोकण इंडस्ट्रियल कॉरिडॉर** हा महाराष्ट्राच्या ७२० किमी लांबीच्या किनारपट्टीवरील बंदर-आधारित विकास उपक्रम आहे, जो तारापूर, उसर, मुंबई, महाड, दाभोळ, रत्नागिरी आणि कुडाळ यांसारख्या प्रमुख औद्योगिक क्षेत्रांना जोडतो. मुंबई बंदर आणि जेएनपीए यांसारख्या दोन प्रमुख बंदरांसह ४८ अधिसूचित लहान बंदरांच्या मदतीने, लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, दळणवळण सुधारणे व व्यापार वाढवणे हा या कॉरिडॉरचा उद्देश आहे. एमआयडीसी सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेल अंतर्गत लघु बंदर विकासाचे मूल्यांकन करण्यासाठी MbPT, MMB, JNPA आणि वाढवण पोर्ट प्राधिकरण यासारख्या संस्थाशी समन्वय साधत औद्योगिक पार्क्स विकसित करण्याची आणि अंतर्गत वाहतूकीचे जाळे एकत्रित करण्याची योजना आखत आहे.

**ई. संरक्षण कॉरिडॉर:** महाराष्ट्राच्या एरोस्पेस आणि डिफेन्स परिसंस्थेला चालना देण्यासाठी, राज्य खालीलपैकी ३ संरक्षण कॉरिडॉर विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवते:

- कॉरिडॉर १ —पुणे, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर
- कॉरिडॉर २ - नागपूर, वर्धा, अमरावती आणि सावनेर
- कॉरिडॉर ३ - नाशिक आणि धुळे

बंदर, विमानतळ आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांच्या जवळ असलेले हे ३ नोड्स राज्याला त्यांच्या अवकाश व संरक्षण क्षेत्र धोरणांतर्गत नवीन गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि त्याच्या अस्तित्वातील परिसंस्थेला चालना देण्यासाठी वाढीव क्षमता प्रदान करतील.

### २.२.१ (क) नील अर्थव्यवस्था (Blue Economy)

महाराष्ट्र राज्याच्या विस्तृत किनारपट्टीच्या आर्थिक क्षमतेचा वापर करण्यासाठी राज्य किनारी आणि अंतर्गत बंदरांसाठी पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य देईल, ज्यामुळे कार्यक्षम लॉजिस्टिक्स आणि सागरी व्यापार सक्षम होईल. बंदर सुविधांचे आधुनिकीकरण, समर्पित मत्स्यव्यवसाय क्षेत्रे स्थापन करणे आणि सीफूड प्रक्रिया आणि निर्यातीला समर्थन देण्यासाठी शीत साखळी नेटवर्क विकसित करण्यासाठी धोरणात्मक गुंतवणूक सुनिश्चित केली जाईल. हे धोरण मासे प्रक्रिया, बोटी बांधणी आणि मत्स्यपालनासह सागरी-आधारित एमएसएमईंना चालना देईल, ज्यामध्ये साठवणूक, वाहतूक आणि मूल्यवर्धनासाठी एकात्मिक सहाय्य असेल. या उपक्रमांचे उद्दिष्ट नील अर्थव्यवस्था मजबूत करणे, किनारी प्रदेशांमध्ये रोजगार वाढवणे आणि महाराष्ट्राला शाश्वत सागरी उद्योगांसाठी एक अग्रगण्य हब म्हणून स्थान देणे आहे.

**बंदर विकास:** वाढवण हे पालघर जिल्ह्यातील डहाणूजवळ प्रस्तावित खोल समुद्रातील बंदर, भारतातील १३ वे प्रमुख बंदर बनण्याच्या तयारीत आहे. मुंबईपासून सुमारे १४० किमी उत्तरेस स्थित, येथे नैसर्गिक २० मी. ड्राफ्ट आहे, ज्यामुळे ते मोठ्या कंटेनर जहाजांना हाताळू शकते. हा प्रकल्प रु.७६,२२० कोटींचा असून जेएनपीए (७४%) आणि एमएमबी (२६%) यांच्या संयुक्त उपक्रमात आहे. एकदा कार्यान्वित झाल्यानंतर, हे बंदर दरवर्षी २९८ दशलक्ष मेट्रिक टन हाताळण्याचा अंदाज आहे, ज्यामध्ये २३.२ दशलक्ष ट्वेंटी-फूट इक्विव्हॅलेंट युनिट्स (TEUs) समाविष्ट आहेत, ज्यामुळे ते जगातील अग्रगण्य १० कंटेनर बंदरांमध्ये स्थान मिळवेल. रणनितिकदृष्ट्या स्थित, ते प्रमुख आर्थिक कॉरिडॉरशी कनेक्टिव्हिटीला लक्षणीयरीत्या वाढवेल आणि भारताच्या सागरी आणि व्यापार पायाभूत सुविधांना बळकटी देईल.

### २.२.१ (ड) औद्योगिक पार्क्सचा विकास

राज्याने कामगारांसाठी घरांच्या सुविधांसह सर्व आवश्यक आणि प्रगत पायाभूत सुविधांनी सुसज्ज असलेले क्षेत्रीय, प्रादेशिक आणि देश-विशिष्ट औद्योगिक पार्क्स विकसित करणार आहे. औद्योगिक कामगारांना समर्पित भाड्याने

घरे आणि वसतिगृहे प्रदान करण्याच्या बदल्यात अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांकाद्वारे उद्योगांना प्रोत्साहन दिले जाऊ शकते. मंत्रिमंडळ उप समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून औद्योगिक क्षेत्रात अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देय असेल.

या धोरणांतर्गत, सर्व औद्योगिक पायाभूत सुविधा प्रकल्प प्रचलित कायदे, महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६९, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, विकास नियंत्रण नियमावली (DCR), एकीकृत विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन नियमावली (UDCPR) आणि संबंधित नियोजन प्राधिकरणाच्या नियमांच्या अधीन राहून विकसित करण्यात येतील. तसेच, सर्व प्रकल्पांसाठी प्रथम संबंधित नियोजन प्राधिकरणाकडून आवश्यक वैध परवानगी घेणे बंधनकारक असेल.

**औद्योगिक पार्क्ससाठीचे मॉडेल खालीलप्रमाणे असतील:**

- **पूर्णपणे शासनाच्या मालकीच्या आणि त्यांच्याव्दारे व्यवस्थापित (MIDC, MITL)**

  एमआयडीसी आणि एमआयटीएल सारख्या शासनाच्या पूर्णपणे मालकीच्या आणि व्यवस्थापित औद्योगिक पार्क्समध्ये, शासन औद्योगिक पार्क्सना निधी उपलब्ध करुन देईल, विकसित करेल आणि कार्यान्वयन करेल. भू-संपादन, पायाभूत सुविधांचा विकास, कार्यान्वयन आणि देखभाल यासाठी शासन जबाबदार असेल. हे मॉडेल धोरणात्मक उद्योग, आर्थिक क्षेत्रे किंवा खाजगी गुंतवणूक मर्यादित असलेल्या प्रदेशांसाठी योग्य आहे.

- **पीपीपी (JV, SPV) — शासनाचा मुख्य हिस्सा (MIDC, MITL)**

  या मॉडेलमध्ये शासन आणि खाजगी संस्थांच्या सहकार्याने औद्योगिक पार्क्स विकसित केली जातील. ही भागीदारी खालील स्वरूपात असू शकते:

  - संयुक्त उपक्रम (JV): शासन आणि खाजगी क्षेत्राच्या सहयोगाने एक विशेष उद्देश संस्था तयार केली जाते, जी गुंतवणूक, विकास आणि व्यवस्थापनात सामायिक जबाबदाऱ्या सुनिश्चित करते.
  - विशेष हेतू वाहन (SPV): कार्यक्षम अंमलबजावणी आणि जोखीम सामायिकरण (Risk-sharing), औद्योगिक पार्क्सची अंमलबजावणी, संचालन आणि देखभाल करण्यासाठी एक समर्पित कायदेशीर संस्था स्थापन केली जाते.

  सार्वजनिक खाजगी भागीदारी आधारित मॉडेलमध्ये, धोरणात्मक आर्थिक आणि औद्योगिक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी शासकीय देखरेख सुनिश्चित करतानाच, खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञतेचा वापर करणे ही शक्य होते.

- **पूर्णपणे खाजगी संस्थेच्या मालकीचे तथा शासनाने अधिसूचित केलेले**

  या मॉडेल अंतर्गत, शासन आवश्यक नियामक मान्यता, प्रोत्साहने आणि सुविधा सहाय्य प्रदान करेल व खाजगी संस्था स्वतंत्रपणे औद्योगिक पार्क्स विकसित करुन कार्यान्वयन करतील. अशा पार्क्सने शासनाच्या मान्यतेनुसार पूर्व-परिभाषित पायाभूत सुविधा आणि कार्यान्वयन मानके पूर्ण करणे आवश्यक आहे. हे मॉडेल शासनावरील आर्थिक भार कमी करुन गुंतवणूक आणि जलद विकासाला चालना देते.

  औद्योगिक पार्क्ससाठी एमआयडीसी आणि एमआयटीएल हे विशेष नियोजन प्राधिकरण असून निधी वाटप करतील आणि पार्क्सची अंमलबजावणी टप्प्याटप्प्याने करतील. राज्यभरात पायाभूत सुविधांच्या विकासाच्या सुरळीत अंमलबजावणी आणि त्याचे कामकाज चालण्यासाठी पायाभूत सुविधा विकास संस्थांचा (MIDC, MSRDC, MMRDA, CIDCO) समावेश असणाऱ्या उच्चाधिकार समितीची स्थापना केली जाईल. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन हे उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष असतील.

I) **अतिविशाल औद्योगिक पार्क्स**

राज्य शासन सहा विभागातील प्रमुख औद्योगिक कॉरिडॉरमध्ये सहा अतिविशाल औद्योगिक पार्क्स विकसित करेल. सदर पार्कचे किमान क्षेत्रफळ ५००० एकर इतके असेल. हे पार्क्स सार्वजनिक खाजगी भागीदारी पध्दतीचे अनुसरण

करतील, ज्याच्या अंमलबजावणीत एमआयडीसी आणि एमआयटीएल महत्त्वाची भूमिका बजावतील. हे पार्क्स जलदगतीने उद्योगांची स्थापना सुलभ होण्यासाठी स्मार्ट, हरित आणि चक्रीय अर्थव्यवस्थेची तत्त्वे तसेच पायाभूत सुविधांना एकत्रित करून तयार केली जातील. हे पार्क्स मोठ्या प्रमाणावरील औद्योगिक परिसंस्थांना प्रोत्साहन देऊन संसाधनांच्या वापरात वाढ करतील, संपर्क वाढवतील, गुंतवणूक आकर्षित करतील आणि संतुलित प्रादेशिक विकासालाही चालना देतील.

II) **देश-विशिष्ट पार्क्स**

देश-विशिष्ट पार्क्स ही धोरणात्मकरित्या नियोजित पार्क्स असून विशिष्ट देशातील उद्योगांसाठी सर्मपित व्यवसाय परिसंस्था प्रदान करून गुंतवणूकीला चालना देणे हा उद्देश आहे. हे पार्क्स सानुकूलित औद्योगिक वातावरण प्रदान करून जागतिक स्पर्धात्मकतेला प्रोत्साहन देतील तसेच लक्ष्यित देशाच्या उद्योगांच्या क्षमतांशी सुसंगत असलेली एक विशेष उत्पादन आणि सेवा परिसंस्था देखील तयार करतील.

हे पार्क्स तंत्रज्ञान आणि ज्ञान हस्तांतरणात महत्त्वाची भूमिका बजावतील, ज्यामुळे महाराष्ट्र आणि जागतिक आर्थिक भागीदारांमध्ये सखोल सहकार्य वाढेल. राज्य सरकार सानुकूलित प्रोत्साहने, पूर्व-मंजूर औद्योगिक जमीन, प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा आणि इतर सुलभ सुविधा प्रदान करेल.

III) **क्षेत्र-विशिष्ट पार्क्स**

सेमीकंडक्टर आणि इलेक्ट्रॉनिक्स, ईव्ही, वस्त्रोद्योग, कृषी-प्रक्रिया आणि हरित ऊर्जा यांसारख्या लक्ष्यित क्षेत्रांमध्ये लक्ष्यित वाढीला चालना देणे, मूल्य साखळी वाढविणे आणि आधारभूत गुंतवणूक आकर्षित करणे यासाठी क्षेत्र-विशिष्ट औद्योगिक पार्क्सच्या विकासाला राज्य चालना देईल. हे पार्क्स प्लग-अँड-प्ले पायाभूत सुविधा, सामायिक सुविधा व सुलभ मंजुरी, नवोन्मेष, स्पर्धात्मकता व शाश्वत विकास सुलभ करणारे औद्योगिक समूह उपलब्ध करुन देतील.

IV) **एमएसएमई पार्क्स**

राज्यात एमएसएमई आणि प्रादेशिक विकासाला चालना देऊन ३४ (मुंबई आणि मुंबई उपनगर व्यतिरिक्त) जिल्ह्यात प्रत्येकी किमान १ एमएसएमई पार्क विकसित केले जाईल. यामुळे राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये प्रादेशिक आर्थिक वाढ, पायाभूत सुविधांचा विकास, रोजगार निर्मिती आणि उद्योजकतेला चालना मिळेल.

### २.२.१(इ) स्मार्ट उत्पादन

स्मार्ट उत्पादन हा एक व्यापक दृष्टिकोन आहे, जो कार्यक्षमता, अनुकूलता आणि प्रतिसाद क्षमता वाढविण्यासाठी उत्पादन प्रक्रियेत प्रगत डिजिटल तंत्रज्ञानाचा समावेश करतो. याअंतर्गत तात्काळ माहितीचे विश्लेषण आणि निर्णय घेण्यास सक्षम असलेली परस्पर जोडली गेलेली प्रणाली तयार करण्यासाठी, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, रोबोटिक्स आणि क्लाउड कॉम्प्युटिंग यासारख्या साधनांचा वापर केला जातो. स्मार्ट उत्पादन ही उद्योग ४.० च्या तत्त्वांची व्यावहारिक अंमलबजावणी आहे, ज्यामध्ये उद्योग ५.० हे अधिक मानव-केंद्रित आणि शाश्वत प्रणालींमध्ये उत्क्रांतीसाठी एक दृष्टीकोन देते.

- **उद्योग ४.०** हे इंटरनेट ऑफ थिंग्ज, रोबोटिक्स आणि एआय सारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी स्मार्ट उत्पादनासाठी चौकट उपलब्ध करुन देतो.
- **उद्योग ५.०** हे स्मार्ट उत्पादन कार्यक्षमतेसह सामाजिक आणि पर्यावरणीय प्राधान्यांशी सुसंगत असेल याची खातरजमा करण्यासाठीचा मानव-केंद्रित आणि शाश्वत दृष्टिकोन सादर करतो.

स्मार्ट उत्पादनामध्ये सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर अशा दोन्ही घटकांचा समावेश असतो. जे उद्योगांद्वारे उत्पादन प्रक्रियेत एकत्रित केले जातात. हार्डवेअर या भागांमध्ये उत्पादनांचे भौतिक उत्पादन वाढविण्यावर तसेच सॉफ्टवेअर या भागामध्ये उत्पादन प्रक्रियेची कार्यक्षमता सुधारणे आणि वाढविणे यावर लक्ष केंद्रित केले जाते.

**I. स्मार्ट उत्पादनाचे सॉफ्टवेअर घटक**

- **प्रिडीक्टीव्ह आणि रिअल-टाइम विश्लेषण:** कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंग वास्तविक वेळेत प्रभावी देखभाल, प्रक्रिया वृध्दी आणि डाटा संचालित तात्काळ निर्णय क्षमता शक्य करते.
- **डिजिटल सिम्युलेशन आणि मॉनिटरिंग:** डिजिटल ट्विन तंत्रज्ञान कृत्रिम सिम्युलेशन, संनियंत्रण आणि वाढीसाठी भौतिक मालमत्तेचे रिअल टाईम आभासी प्रतिनिधित्व प्रदान करते.
- **कनेक्टेड सिस्टीम्स ॲण्ड प्लॅटफॉर्म्स**: इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT) हा मंच उपकरणे आणि यंत्रणांना जोडतो, ज्यामुळे उत्पादन परिसंस्थांमध्ये अखंड संवाद आणि माहितीचे अदानप्रदान सुलभ होते.
- **ऑपरेशनल इंटिग्रेशन सॉफ्टवेअर**: सुव्यवस्थित कार्यप्रवाह आणि संसाधन व्यवस्थापनासाठी एंटरप्राइझ रिसोर्स प्लॅनिंग (ERP) आणि मॅन्युफॅक्चरिंग एक्झिक्युशन सिस्टम्स (MES) हे उत्पादन प्रक्रियांना व्यवसाय कार्यान्वयनासह एकत्रित करतात.
- **सायबरसुरक्षा उपाययोजना**: मजबूत सॉफ्टवेअर यंत्रणा, उत्पादन डेटा, नेटवर्क आणि प्रक्रियांना सायबर धोक्यांपासून संरक्षण देतात, ज्यामुळे कार्यात्मक सातत्य आणि सुरक्षितता सुनिश्चित होते.
- **एआर आणि व्हीआर टूल्स**: AR आणि VR उपयोजकांमुळे कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, समस्या निवारण आणि प्रक्रियेच्या कल्पनाचित्रात वाढ होते.
- **बिग डेटा ॲण्ड क्लाऊड सोल्युशन**: प्रगत विश्लेषणे आणि क्लाउड संगणन मोठ्या प्रमाणात डेटा स्टोरेज, प्रक्रिया आणि प्रवेशयोग्यता सक्षम करतात, माहितीपूर्ण निर्णय घेण्यास आणि प्रमाणतेला समर्थन देतात.
- **टेक्नॉलॉजी अडॉप्शन ॲण्ड अटोमेशन सपोर्ट**: सॉफ्टवेअर फ्रेमवर्क नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब आणि विद्यमान यंत्रणेत त्याचे एकत्रीकरण सुलभ करते, त्यामुळे स्मार्ट उत्पादन प्रक्रियांमध्ये संक्रमण होताना सुलभता येते.

**II. स्मार्ट उत्पादनाचे हार्डवेअर घटक**

- **सेन्सिंग आणि मॉनिटरींग प्रणाली**: स्मार्ट सेन्सर्स आणि ऊर्जा संनियंत्रण उपकरणे ऑप्टिमाइझ केलेल्या कार्यान्वयनासाठी भौतिक मानके आणि ऊर्जा वापराबद्दल तात्काळ माहिती प्रदान करतात.
- **कनेक्टिव्हिटी आणि इंटिग्रेशन हार्डवेअर**: सायबर-फिजिकल प्रणाली आणि गेटवे, राउटर आणि ५G मॉड्यूल यासाठी इंनटरनेट ऑफ थिंग्स-सक्षम नेटवर्किंग उपकरणे, उत्पादन प्रणालींचे अखंड संप्रेषण आणि एकत्रीकरण सुनिश्चित करतात.
- **प्रगत उत्पादन प्रणाली**: प्रिसिजन मशीन आणि ॲडिटीव्ह मॅन्युफॅक्चरिंग (३D प्रिंटिंग) यांचा समावेश असलेली डिजिटली सक्षम उपकरणे, कार्यक्षम आणि नाविन्यपूर्ण उत्पादन प्रक्रियेला चालना देतात.
- **रोबोटिक्स आणि ऑटोमेशन**: सहयोगी रोबोट्स आणि स्वयंचलित यंत्रसामग्री यांसारख्या प्रगत रोबोटिक प्रणाली अचूकता, उत्पादकता आणि कार्यात्मक लवचिकतेत वाढ करते.
- **इनोव्हेशन ॲण्ड डेव्हलपमेंट हार्डवेअर**: CNC मशीन्स आणि अचूक साधनांचा समावेश असणारी विशेष उपकरणे, उत्पादन क्षमतांमधील तंत्रज्ञान विकास आणि निरंतर सुधारणेस सहाय्य करतात.

केंद्र सरकारच्या पातळीवर समर्थ उद्योग भारत ४.० हे अवजड उद्योग मंत्रालयाच्या नेतृत्वाखालील, व्यावहारिक मार्गदर्शक तत्त्वे, प्रात्यक्षिक केंद्रे आणि विशेषतः एमएसएमईसाठी स्थानिक सहाय्याद्वारे भारतात उद्योग ४.० च्या अवलंबनास चालना देते. त्याला पूरक म्हणून, स्मार्ट इंडस्ट्री रेडीनेस इंडेक्स (SIRI) उद्योगांच्या प्रक्रिया, तंत्रज्ञान आणि कार्यबल परिमाणांचे मूल्यांकन करण्यासाठी जागतिक बेंचमार्किंगचे साधन म्हणून काम करते. समर्थ उद्योग भारत ४.० हे भारताच्या गरजांनुसार प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठीचे सहाय्य प्रदान करते, तर SIRI जागतिक स्पर्धात्मकता सुनिश्चित करते. एकत्रितपणे ते महाराष्ट्राला स्थानिक आव्हानांना तोंड देण्यास, लक्ष्यित उपाययोजना अंमलात आणण्यास आणि जागतिक स्तरावर आपल्या उद्योगांना स्थान मिळवून देण्यास सक्षम करतील. तंत्रज्ञानावर आधारित औद्योगिक परिसंस्था

तयार करण्यासाठी, उत्पादनाच्या उभारणीमध्ये स्मार्ट उत्पादन प्रक्रिया स्वीकारण्यासाठी सर्व उद्योगांना लक्ष्यित करुन प्रोत्साहित करणे आवश्यक आहे. यामुळे उत्पादकांची उत्पादकता वाढविण्यासह राज्यातील उत्पादन वाढीस देखील हातभार लागेल. अखंड तंत्रज्ञानाचा अवलंब सुनिश्चित करण्यासाठी स्मार्ट औद्योगिक पार्क आणि फॅब लॅब विकसित करण्याची राज्य, योजना आखत आहे.

**१. उद्योगांकडून तंत्रज्ञानाच्या अवलंबनास पाठिंबा**

- **ग्रीनफील्ड युनिट्स**—राज्य नवीन औद्योगिक घटकांना स्मार्ट उत्पादन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यासाठी आर्थिक सहाय्य देईल, ज्यामध्ये पेटंट केलेल्या तंत्रज्ञानासाठी स्वामीत्व प्रतिपूर्तीसह अर्थसहाय्यित तंत्रज्ञान खर्च प्रदान केला जाईल. विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी व गणित (STEM) आधारित कार्यबल हे प्रशिक्षण, सायबर सुरक्षा आणि विश्लेषणातील गुंतवणूक एकत्रित करुन कुशल मनुष्यबळ सुनिश्चित करील तसेच हाय-स्पीड इंटरनेट व संशोधन आणि विकास केंद्रे यासारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा केल्याने नवोन्मेष आणि कार्यान्वयन कार्यक्षमता सुलभ होईल.
- **ब्राउनफिल्ड युनिट्स** - विद्यमान उत्पादन घटकांचे आधुनिकीकरण करण्यासाठी, राज्य पेटंट केलेल्या स्मार्ट उत्पादन साधनांसाठी भांडवली अर्थसहाय्य आणि स्वामीत्व प्रतिपूर्ती देईल तसेच घटकांना भारत सरकारच्या स्मार्ट उत्पादन तंत्रज्ञान निधीतून कमी व्याजदराने कर्जे मिळण्यास मदत करील. त्रुटी विश्लेषण आणि व्यवहार्य अभ्यासासाठी होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती, उद्योगांच्या आधुनिक तंत्रज्ञान गरजा ओळखण्यास मदत करतील तसेच विशेष भांडवली अर्थसहाय्यामुळे इंटरनेट ऑफ थिंग्स, एआय आणि स्वयंचलित तंत्रज्ञान यांसह यंत्रसामग्रीच्या आधुनिकीकरणाला मदत होईल. नवोन्मेष आणि कार्यान्वयन कार्यक्षमता सुधारणांशी संबंधित संशोधन आणि विकास प्रोत्साहने दिले जातील. लक्ष्यित प्रोत्साहने कृषी-कचरा रूपांतरण आणि प्रगत साहित्य क्षेत्रांना समर्थन देतील, तर ISO ९००१:२०१५ आणि ISO ४५००१ यासारख्या स्मार्ट कारखाना मानकांसाठी प्रमाणन सहाय्य उद्योगाची विश्वासार्हता वाढवतील. प्रदर्शने आणि चर्चासत्रांसह ज्ञान-सामायिकीकरण माध्यमे, बाजार विस्तार आणि आंतर-उद्योग शिक्षणाला चालना देतील.

**४. हाय-टेक औद्योगिक पार्क्स**

हाय-टेक औद्योगिक पार्क्स ही अत्याधुनिक उत्पादनासाठी प्रगत तंत्रज्ञानासह औद्योगिक, शैक्षणिक आणि निवासी कार्ये यांचे संयोजन करणारी एकात्मिक जागा आहे. इंटरनेट ऑफ थिंग्स, एआय, स्वयंचलित, नवीकरणीय ऊर्जा आणि मजबूत डिजिटल कनेक्टीव्हिटीचा वापर करून औद्योगिक पायाभूत सुविधांमध्ये क्रांती घडवणे, नवोपक्रमांना चालना देणे आणि शाश्वत आर्थिक वाढ घडवून आणणे हे या पार्क्सचे उद्दिष्ट आहे. राज्य एमआयडीसी, एमआयटीएल, सार्वजनिक खाजगी भागीदारी आणि खाजगी संस्थेद्वारे उदयोन्मुख तंत्रज्ञानाशी संबंधित उपकरणे आणि घटक उत्पादनात ग्रीनफिल्ड आणि ब्राउनफिल्ड हाय-टेक औद्योगिक पार्कच्या विकासाला अतिरिक्त सहाय्य आणि प्रोत्साहन देऊन चालना देईल.

हाय-टेक औद्योगिक पार्कच्या मुख्य वैशिष्ट्यांमध्ये संशोधन आणि विकास केंद्रे, प्रगत उपकरणांसह प्रोटोटाइपिंग आणि चाचणी प्रयोगशाळा, निर्णय घेण्यासाठी डेटा विश्लेषण केंद्रे, सायबर सुरक्षा आणि ऊर्जा व्यवस्थापन केंद्रे, नेटवर्किंग आणि ज्ञान सामायिकरणासाठी सहयोगी जागा, अनुपालन व मनुष्यबळ कौशल्य विकास इत्यादींसाठी प्रशिक्षण आणि प्रमाणन सुविधा यांसारख्या सामान्य सुविधांचा समावेश असेल. इतर वैशिष्ट्यांमध्ये इंटरनेट ऑफ थिंग्ज एकत्रीकरण, स्मार्ट गतिशीलता, शाश्वत पद्धती, नावीन्यपूर्ण परिसंस्था, सुरक्षा व सुरक्षितता तसेच व्यवसाय सहाय्य यांचा समावेश आहे.

**३. फॅब लॅब्स**

राज्यात स्मार्ट उत्पादनाला गती देण्यासाठी, फॅब लॅब्सना औद्योगिक समूह, एमएसएमई हब व शैक्षणिक संस्थांमध्ये नवोन्मेष आणि प्रोटोटाइपिंग केंद्र म्हणून एकत्रित करणे आवश्यक आहे. या लॅब्स ३D प्रिंटिंग, CNC मशिनिंग आणि लेसर कटिंग सारख्या डिजिटल फॅब्रिकेशन तंत्रज्ञानाचा सामायिक वापर करतील, ज्यामुळे जलद प्रोटोटाइपिंग, लहान-तुकडी उत्पादन आणि प्रत्यक्ष-जगातील उत्पादन अडचणींची चाचणी शक्य होईल. इंटरनेट ऑफ थिंग्ज, एआय-चालित गुणवत्ता नियंत्रण व स्मार्ट ऑटोमेशन या बाबींचा समावेश करून फॅब लॅब्सची कार्यक्षमता वाढू शकते, कचरा कमी करू शकतात तसेच स्थानिकांना सहाय्य, मागणीनुसार उत्पादन, राज्याबाहेरील कारखान्यांवरील अवलंबित्व कमी करू शकतात. फॅब लॅब्स ह्या उद्योग ४.० साठी प्रशिक्षण केंद्र म्हणून देखील काम करतील, ज्यात डिजिटल उत्पादन आणि ऑटोमेशन यांमधील कौशल्ये शिकवून मनुष्यबळ तयार केले जाईल.

### २.२.२ गतिमान धोरण परिसंस्था

व्यवसाय सुलभता व जागतिक स्पर्धात्मकता सुनिश्चित करणारी प्रगतीशील, गुंतवणूकदार स्नेही आणि अनुकूल नियामक चौकट वाढवण्यासाठी ही धोरणात्मक परिसंस्था तयार करण्यात आली आहे. राज्यात अखंड मंजुरीसाठी नियतकालिक नियामक सुधारणा आणि एकल-खिडकी मंजुरी यंत्रणेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राज्याने या पूर्वीच लॉजिस्टिक्स, वस्त्रोद्योग, इलेक्ट्रिक वाहने, फिनटेक, माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा, अवकाश आणि संरक्षण तसेच नवीकरणीय ऊर्जा यांसह प्रमुख उद्योगांमध्ये क्षेत्र-निहाय धोरणे जाहीर केली आहेत. याव्यतिरिक्त, सेमीकंडक्टर, कृत्रिम बुद्धिमत्ता, डीप टेक आणि जैव तंत्रज्ञान यांसारख्या उदयोन्मुख क्षेत्रांसाठी नवीन धोरणांवर राज्य, सक्रियपणे काम करत असून भविष्यसज्ज उद्योगांमध्ये अग्रणी म्हणून स्वतःचे स्थान निर्माण करत आहे.

### २.२.२(अ) धोरण सनियंत्रण आणि पुनरावलोकन

महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ अंतर्गत प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता आणि विहीत मुदतीत निर्णय घेणे याची सुनिश्चिती करण्यासाठी एक मजबूत बहुस्तरीय प्रशासन चौकट स्थापन करण्यात आली आहे. यामध्ये विविध स्तरांवरील समर्पित समित्या आणि धोरण अंमलबजावणीचे निरीक्षण, मूल्यांकन आणि मार्गदर्शन करण्यासाठी एक धोरण संनियंत्रण युनिट (PMU) यांचा समावेश आहे.

**प्रमुख शासन-स्तरीय समित्या**

**अ) मंत्रिमंडळ उपसमिती**

मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २४/१२/२००४ च्या शासन निर्णय क्र. आयडीएल-१००४/ प्र.क्र. ३१८/उद्योग-८ आणि त्यानंतर केलेल्या सुधारणांनुसार मंत्रिमंडळ उपसमितीची रचना खालीलप्रमाणे आहे-

- **मा. मुख्यमंत्री** — **अध्यक्ष**
- **मा. उपमुख्यमंत्री** — **सदस्य**
- **मा. मंत्री (वित्त व नियोजन)** — **सदस्य**
- **मा. मंत्री (उद्योग)** — **सदस्य**
- **मा. मुख्य सचिव** — **कायम निमंत्रित**
- **अ. मु. स. (वित्त)** — **कायम निमंत्रित**
- **अ. मु. स./प्र. स./सचिव (उद्योग)** — **निमंत्रक**

उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनुसार धोरणात्मक महत्वाच्या मोठे, विशाल आणि अतिविशाल धोरणात्मक प्रकल्प, धोरणात्मक महत्वाचे प्राधान्य क्षेत्रातील प्रकल्प आणि उदयोन्मुख जिल्ह्यांतील प्रकल्पांसाठी विशेष प्रोत्साहने आणि सामुहिक एकत्रित प्रात्साहने मंजुरी देण्याचे अधिकार मंत्रिमंडळ उपसमितीला असतील. प्रस्तुत महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ यामध्ये शंका/समस्या/अडचण/तफावत निर्माण झाल्यास त्याबाबत निर्णय घेण्याचे आणि औद्योगिक धोरणात आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार मंत्रिमंडळ उपसमितीकडे असतील.

**ब) उच्चाधिकार समिती**

विशाल आणि अतिविशाल धोरणात्मकदृष्ट्या महत्वाच्या प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने आणि सानुकूलित सामुहिक प्रोत्साहने देय करण्यासाठी उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या शासन निर्णय, क्र. आयडीएल-१००५/ प्र.क्र. ८६/ उद्योग-८, दि. ०२ नोव्हेंबर, २००५ नुसार मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चाधिकार समिती गठित करण्यात आली आहे. सदर उच्चाधिकार समितीची सुधारित रचना व कार्यकक्षा खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता १: उच्चाधिकार समितीची रचना (HPC)**

| अ.क्र. | समिती सदस्य | पदनाम |
|---|---|---|
| १. | मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन | अध्यक्ष |
| २. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नियोजन | सदस्य |
| ३. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, वित्त | सदस्य |
| ४. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, उद्योग | सदस्य सचिव |
| ५. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, ऊर्जा | विशेष आमंत्रित |
| ६. | अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, नगरविकास -१ | विशेष आमंत्रित |
| ७. | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, कामगार | विशेष आमंत्रित |
| ८. | अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, वस्त्रोद्योग | विशेष आमंत्रित |
| ९. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ | विशेष आमंत्रित |
| १०. | विकास आयुक्त, (उद्योग) | निमंत्रित |
| ११. | वस्तू व सेवा कर आयुक्त | निमंत्रित |

उच्चधिकार समिती सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या प्रोत्साहनांचा प्रकार आणि एकूण मूल्य यांचा प्रकरणपरत्वे मूल्यांकन करण्यासाठी व निर्णय घेण्यासाठी जबाबदार असेल. समितीच्या कार्यकक्षेत मोठे, विशाल व अतिविशाल प्रकल्प, राज्यासाठी धोरणात्मक महत्वाचे प्राधान्य क्षेत्रातील प्रकल्प आणि उदयोन्मुख जिल्ह्यांतील प्रकल्पांचा अंतर्भाव असेल. सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत सार्वजनिक किंवा खाजगी क्षेत्राद्वारे राज्यात गुंतवणूक करणाऱ्या नवीन आणि विद्यमान प्रकल्पांसाठी विशेष प्रोत्साहने आणि सानुकूलित प्रोत्साहने अनुज्ञेय करणे तसेच अशा प्रोत्साहनांचे स्वरूप निश्चित करणे या बाबींची, मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीला शिफारस करण्याचा अधिकार उच्चाधिकार समितीला असेल.

**क) राज्यस्तरीय समिती (SLC)**

महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ आणि त्यापूर्वीच्या योजनांसह संबंधित सर्व मुद्द्यांवर निर्णय घेण्यासाठी खालील सदस्यांचा समावेश असणारी एक राज्यस्तरीय समिती (SLC) गठित करण्यात येत आहे. सदर समितीला अंमलबजावणी संस्था म्हणून योजनेच्या सुरळीत अंमलबजावणीसाठी, कोणताही अर्थ लावण्यासाठी व कोणत्याही फेरबदलाची शिफारस करण्यासाठी प्राधिकृत करण्यात येईल. उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्यांचा समावेश असलेली राज्यस्तरीय समिती, नवीन धोरणाच्या अंमलबजावणीच्या प्रगतीवर लक्ष ठेवेल.

- सचिव, वित्त — सदस्य
- राज्य कर आयुक्त — सदस्य
- मुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि.म. — सदस्य
- विकास आयुक्त (उद्योग) — सदस्य
- आयुक्त एमएसएमई, सेवा — सदस्य
- उद्योग सहसंचालक (साप्रोयो) — सदस्य सचिव

समितीच्या कार्यकक्षेतील कोणत्याही विषयावर निर्णय घेण्यापूर्वी समिती संबंधित क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घेऊ शकते. धोरणाशी संबंधित मुद्द्यांवर राज्य स्तरीय समिती धोरण संनियंत्रण गटासोबत समन्वय साधेल.

**ड) धोरण संनियंत्रण गट (PMU)**

याशिवाय, नवीन धोरणाची अंमलबजावणी आणि अंमलबजावणीच्या प्रगतीचे सनियंत्रण करण्यासाठी विकास आयुक्त (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली खालील सदस्यांचा समावेश असलेले एक धोरण सनियंत्रण गट स्थापित करण्यात येत आहे.

- विकास आयुक्त (उद्योग) — अध्यक्ष
- आयुक्त, एमएसएमई, सेवा — सदस्य
- अतिरिक्त विकास आयुक्त, मैत्री — सदस्य
- सहमुख्य कार्यकारी अधिकारी, म.औ.वि.म. — सदस्य
- सहसचिव / उपसचिव (उद्योग) — सदस्य
- उद्योग सहसंचालक (साप्रोयो) — सदस्य सचिव

धोरण सनियंत्रण गटाने घेतलेले निर्णय सक्षम स्तरावरील शासन मंजुरीनंतर अंमलात आणण्यात येतील.

धोरण सनियंत्रण गट संबंधित मुद्द्यांवर सचिव (उद्योग, गुंतवणूक आणि सेवा) यांच्या अध्यक्षतेखालील राज्य राज्यस्तरीय समितीला देखील मदत करेल. धोरण प्रसार, प्रोत्साहन आणि ग्रहण, क्षमता बांधणी आणि परिणाम देखरेख सुनिश्चित करण्यासाठी धोरणाच्या अर्थसंकल्पाच्या ०.५% किंवा दरवर्षी २० कोटी रुपये यापैकी जे कमी असेल ते, निधी उपलब्ध करण्यात येईल.

**२.२.२(ब)औद्योगिक सहकार्यासाठी क्षेत्रीय धोरणांचे एकत्रिकरण**

महाराष्ट्र राज्य समग्र आणि शाश्वत औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी उत्पादन, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम, लॉजिस्टिक्स, ऊर्जा आणि व्यापार यासारख्या प्रमुख क्षेत्रीय धोरणांसह त्याच्या औद्योगिक धोरणाच्या एक केंद्राभिमुखतेस व एकत्रिकरणास प्राधान्य देत आहे. यामध्ये टास्क फोर्स आणि कार्यगट यासारख्या आंतरविभागीय समन्वय यंत्रणा स्थापन करणे, क्षेत्रीय धोरणे व्यापक औद्योगिक उद्दिष्टांशी संरेखित करणे व वित्तीय प्रोत्साहने तसेच नियामक चौकटी सुलभ करणे यांचा समावेश आहे. राज्य अर्थसंकल्पीय सहाय्य, प्रोत्साहन योजना आणि क्षेत्र-विशिष्ट उपक्रम एकत्रित करून दुरुक्ती कमी करणे, धोरणात्मक प्रभावीपणा वाढवणे आणि गुंतवणुक आकर्षित करण्याचे उद्दिष्ट ठेवते.

**महाराष्ट्रातील प्रमुख क्षेत्रीय धोरणे खालीलप्रमाणे आहेत:**

| **२: महाराष्ट्राची प्रमुख क्षेत्रीय धोरणे** | | |
|---|---|---|
| **अ. क्र.** | **धोरणाचे नाव** | **थोडक्यात आढावा** |
| **१** | **महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५** | • महाराष्ट्र राज्याने २०३० पर्यंत सर्व नवीन वाहन नोंदणीपैकी ३०% इलेक्ट्रीक वाहनांची नोंदणी करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.<br>• मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजी नगर आणि अमरावती या सहा प्रमुख शहरी समूहांमधील राज्य वाहतूक उपक्रमच्या(STU) वाहन ताफ्यामध्ये ४०% इलेक्ट्रीक वाहने असणे आवश्यक आहे.<br>• या धोरणानुसार राष्ट्रीय आणि राज्य महामार्गांवर दर २५ किमी अंतरावर चार्जिंग स्टेशन बसवणे अनिवार्य आहे व सद्यस्थितीतील इंधन स्टेशन तसेच महाराष्ट्र राज्य |

| | | |
|---|---|---|
| | | मार्ग परिवहन महामंडळ आगार यांना व्यवहार्यतेनुसार जलद चार्जर बसविणे आवश्यक आहे. |
| २ | **महाराष्ट्र नवोपक्रम, उद्योजकता आणि नवोन्मेष धोरण २०२५** | • या धोरणात १.२५ लाख उद्योजकांना पाठिंबा देण्यासाठी आणि ५०,००० स्टार्टअप यांना मान्यता देण्यासाठी पाच वर्षांची रणनीती आखण्यात आली आहे.<br>• या धोरणात रु.५०० कोटींचा महा-निधी, अर्थसहाय्यित कर्जे, इन्क्युबेशन पायाभूत सुविधा, जागतिक स्टार्टअप एक्सचेंज आणि नवी मुंबईत ३०० एकरच्या नवीन महाराष्ट्र इनोव्हेशन सिटीसाठी तरतुदी आहेत.<br>• इच्छुक उद्योजक ३ % अर्थसहाय्यित व्याजदराने रु.५ लाख ते रु.१० लाख पर्यंतचे कर्ज मिळण्यास पात्र असतील. |
| ३ | **महाराष्ट्र जहाजबांधणी, जहाज दुरुस्ती आणि जहाज पुनर्वापर धोरण २०२५** | • हे धोरण केंद्र सरकारच्या मेरीटाईम इंडिया व्हिजन २०३० आणि मेरीटाईम अमृत काल व्हिजन २०४७ शी सुसंगत आहे, ज्यामध्ये महाराष्ट्र राज्याने जहाजबांधणी आणि संबंधित सेवांमध्ये राष्ट्रीय प्रयत्नांचा एक तृतीयांश वाटा उचलण्याचे लक्ष्य ठेवले आहे.<br>• जहाजबांधणी किंवा पुनर्वापराच्या पायाभूत सुविधा उभारणाऱ्या विकासकांना प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के किंवा रु. ५ कोटी इतके भांडवली सहाय्य मिळेल.<br>• कार्यक्षमता आणि सहकार्य वाढविण्यासाठी अनेक शिपयार्ड्स असलेल्या सागरी शिपयार्ड समूहांचा विकास. |
| ४ | **महाराष्ट्र कृत्रिम वाळू (एम-सँड) प्रचालन धोरण, २०२५** | • नदीच्या वाळूवरील अवलंबित्व कमी करुन नदीच्या परिसंस्थेचे संरक्षण करणे<br>• खाणकाम क्षेत्रातील अशुध्द धातुमय थरावर असलेल्या गाळातून एम-सँड उत्पादनास उत्तेजन देणे<br>• एम-सँड युनिटसकरीता प्रमाणीकृत दर्जा व प्रमाणन प्रक्रीया<br>• एम-सँड उत्पादन युनिट उभारण्यासाठी प्रोत्साहन व नियामक सहाय्य पुरविणे |
| ५. | **महाजेनकोचे अॅश धोरण, २०२५** | • महाजेनकोच्या प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या फ्लाय अॅशचा १०० % वापर करणे<br>• सिमेंट, वीटा, रस्ते बांधकाम आणि शेतीमध्ये फ्लाय अॅशच्या वापरास चालना देणे.<br>• फ्लाय अॅश वापरणाऱ्या उद्योगांना व संस्थांना प्रोत्साहने व सुलभ लॉजिस्टिक्सच्या इतर सोयी.<br>• योग्य विल्हेवाट व पुनर्वापर सुनिश्चित करण्यासाठी पर्यावरणीय सुरक्षा व संनियंत्रण यंत्रणा यावर भर दिला आहे. |
| ६ | **महाराष्ट्राचे लॉजिस्टिक्स धोरण २०२४** | • कार्यक्षमता सुधारून आणि खर्च कमी करून महाराष्ट्राला जागतिक पुरवठा साखळीचा भाग बनविणे.<br>• पारंपारिक गोदामापासून अद्ययावत, स्मार्ट आणि शाश्वत पायाभूत सुविधांचा वापर करणारा पूर्णपणे एकात्मिक मूल्यवर्धित लॉजिस्टिक सेवांचा प्रदाता म्हणून अद्ययावत करणे.<br>• लास्ट माईल कनेक्टिव्हिटी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील एकंदरीत लॉजिस्टिकच्या पायाभूत सुविधा मध्ये सुधारणा करणे. |
| ७. | **महाराष्ट्र पर्यटन धोरण-२०२४** | • १० वर्षांत पर्यटन क्षेत्रात रु. १,००,००० कोटींची खाजगी गुंतवणूक आकर्षित करणे.<br>• तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि कामकाजात खाजगी क्षेत्रातील तज्ज्ञांचा वापर करून १८ लाख रोजगार (प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष) निर्माण करणे.<br>• पर्यटन स्थळे विकसित करून, पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करून आणि टूर ऑपरेटर, MICE(Meetings, Incentives, Conferences, Exhibitions) आणि डेस्टिनेशन वेडिंगला प्रोत्साहन देऊन पर्यटकांचा ओघ दुप्पट करणे.<br>• पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक सुलभ करणे. |

| | | |
|---|---|---|
| ८. | **महाराष्ट्र एकात्मिक व शाश्वत वस्त्रोद्योग धोरण, २०२३** | • राज्यात पुढील पाच वर्षांत २५,००० कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे आणि ५ लाखापर्यंत रोजगार निर्माण करणे.<br>• राज्यात उत्पादित कापसावर येत्या ५ वर्षात प्रक्रिया क्षमता ३० टक्क्यावरुन ८० टक्क्यापर्यंत वाढविणे.<br>• राज्यातील वस्त्रोद्योग मुल्य साखळीला चालना देण्यासाठी अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि तांत्रिक प्रगतीला चालना देणे.<br>• राज्यात ६ महसुली विभागात प्रत्येकी १ असे एकूण ६ टेक्निकल टेक्सटाईल पार्कचा विकास करणे. रु.४००कोटी - रू.१००० कोटी स्थिर भांडवली गुंतवणूक असलेल्या पार्कसाठी ५५% किंवा रू.२५० कोटी यापैकी जे कमी असेल ते भांडवली अनुदानास (सर्व झोन) पात्र असेल.<br>• जिनिंग आणि प्रेसिंग, खाजगी सूतगिरण्या, खाजगी यंत्रमाग, प्रोसेसिंग, निटींग, होजिअरी, गारमेंटिंग, अपारंपरिक सूत/धागा आणि सिंथेटिक सूत/धागा, वैयक्तिक टेक्नीकल टेक्सटाईल घटकांना झोननिहाय २५ ते ४५ टक्क्यापर्यंत भांडवली अनुदान, तसेच राज्यातील सूतगिरण्या आणि यंत्रमाग घटकांना Maha-TUFS योजनेन्वये झोननिहाय पात्र यंत्रसामुग्रीच्या मूळ किंमतीच्या २५ ते ४० टक्के किंवा रु. १० कोटी ते २५ कोटी यापैकी जे कमी असेल इतके भांडवली अनुदान देण्यात येत आहे.<br>• राज्यातील ६ महसूल विभागात प्रत्येकी ३ असे एकुण १८ लघु वस्त्रोद्योग संकुले उभारण्यात येणार आहेत. सदर योजनेंतर्गत एकूण प्रकल्प किंमतीवर (जमीन, बांधकाम, यंत्रसामग्री,सौरऊर्जेच्या खर्चासह) होणाऱ्या ४०% खर्चाची रक्कम किंवा रु. ३० कोटी यापैकी जे कमी असेल तेवढे भांडवली अनुदान देण्यात येईल.<br>• हरित आणि शाश्वत उत्पादनाला प्रोत्साहन देण्यासाठी ETP साठी ५०% भांडवली अनुदान (किंवा जी रक्कम रु.५ कोटीपेक्षा कमी असेल), ZLD साठी ५०% भांडवली अनुदान (किंवा जी रक्कम रु.१० कोटींपेक्षा कमी असेल) आणि सौर प्रकल्पाच्या खर्चाच्या २०% (किंवा जी रक्कम रु.४.८ कोटींपेक्षा कमी असेल) भांडवली अनुदानासह सौर ऊर्जा प्रकल्पांना मदत देण्यात येत आहे. |
| ९. | **महाराष्ट्र राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३** | • महाराष्ट्रातून होणारी निर्यात दुप्पट करुन आर्थिक वर्ष २०२२-२३ मधील सध्याचे मुल्य ७२ अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून आर्थिक वर्ष २०२७-२८ पर्यंत १५० अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचवणे.<br>• पुढील ५ वर्षांत महाराष्ट्रात जागतिक दर्जाचे ३० निर्यातभिमुख औद्योगिक पार्क विकसित करणे.<br>• २०३० पर्यंत देशाच्या १ ट्रिलियन डॉलर्सच्या निर्यातीच्या उद्दिष्टात राज्याचा एकूण सहभाग २२% इतका वाढविणे. |
| १०. | **महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान/ माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण, २०२३** | • राज्यातील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्रात रु. ९५,००० कोटींची नवीन गुंतवणूक आकर्षित करणे.<br>• राज्यात माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्राद्वारे नवीन ३५ लाख रोजगार संधी निर्माण करणे. त्यासाठी, उच्च रोजगारक्षम, प्रतिभावान आणि दर्जेदार मनुष्यबळ विकसित करण्यासाठी कौशल्यवृध्दीत दरवर्षी १५% वाढ करणे.<br>• राज्यातील माहिती तंत्रज्ञान/माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा क्षेत्राद्वारे रु. १०,००,००० कोटींची निर्यात साध्य करणे. |

| | | |
|---|---|---|
| ११. | **महाराष्ट्र अवकाश आणि संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण २०१८** | • पुढील पाच वर्षांत अवकाश आणि संरक्षण क्षेत्रात २ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक आकर्षित करणे.<br>• उद्योगातील भागधारकांच्या सहकार्याने जागतिक दर्जाचे कुशल मनुष्यबळ विकसित करणे.<br>• पाच वर्षांच्या कालावधीत १ लाख रोजगाराच्या संधी निर्माण करणे.<br>• अवकाश आणि संरक्षण क्षेत्रासाठी देशी प्रगत तंत्रज्ञान विकसित करण्यास चालना देणे.<br>• जागतिक स्तरावर स्पर्धा करण्यासाठी संरक्षण क्षेत्रातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना चालना देणे. |
| **१२** | **महाराष्ट्र राज्य काथ्या उद्योग विकास धोरण २०१८** | • राज्यात काथ्या उद्योगाद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करून ग्रामीण उद्योजकतेला चालना देणे.<br>• काथ्या व काथ्या-आधारित उत्पादनांच्या मूल्यवर्धनाद्वारे महिला उद्योजकता विकासाद्वारे महिला सक्षमीकरणाला चालना देणे.<br>• भारतात आणि भारताबाहेर शाश्वत आणि पर्यावरणपूरक काथ्या आणि काथ्या-आधारित उत्पादनांच्या वापराला चालना देणे.<br>• काथ्या आणि काथ्या-आधारित उत्पादनांसाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठ विकसित करणे.<br>• नारळाच्या सोडणांचा (coir husk) जास्तीत जास्त वापर करून नारळाच्या लागवडीला प्रोत्साहन देणे. |
| **१३** | **महाराष्ट्र किरकोळ व्यापार धोरण २०१६** | • देशांतर्गत किरकोळ व्यापार क्षेत्रात महाराष्ट्राचे अग्रस्थान कायम ठेवणे.<br>• राज्यातील कमी विकसित विभागांमध्ये गुंतवणुकीचा ओघ अधिक वेगवान करणे.<br>• सर्व विभागातील समाजाच्या सर्व घटकांमधील, विशेषतः ग्रामीण भागातील तरुणांना किरकोळ व्यापार क्षेत्रात शिक्षित करुन रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे.<br>• राज्याच्या सामाजिक-आर्थिक विकासासाठी किरकोळ व्यापाराचा वापर एक साधन म्हणून करणे.<br>• जागतिकीकरणाला तोंड देण्यासाठी विद्यमान असंघटित लहान किरकोळ विक्रेत्यांना बळकटी देणे. |
| **१४** | **महाराष्ट्र इलेक्ट्रॉनिक्स धोरण २०१६** | • महाराष्ट्राला जागतिक स्तरावर २०२० पर्यंत १२.०० अब्ज डॉलर्सची उलाढाल साध्य करण्याचे उद्दिष्ट असलेले मान्यताप्राप्त इलेक्ट्रॉनिक रचना, प्रणाली व उत्पादक (ESDM) उद्योग केंद्र म्हणून स्थापित करणे आणि या क्षेत्रात ३.०० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करून १,००,००० लोकांसाठी अतिरिक्त रोजगार निर्मिती करणे.<br>• २०२० पर्यंत ESDM उद्योग क्षेत्राची निर्यात २.०० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढविणे.<br>• ESDM उद्योग क्षेत्रात कुशल मनुष्यबळाची उपलब्धता वाढविण्यासाठी उद्योगातील भागधारकांच्या सक्रिय सहकार्याने प्रभावी उपाययोजना सुरू करणे.<br>• ESDM उद्योग आणि नॅनो इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी संशोधन आणि विकासासाठी अधिक निधी देऊन ESDM उद्योग क्षेत्रात बौद्धिक संपदा (IP) निर्मितीला प्रोत्साहन देणे.<br>• ESDM उद्योग क्षेत्राच्या विशिष्ट गरजा पूर्ण करण्यासाठी शासनांतर्गत विशेष प्रशासन संरचना निर्माण करणे.<br>• केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार ई-कचऱ्याच्या व्यवस्थापनात सर्वोत्तम पद्धतींचा जलद अवलंब करणे. |

उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाने जाहीर केलेल्या भविष्यातील सर्व धोरणे उपरोक्त धोरणात नमूद केलेल्या तरतुदी आणि धोरणात्मक निर्देशांशी सुसंगत आणि एकत्रित केले जातील. विभागाने AVGC-XR धोरण-२०२५, जागतिक क्षमता केंद्र (GCC) धोरण-२०२५, रत्ने आणि आभूषणे धोरण-२०२५, महाराष्ट्र बांबू उद्योग धोरण-२०२५ जाहीर केले आहे आणि पुढील क्षेत्रांसाठी समर्पित धोरणे प्रस्तावित आहेत — सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम; अवकाश, संरक्षण आणि अंतराळ तंत्रज्ञान; इलेक्ट्रॉनिक्स, डिस्प्ले आणि फॅब; मीडिया आणि एन्टरटेन्मेट; लेदर-नॉन-लेदर, पादत्राणे, पोशाख आणि ॲक्सेसरी; सक्रिय औषध घटक (API); चक्रीय अर्थव्यवस्था; वस्त्रे आणि पोषाख.

### २.२.३ प्राधान्य क्षेत्र व थ्रस्ट सेक्टर (उत्पादनांतर्गत)

### २.२.३ (अ) प्राधान्य क्षेत्र

मजबूत बाजारपेठ परिसंस्था आणि दीर्घकालीन गुंतवणूकदारांचा विश्वासर्हता वाढवण्यासाठी उत्पादन क्षेत्रातील धोरणात्मक प्राधान्य क्षेत्रांची ओळखणे महत्त्वाचे आहे. जागतिक गुंतवणुकीचा कल पाहता, राज्य स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी भविष्यासाठी उद्योगांचा रणनितीक विकास करत आहे. या धोरणात महाराष्ट्र राज्याच्या क्षमतेचा लाभ घेण्यासाठी व रोजगार, गुंतवणूक, निर्यात, नवोन्मेष, उदयोन्मुख उद्योग, आर्थिक वाढ, शाश्वतता आणि तंत्रज्ञानाला चालना देण्यासाठी खालील १६ निर्णायक प्राधान्य क्षेत्रांची रूपरेषा देण्यात आली आहे, यामुळे राज्याला एक अग्रगण्य जागतिक व्यवसाय हब म्हणून स्थान मिळणार आहे.

१. प्रगत साहित्य ( Advanced Materials )
२. अवकाश, संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान, अणु तंत्रज्ञान आणि जहाजबांधणी
३. कृषी आणि अन्न प्रक्रिया (द्वितीय आणि तृतीय प्रक्रिया घटक मांस प्रक्रीयेसह)
४. वाहन उद्योग आणि वाहनांचे सुटे भाग (ईव्ही, हायब्रिड आणि हायड्रोजन फ्युएल वाहनांसाठी)
५. बॅटरी आणि ऊर्जा साठवणूक (डेटा सेंटर आणि हायड्रोजन फ्युएल सेल यांसह)
६. रसायने आणि पेट्रोकेमिकल्स (कोल गॅसीफिकेशन पुढाकारासह)
७. पादत्राणे आणि चामड्यांचे उत्पादने
८. रत्ने आणि आभूषणे (प्रयोगशाळेत तयार केलेल्या हिऱ्यांसह)
९. यंत्रसामग्री आणि उपकरणे उत्पादन (नवीकरणीय ऊर्जा आणि दूरसंचार यासह)
१०. खनिज-आधारित उद्योग
११. औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, मेड-टेक आणि जीवनविज्ञान
१२. सेमी-कंडक्टर्स फॅब्रिकेशन (FAB) डिस्प्ले फॅबसह आणि इलेक्ट्रॉनिक्स सिस्टम डिझाइन आणि मॅन्युफॅक्चरिंग( ESDM)
१३. स्मार्ट उत्पादन (उद्योग ४.० आणि ५.०)
१४. शाश्वत उत्पादन आणि चक्रीय अर्थव्यवस्था (पुनर्वापरासह)
१५. वस्त्र व परिधान (तांत्रिक वस्त्रोद्योग, टिकाऊ फॅब्रिक यांसह)
१६. सोलार वेफर्स, हरित हायड्रोजन आणि हरित अमोनिया

महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरणांतर्गत उपरोक्त प्राधान्य क्षेत्रांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे:

### १. प्रगत साहित्य ) Advanced Materials (

महाराष्ट्र राज्याच्या महत्त्वाकांक्षी पुढील पिढीमध्ये प्रगत साहित्याचे उत्पादन हे केंद्रस्थानी आहे, या प्रगत साहित्यात अवकाश संरक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रांमध्ये उच्च-मूल्य उपयोजनांचा समावेश आहे. भारताची प्रगत साहित्य बाजारपेठ एक धोरणात्मक संधीचा लाभ प्रदान करते. राज्य उच्च-कार्यक्षमता मिश्रधातू, नॅनोमटेरियल, कंपोझिट, प्रगत सिरेमिक्स, ग्राफीन-आधारित सोल्यूशन्स, प्रगत काच आणि फंक्शनल कोटिंग्ज विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करेल, यामुळे राज्य नवनिर्मितीक्षम, साहित्य-केंद्रित उद्योगांसाठी राष्ट्रीय हब बनू शकेल.

### २. अवकाश, संरक्षण, अवकाश तंत्रज्ञान, अणु तंत्रज्ञान आणि जहाजबांधणी

सन २०३० पर्यंत भारताचे अवकाश व संरक्षण क्षेत्रामध्ये २५ अब्ज डॉलर्सवरून ७० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढ होण्याचे अंदाजित असल्याने महाराष्ट्र राज्य हे या धोरणात्मक क्षेत्रात आघाडीवर येण्यास अतिशय अनुकूल स्थितीत आहे. राज्याचा औद्योगिक पाया आणि विद्यमान समूह मानवरहित हवाई वाहने (UAVs) आणि ड्रोन, संरक्षण इलेक्ट्रॉनिक्स, MRO (देखभाल, दुरुस्ती आणि सुधारणा) युनिट्स, जहाजबांधणी आणि अवकाश-तंत्रज्ञान घटकांचा विस्तार करण्यासाठी एक मजबूत प्रारंभिक व्यासपीठ तयार करुन देतील. केंद्रित उपाययोजनांमुळे उच्च-कौशल्यपूर्ण रोजगार निर्मिती, तंत्रज्ञान निर्यात आणि जागतिक पुरवठा साखळी यांमध्ये एकात्मता येण्यास मदत होईल. ऊर्जा, नवोन्मेष आणि धोरणात्मक विकासासाठी अणु तंत्रज्ञानाच्या प्रगती आणि सुरक्षित वापराला पाठिंबा देण्यात येईल.

### ३. कृषी आणि अन्न प्रक्रिया (द्वितीय आणि तृतीय अन्न प्रक्रिया घटक मांस प्रक्रियेसह)

भारतातील अन्न प्रक्रिया उत्पादनात महाराष्ट्राचा वाटा १३ % असून या उत्पादन प्रक्रियेत गोठलेले अन्न, जैवइंधन, इथेनॉल आणि कम्प्रेस्ड बायोगॅस (CBG) यासह द्वितीय आणि तृतीय अन्न प्रक्रियांवर मांस प्रक्रियेसह लक्ष केंद्रित केले आहे. प्रगत कृषी प्रक्रियेद्वारे मूल्यवर्धन, निर्यात आणि ग्रामीण रोजगार वाढवणे हे राज्याचे उद्दिष्ट आहे .

- **प्राथमिक कृषी/अन्न प्रक्रिया:** शेती उत्पादनांचे रूपांतर खाण्यायोग्य अशा पदार्थात केलेले असते. या श्रेणीमध्ये धान्य वाळवणे, मळणी करणे, विणणे आणि दळणे, काजू सोलणे इत्यादी प्रक्रियांद्वारे तयार केलेले घटक समाविष्ट आहेत.

- **द्वितीय कृषी / अन्न प्रक्रिया:** द्वितीय अन्न प्रक्रिया ही तयार असलेल्या घटकांपासून अन्न तयार करण्याची दैनंदिन प्रक्रिया आहे. बेकरीमध्ये ब्रेड भाजणे हे द्वितीय अन्न प्रक्रियेचे एक उदाहरण आहे. द्वितीय अन्न प्रक्रियेमध्ये प्राथमिक प्रक्रिया केलेल्या अन्न / कृषी घटकांची यांत्रिक प्रक्रिया समाविष्ट आहेत.

- **तृतीय कृषी / अन्न प्रक्रिया:** तृतीय अन्न प्रक्रिया म्हणजे सामान्यतः प्रक्रिया केलेले अन्न म्हणून ओळखल्या जाणाऱ्या यांत्रिकीकृत व्यावसायिक उत्पादन. हे खाण्यास तयार असणारे (Ready to eat) किंवा गरम करून वाढणारे अन्न (Heat and serve food) असते, जसे की टीव्ही डिनर आणि रि-हिटेड एअरलाईन मिल्स.

संशोधन आणि विकास, तंत्रज्ञानाचा अवलंब, कापणीनंतरच्या पायाभूत सुविधांसह मजबूत मूल्य साखळी तयार करणे, कृषी तंत्रज्ञान, प्रक्रिया क्षेत्रात खाजगी व सार्वजनिक गुंतवणुकीला चालना देणे तसेच दीर्घकालीन स्पर्धात्मकतेसाठी जागतिक बाजारपेठेतील एकात्मता मजबूत करणे याद्वारे शाश्वत कृषी विकासाला चालना देण्यासाठी उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभाग कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाला मदत करेल.

### ४. वाहन उद्योग आणि वाहनांचे सुटे भाग (इलेक्ट्रिक वाहन, हायब्रिड आणि हायड्रोजन फ्युएल वाहनांसाठी)

महाराष्ट्र राज्य हे भारतातील वाहन उद्योग हब असून ते देशाच्या उत्पादनाच्या सुमारे २०% इतक्या वाहनांचे उत्पादन करते. इलेक्ट्रिक वाहने, हायब्रिड वाहने आणि हायड्रोजन फ्युएल वाहनांच्या निर्मितीला चालना देऊन शाश्वत गतीशील अशा उपाययोनांसाठी रुपांतरण घडवून आणण्याकरिता राज्य वचनबद्ध आहे. महाराष्ट्राच्या सकल राज्यांतर्गत उत्पादनामध्ये (GSDP) वाहन उद्योग क्षेत्राचे ७% पेक्षा अधिक योगदान असल्याने वाहन उद्योगात राज्याचे नेतृत्व मजबूत होईल आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्याच्या राष्ट्रीय ध्येयाला समर्थन देईल. वाहनयंत्रणा आणि AI-चालित डिझाइन सारख्या अत्याधुनिक उत्पादन तंत्रज्ञानामुळे इलेक्ट्रीक वाहने आणि पर्यायी इंधन वाहनांसाठी उत्पादन प्रक्रिया सुलभ होतील, कार्यक्षमता सुनिश्चित होईल आणि खर्च कमी होईल. तसेच विहीत वेळेत पाठपुरावा करणे आणि ऊर्जा व्यवस्थापन प्रणालींसाठी इंटरनेट ऑफ थिंग्ज-सक्षम सेन्सर्स वाहनांची शाश्वतता आणि विश्वासार्हता सुधारेल, यामुळे हरित गतिशील क्रांतीमध्ये महाराष्ट्र राज्याची भूमिका अधिक बळकट होण्यास मदत होईल.

### ५. बॅटरी आणि ऊर्जा साठवणूक (डेटा सेंटर आणि हायड्रोजन फ्युएल सेल यांसह)

महाराष्ट्र राज्यातील डेटा सेंटरची क्षमता २०२५ पर्यंत दुप्पट होण्याचा अंदाज असल्याने राज्य बॅटरी तंत्रज्ञान आणि सर्व्हर यांच्या विकासाला प्राधान्य देत आहे. महाराष्ट्र राज्याच्या औद्योगिक विकासासाठी, स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी

आणि इलेक्ट्रिक मोबिलिटी परिसंस्थेमध्ये बॅटरी स्टोरेज हा एक महत्त्वाचा घटक आहे. बॅटरी मूल्य साखळी मजबूत केल्याने ऊर्जा सुरक्षा वाढेल, आयातीवरील अवलंबित्व कमी होईल आणि जागतिक गुंतवणूक आकर्षित होईल, यामुळे राज्याला प्रगत ऊर्जा क्षेत्रातील एक प्रमुख भूमिका बजावणारे राज्य म्हणून स्थान मिळेल. महाराष्ट्र गिगाफॅक्टरीज, प्रगत सेल उत्पादन आणि पुनर्वापर घटकांना प्रोत्साहन देऊन बॅटरी उत्पादन परिसंस्थेला सक्रियपणे चालना देत आहे. राज्याने जागतिक बॅटरी उत्पादक आणि तंत्रज्ञान कंपन्यांना आकर्षित करण्यासाठी मजबूत औद्योगिक पाया, कुशल मनुष्यबळ आणि धोरणात्मक प्रोत्साहनांचा लाभाचे ध्येय ठेवले आहे.

### ६. रसायने आणि पेट्रोकेमिकल्स (कोल गॅसीफिकेशन पुढाकारासह)

महाराष्ट्र राज्य हे मुंबई आणि रायगड यासारख्या प्रमुख रिफायनरी आणि केमिकल हबचे माहेरघर असून राज्य भारतातील ३०० अब्ज डॉलर्सच्या रासायनिक उद्योगात महत्त्वाची भूमिका बजावत आहे, जी २०३० पर्यंत ३८३ अब्ज डॉलर्स पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आणि त्याचा CAGR सुमारे १०% असणार आहे. हे धोरण कच्च्या तेलापासून रसायने (COTC), पॉलिमर, स्पेशॅलिटी केमिकल्स आणि ग्रीन हायड्रोजन एकात्मतेला चालना देईल. हे क्षेत्र कापड, प्लास्टिक आणि पॅकेजिंगसह व्यापक औद्योगिक पायाला पाठिंबा देत असून ते उत्पादन क्षेत्रातील स्पर्धेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती सक्षम करणे, उत्सर्जन कमी करणे आणि औद्योगिक शाश्वततेला समर्थन देणे यांसाठी कोळसा गॅसिफिकेशन तंत्रज्ञानाला चालना देते.

### ७. पादत्राणे आणि चामड्याचे उत्पादने

महाराष्ट्र राज्यात चामडे आणि पादत्राणे क्षेत्रातील न वापरलेली क्षमता असून हा उद्योग सध्या औद्योगिक स्थूल राज्यांतर्गत उत्पादनामध्ये १% योगदान देत आहे. भारतीय उद्योग २०३० पर्यंत १७.३ अब्ज डॉलर्सवरून ४७ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याचे अपेक्षित असून, राज्य समर्पित समूह, सीईटीपी आणि तंत्रज्ञान सुधारणा यांमध्ये गुंतवणूक करणार आहे. नवीन लक्ष्यित क्षेत्रांमध्ये तयार चामडे प्रक्रिया, पर्यावरणपूरक टॅनिंग, पादत्राणे डिझाइन आणि चामड्याच्या वस्तूंचे उत्पादन यांचा समावेश असून यामुळे ग्रामीण रोजगार निर्मिती व निर्यात वाढविण्यास मदत होईल.

### ८. रत्ने आणि आभूषणे (प्रयोगशाळेत तयार केलेल्या हिऱ्यांसह)

महाराष्ट्र, विशेषतः मुंबई हे भारतातील ७८.५ अब्ज डॉलर्सच्या रत्ने आणि दागिन्यांच्या उद्योगाचे नेतृत्व करते, हा उद्योग २०३० पर्यंत १०० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. राज्याच्या धोरणात हिरे कटींग, प्रयोगशाळेत तयार केलेले हिरे, हस्तनिर्मित दागिने आणि सोन्याचे शुद्धीकरण वाढविणे यांवर विशेष लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे. मुंबई हे जागतिक व्यापार हब असल्याने कौशल्य सुधारणा, नवोन्मेष आणि जागतिक बाजारपेठेतील दुवे यांच्या माध्यमातून राज्याचे वर्चस्व अधिक मजबूत करण्याचे ध्येय आहे.

### ९. यंत्रसामग्री आणि उपकरणे उत्पादन (नवीकरणीय ऊर्जा आणि दूरसंचार यासह)

सुमारे ९७ अब्ज डॉलर किमतीचे भांडवली वस्तू क्षेत्र औद्योगिक वाढीचा पाया मजबूत करते. अभियांत्रिकीमधील अचूकता आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम उत्पादनातील राज्याच्या क्षमतेमुळे महाराष्ट्र राज्य रोबोटिक्स, ऑटोमेशन आणि औद्योगिक यंत्रसामग्री या क्षेत्रांमध्ये आघाडीवर आहे. वस्त्रोद्योग आणि अन्न प्रक्रिया यंत्रसामग्री, नवीकरणीय ऊर्जा आणि दूरसंचार, उच्च-तंत्रज्ञान उपकरणांसाठी केंद्रित समर्थन दिल्यामुळे देशांतर्गत क्षमतेला चालना मिळेल आणि महत्त्वाच्या औद्योगिक हार्डवेअरवरील आयातीवरील राज्याचे अवलंबित्व कमी होईल.

### १०. खनिज-आधारित उद्योग

महाराष्ट्र राज्य हे चुनखडी, बॉक्साईट आणि लोहखनिज यांसारख्या संसाधनांनी समृद्ध असून हा खनिज-आधारित उद्योगांसाठी एक मजबूत पाया आहे. भारताच्या खनिज क्षेत्राचे मूल्य ६३.६ अब्ज डॉलर्स (आर्थिक वर्ष २०२४२५ मध्ये)

असून, राज्य एकात्मिक सिमेंट समूह, सिरेमिक्स, धातू प्रक्रिया आणि दुर्मिळ धातू, दुर्मिळ खनिजे (Rare Earth Minerals) इ. वर लक्ष केंद्रित करेल. पायाभूत सुविधांच्या विकास, प्रादेशिक रोजगार आणि मूल्यवर्धित कच्च्या मालाचा वापर यांसाठी हे उद्योग क्षेत्र महत्त्वाचे आहेत.

**११. औषधनिर्माण, जैवतंत्रज्ञान, मेड-टेक आणि जीवनविज्ञान**

महाराष्ट्र राज्य हे भारताची औषधनिर्माण क्षेत्रातील राजधानी असून हे क्षेत्र राष्ट्रीय औषध उत्पादनात २०% पेक्षा अधिक आणि जैवतंत्रज्ञान उद्योगांमध्ये ३०% योगदान देते. भारताच्या औषधनिर्माण क्षेत्राचे मूल्य १०० अब्ज डॉलर्स आहे व जैवतंत्रज्ञान क्षेत्राचे मूल्य ३०० अब्ज डॉलर्सपेक्षाही अधिक असून हे उद्योग क्षेत्र दुहेरी अंकातील वाढ साध्य करण्यासाठी सज्ज आहे. राज्य हे एपीआय, जेनेरिक्स, बायोसिमिलर, जीन थेरपी, लस आणि प्रिसिजन मेडीसिनवर लक्ष्य केंद्रित करेल. मुंबई आणि पुण्यातील समूहांचा वापर करून संशोधन व विकास तसेच जैव उत्पादन क्षेत्रात जागतिक हब बनण्याचे राज्याचे ध्येय आहे.

**१२. सेमी-कंडक्टर्स फॅब्रिकेशन (FAB) डिसप्ले फॅबसह आणि इलेक्ट्रॉनिक्स सिस्टम डिझाइन आणि मॅन्युफॅक्चरिंग (ESDM)**

भारताचा विद्यमान (सन २०२४-२५ मध्ये) ५२ अब्ज डॉलर्सचा सेमीकंडक्टर बाजार २०३० पर्यंत १०३.४ अब्ज डॉलर्सच्या पुढे जाण्याचा अंदाज असून १३% चक्रवाढ वाढीचा वार्षिक दराने (CAGR) वाढत आहे. महाराष्ट्र राज्य, चिप फॅब्रिकेशन, फॅबलेस डिझाइन, पीसीबी, एलईडी, एलसीडी आणि इतर मोबाइल घटकांसह सेमीकंडक्टर आणि डिस्प्ले उत्पादन निर्मितीला प्राधान्याने चालना देत आहे. पायाभूत सुविधा, प्रोत्साहने आणि प्रतिभा विकास सक्षम करून, इलेक्ट्रॉनिक्स स्वावलंबनाच्या राष्ट्रीय मोहिमेला बळकटी देण्याचा आणि सेमीकंडक्टर मूल्य-साखळीतील अग्रणी म्हणून उदयास येण्याचा राज्य प्रयत्न करीत आहे.

**१३. स्मार्ट उत्पादन (उद्योग ४.० आणि ५.०)**

स्मार्ट उत्पादन हा एक प्रमुख घटक असलेला भारतातील औद्योगिक स्वयंचलित बाजार १४.२६% चक्रवाढ वाढीचा वार्षिक दराने (CAGR) वाढण्याचा अपेक्षित असून आर्थिक वर्ष २०२९ पर्यंत अंदाजे ३० अब्ज डॉलर्स पर्यंत पोहोचेल. स्मार्ट उत्पादन प्रणाली तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात समावेश करणारे इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन क्षेत्र आर्थिक वर्ष २०३०-३१ पर्यंत व्यवसाय परिस्थितीअनुरूप २७८ अब्ज डॉलर्स पर्यंत आणि महत्त्वाकांक्षी वाढीच्या धोरणांतर्गत ५०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. उद्योग ४.० आणि ५.० च्या अवलंबनात नेतृत्व करण्याच्या दृष्टिकोनासह, औद्योगिक उत्पादकता वाढविण्यासाठी औद्योगिक आयओटी, एआय, थ्रीडी प्रिंटिंग, क्वांटम टेक, डिजिटल ट्विन्स, रोबोटिक्स, नॅनोटेक्नॉलॉजी, ऑप्टिक्स आणि सायबर-फिजिकल प्रणालींना राज्य सहाय्य देईल. स्पर्धात्मकता आणि पुरवठा साखळी लवचिकता वाढविण्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम डिजिटल साधनांनी सुसज्ज असतील.

**१४.शाश्वत उत्पादन आणि चक्रीय अर्थव्यवस्था (पुनर्वापरासह)**

महाराष्ट्र जागतिक पर्यावरणीय, सामाजिक व शासन (ESG) निकषांशी सुसंगत राहून आपल्या औद्योगिक डीएनएमध्ये शाश्वतता अंतर्भूत करत आहे. भारताच्या शाश्वत उत्पादन क्षेत्राची प्रभावीदराने वाढ अपेक्षित असल्याने, राज्य ग्रीन स्टील आणि सिमेंट, पर्यावरणपूरक वस्त्रोद्योग, कचऱ्यापासून ऊर्जा, आणि चक्रीय पॅकेजिंगवर लक्ष केंद्रित करेल. भारताच्या उत्पादनात महत्त्वपूर्ण वाटा असलेल्या सिमेंट आणि स्टील उद्योग समूहापुढे कार्बन उत्सर्जनाचे प्रमाण कमी करणे आणि संसाधन कार्यक्षमतेचे लक्ष्य ठेवले जाईल.

**१५.वस्त्र आणि परिधान (तांत्रिक वस्त्रोद्योग, टिकाऊ फॅब्रिक यांसह)**

महाराष्ट्र राज्य हे भारताचे सर्वात मोठे वस्त्रोद्योग पॉवरहाऊस असून देशाच्या एकूण वस्त्र व पोशाख उत्पादनात राज्याचे १०.४% योगदान आहे. देशातील वस्त्रोद्योग क्षेत्रातील एकूण रोजगारात महाराष्ट्र राज्याचा १०.२% वाटा आहे.

महाराष्ट्र राज्य हे मुंबई, इचलकरंजी व मालेगाव या समूहांमुळे वस्त्रोद्योग क्षेत्रातील एक पॉवरहाऊस बनले आहे. तसेच सन २०२४ मध्ये भारताच्या १७४ अब्ज डॉलर्स मूल्याच्या उद्योग क्षेत्रामध्ये ते महत्त्वपूर्ण योगदान देत असून सन २०३० पर्यंत ३५० अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. भारतातील सर्वाधिक महसूल मिळवणाऱ्या राज्यांपैकी हे एक आहे. राज्यातील वस्त्रोद्योग क्षेत्र हे कृषी क्षेत्रानंतरचे दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात जास्त रोजगार निर्माण करणारे क्षेत्र आहे. आरोग्यसेवा, ऑटोमटीव्ह आणि बांधकाम यासारख्या उद्योगांच्या मागणीमुळे राज्य तांत्रिक वस्त्रोद्योग, कृत्रिम तंतू, टिकाऊ फॅब्रिक आणि प्रगत वस्त्रोद्योग उत्पादनावर लक्ष केंद्रित करत आहे. सांस्कृतिक वारसा जपणे, कारागिरांना पाठिंबा देणे आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना बळकटी देणे तसेच पारंपरिक वस्त्रोद्योग व पोशाख यांचे जतन करण्यासाठी देखील राज्य लक्ष केंद्रित करीत आहे.

**१६. सोलर वेफर्स, हरित हायड्रोजन आणि हरित अमोनिया**

सोलर वेफर्स, हरित हायड्रोजन आणि हरित अमोनिया हे शाश्वत औद्योगिक विकासाचे महत्त्वाचे घटक आहेत. हे तंत्रज्ञान कार्बनीकरण कमी करण्यास मदत करणे, जीवाश्म इंधनांवरील अवलंबित्व कमी करणे आणि ऊर्जा सुरक्षितता यांना पाठिंबा देते. या तंत्रज्ञानाचा अवलंब स्वच्छ उत्पादनाच्या संक्रमणाला गती देतो आणि जागतिक हरित अर्थव्यवस्थेत महाराष्ट्राचे स्थान मजबूत करतो.

**२.२.३ (ब) थ्रस्ट सेक्टर**

उद्योग विभागाच्या शासन निर्णय क्रमांक- सप्रोयो-२०२४/प्र.क्र.१३/उद्योग-८, दि. २२ फेब्रुवारी, २०२४ व शासन निर्णय, क्र.साप्रोयो-२०२५/प्र.क्र.४३१/उद्योग-२, दि.२३ डिसेंबर, २०२५ अन्वये राज्य शासनाने खालील थ्रस्ट सेक्टर घोषित केले आहेत.

१) सेमीकंडक्टर, एलसीडी आणि एलईडीसाठी डिस्प्ले, मोबाईल डिस्प्ले आणि संबंधित काच उत्पादन इ.
२) हायड्रोजन फ्युएल सेल उत्पादन इ.
३) लॅपटॉप, संगणक आणि सर्व्हर्स इ.
४) लिथियम बॅटरी आणि सेल उत्पादन इ.
५) सोलर पॅनेल, मॉड्यूल आणि सेल उत्पादन इ.
६) औषधनिर्माण, रसायने, पॉलिमर आणि इतर संबंधित उत्पादने इ.
७) अवकाश आणि संरक्षण
८) कोल गॅसिफिकेशन व डाऊनस्ट्रीम डेरीव्हेटीव्हज तसेच हरीत स्टील उत्पादन

**२.२.३ (क) फ्रंटियर आणि उदयोन्मुख क्षेत्रे (उत्पादन)**

फ्रंटियर आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानांना प्रोत्साहन देणे व त्यावर लक्ष केंद्रित करणे हे राज्याला भविष्यासाठी तयार असलेले नवोन्मेष केंद्र बनवते, जे उच्च-मूल्य असलेले उद्योग आणि प्रतिभा आकर्षित करते. ही क्षेत्रे आर्थिक परिवर्तन घडवून आणतात, जागतिक स्पर्धात्मकता वाढवतात व लवचिक रोजगाराच्या संधी निर्माण करतात. खालील उप-क्षेत्रे फ्रंटियर आणि उदयोन्मुख क्षेत्रे (उत्पादन) म्हणून ओळखली गेली आहेत -

१) मेटा-मटेरियल्स (स्टिल्थ, ऑप्टिक्स, सेन्सर्स)
२) सेल्फ-हीलिंग आणि शेप मेमरी मटेरियल
३) जैव आधारित व जैव विघटनशील पॉलिमर
४) मॉड्यूलर न्यूक्लियर रिॲक्टर्स
५) टाकाऊ-ते-पोषक पुनर्वापर प्रणाली
६) ऑटोनॉमस वाहन घटक
७) सेकंड-लाइफ बॅटरी रियुज प्लॅटफॉर्म
८) कार्बन कॅप्चर इंटिग्रेटेड विथ केमिकल प्लांट
९) 6-G साठी दूरसंचार पायाभूत सुविधा
१०) क्वांटम कॉम्प्युटिंग हार्डवेअर

जागतिक आर्थिक परिस्थिती आणि राज्याच्या प्राधान्यानुसार वरील यादी वेळोवेळी सुधारित करण्यात येईल. फ्रंटियर आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानांना गुंतवणूकीचा आकार, रोजगार क्षमता, धोरणात्मक प्रासंगिकता आणि राज्याच्या आर्थिक प्राधान्यांमध्ये या क्षेत्राचे महत्त्व यासारख्या घटकांवर अवलंबून विविध मूल्य-आधारित प्रोत्साहने दिली जातील.

**टीप १:** ज्या प्रकरणांमध्ये केंद्र सरकारने वर नमूद केलेल्या विशिष्ट प्राधान्य क्षेत्रांसाठी अर्हता, मानके किंवा पात्रता निकष अधिकृतपणे परिभाषित केले आहेत किंवा मान्यता दिली आहे, अशा पात्रता राज्य पातळीवर पुढील प्रमाणीकरण किंवा मंजुरी न घेता या योजनेअंतर्गत थेट स्वीकार्य असतील. हे राष्ट्रीय धोरणांशी सुसंगतता सुनिश्चित करते आणि अशा केंद्रीय सूचना अस्तित्वात असलेल्या क्षेत्रांमध्ये कार्यरत असलेल्या अर्जदारांसाठी प्रक्रिया सुलभ करते.

**टीप २:** प्राधान्य क्षेत्रातील प्रकल्पांसाठी एमआयडीसी आणि एमआयटीएल यांचेकडून भूखंड वाटप प्राधान्यक्रमाने केले जाईल. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे प्राधान्य शुल्क किंवा रस्ता रुंदीचे शुल्क आकारले जाणार नाही. उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या देकारपत्रात (Offer Letter) नमूद केलेला विकास कालावधी एमआयडीसी आणि एमआयटीएल यांना लागू असेल.

**२.२.४ एमएसएमई उपक्रम: पुढील स्तरावरील वाढ**

राज्याच्या सामाजिक-आर्थिक क्षेत्रात सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम महत्त्वाची भूमिका बजावतात. अतिविशाल, विशाल आणि मोठे उद्योग यांच्या व्यतिरिक्त, सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग राज्याच्या औद्योगिक परिसंस्थेत मूलभूत भूमिका बजावतात. देशात सर्वाधिक नोंदणीकृत एमएसएमई उपक्रम महाराष्ट्र राज्यात असून माहे ऑगस्ट, २०२५ पर्यंत उद्यम पोर्टलवर एकुण सुमारे ८७.४ लाख नोंदणीकृत एमएसएमई उपक्रम असून ते भारतातील एकूण एमएसएमई उपक्रमांपैकी १३.२% आहेत (उद्यम पोर्टलवर नोंदणीकृत एकूण ६.७ कोटी एमएसएमई उपक्रम) शासकीय लाभ मिळविण्यासाठी एमएसएमई उपक्रमांना उद्यम पोर्टलवर नोंदणी करणे अनिवार्य आहे.

आर्थिक प्रोत्साहने, तंत्रज्ञान एकत्रीकरण आणि बाजारपेठ प्रवेश सहाय्य यामार्फत एमएसएमई उपक्रमांना सक्षम करण्यासाठी राज्य वचनबद्ध आहे. हे धोरण एमएसएमई उपक्रम समूहामधील निर्यात सुविधा व डिजिटल परिवर्तन मजबूत करुन जागतिक मूल्य साखळींच्या एकात्मतेला चालना देते. उद्योजकता आणि नवोन्मेष यांना चालना देऊन, रोजगार निर्माण करणे, उत्पादकता वाढवणे आणि उच्च-मूल्याच्या औद्योगिक क्रियाकलापांसाठी एमएसएमई उपक्रमांचे प्रमाण वाढवणे हे राज्याचे ध्येय आहे.

एमएसएमई उपक्रम हे कृषिक्षेत्रानंतर रोजगाराचे प्रमुख स्रोत असून त्यांच्या अंतर्निहित क्षमतेमुळे उद्योजकता, संशोधन आणि विकास तसेच नवोपक्रमांनादेखील चालना देतात. राज्याच्या आर्थिक वाढीमध्ये एमएसएमई उपक्रमांची महत्त्वाची भूमिका ओळखून, राज्य शासन उद्योगांच्या वाढीचा मार्ग निश्चित करण्यासह दीर्घकालीन कालावधीत त्यांची शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी देखील उपक्रम हाती घेण्यास वचनबद्ध आहे.

**एमएसएमई उपक्रमांना सहाय्य करणाऱ्या विद्यमान राज्य योजना/उपक्रम खालीलप्रमाणे आहेत:**

- **मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP):** सन २०१९ मध्ये सुरु झालेला हा कार्यक्रम महाराष्ट्रातील एमएसएमई उपक्रमांद्वारे रोजगार निर्मितीला सहाय्य करतो. क्रेडिट-लिंक्ड सबसिडी योजना ही जिल्हा उद्योग केंद्र (DIC) आणि महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग विकास मंडळ (MSKVIB) यांच्याद्वारे राबविली जाते. (maha-cmegp.gov.in) या योजनेअंतर्गत रु.१ कोटी पर्यंतच्या प्रकल्पांना ३५% पर्यंत अर्थसहाय्य मंजूर केले जाते.
- **समुह विकास कार्यक्रम:** केंद्र सरकार आणि महाराष्ट्र शासनाने अनुक्रमे सूक्ष्म आणि लघु उद्योग समुह विकास कार्यक्रम (MSE-CDP) आणि महाराष्ट्र राज्य औद्योगिक समुह विकास कार्यक्रम (MSI-CDP) सुरू केले जेणेकरून सामायिक पायाभूत सुविधा, क्षमता बांधणी आणि तंत्रज्ञान वाढीद्वारे सूक्ष्म आणि लघु उद्योगांची उत्पादकता आणि स्पर्धात्मकता वाढेल. MSI-CDP योजनेअंतर्गत प्रति समूह रु. १० कोटीपर्यंतच्या प्रकल्पांसाठी ९०% पर्यंत अर्थसहाय्य दिले जाते. MSE -CDP अंतर्गत प्रति समूह रु. ३० कोटी पर्यंतच्या प्रकल्पांसाठी ८०% अर्थसहाय्य दिले जाते.

- **निर्णायक पायाभूत सुविधा निधी**: निर्णायक पायाभूत सुविधा निधी हा महाराष्ट्राच्या लास्ट माईल कनेक्टीव्हिटी सुविधा वाढविणे आणि औद्योगिक क्षेत्रात वीज, पाणी, रस्ते आणि सीईटीपी यासारख्या आवश्यक औद्योगिक पायाभूत सुविधा निर्माण करणे आणि त्या अद्ययावत करणे यावर लक्ष केंद्रित करते.
- **संस्थात्मक सहाय्य**: उद्योग संचालनालय, एमएसएसआयडीसी, एमआयडीसी, एमएसकेव्हीआयबी, मैत्री, एमसीईडी, एमआयटीएल, सिकॉम आणि सहकारी औद्योगिक वसाहती/पार्क्स राज्याच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग परिसंस्थेला बळकटी देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.
- **प्राधान्य सहाय्य:** सर्व औद्योगिक पार्क्समधील २०% भूखंड सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांकरीता राखीव ठेवले जातील आणि प्राथम्य तत्वावर वाटप केले जातील. राज्य शासनाचे औद्योगिक धोरण तसेच निर्यात, इलेक्ट्रॉनिक्स, लॉजिस्टिक्स, वस्त्रोद्योग इ. क्षेत्रीय धोरणे हे विविध उपक्रमांद्वारे एमएसएमईना विशेष सहाय्य पुरवतात.

**राज्यातील एमएसएमईंना वाढीच्या पुढील स्तरावर नेण्यासाठी, लक्ष्यित उपाययोजनांचे खालीलप्रमाणे नियोजन केले आहे:**

### २.२.४(अ) प्लग अँड प्ले सुविधा

नवपिढीतील उद्योजकांवर लक्ष केंद्रित करून, एमएसएमई उपक्रमांना सहाय्य करण्यासाठी प्लग अँड प्ले सुविधा देण्यात येईल. सूक्ष्म आणि लघु उद्योजकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सहाय्यक पायाभूत सुविधांसह भाडेपट्टा-आधारित प्लग अँड प्ले सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. एमआयडीसी क्षेत्रात प्लग अँड प्ले सुविधेसह २०% क्षेत्र "एमएसएमई झोन" या शीर्षकांतर्गत एमएसएमई उपक्रमांसाठी राखून ठेवण्यात येईल. एमआयडीसी आणि एमआयटीएल या संस्थाद्वारे एमएसएमई उपक्रमांसाठी प्लग अँड प्ले सुविधा विकसित केल्या जातील. खाजगी संस्थेद्वारे या परिसंस्था मजबूत करण्यासाठी अधिमुल्याशिवाय उत्पादन व सेवा घटकामधील एमएसएमई उपक्रमांसाठी २००% पर्यंत अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक किंवा स्थानिक विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदींनुसार, या पैकी जो अधिक असेल तो चटई क्षेत्र निर्देशांक देय करुन प्ले अँड प्लग सुविधा विकसित करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येईल.

### २.२.४(ब) औद्योगिक वसाहती/पार्क्स

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ आणि एमआयटीएल क्षेत्रात उपलब्ध असलेल्या चटई क्षेत्र निर्देशांकाइतके समतुल्य अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक देय करून विद्यमान औद्योगिक वसाहती/ पार्क्सना राज्य शासन सहाय्य करील. तसेच २०-४०% पर्यंत मिश्र-वापराला परवानगी देऊन विकासाला देखील प्रोत्साहन देईल व औद्योगिक पायाभूत सुविधा मजबूत करेल. याव्यतिरिक्त, राज्य शासन संपूर्ण राज्यात औद्योगिक वसाहती/पार्क्सच्या विकासात खाजगी गुंतवणुकीला प्रोत्साहन देईल. यामध्ये आर्थिक सहाय्य, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक आणि औद्योगिक क्षेत्रांच्या विस्तारासाठी सुविधा, नवीन एमएसएमई उपक्रम, सामायिक सुविधा केंद्रे, संशोधन आणि विकास हब, आणि कौशल्य विकास संस्थांची स्थापना यांचा समावेश असेल.

राज्य आवश्यक पायाभूत सुविधा आणि कनेक्टिव्हिटीसह खाजगी औद्योगिक पार्क्सच्या विकासाला पाठिंबा देईल, ज्यामध्ये सलग जमीनीचा अंतर्भाव असलेल्या सूक्ष्म उद्योगासाठी किमान ५-१० एकर, लघु उद्योगासाठी १०-२५ एकर, मध्यम उद्योगासाठी २५-५० एकर, मोठ्या उद्योगासाठी ५०-२५० एकर आणि विशाल उद्योगासाठी २५०-५०० एकर आणि अति विशाल उद्योगासाठी ५०० एकरपेक्षा जास्त जमीन असावी.

### २.२.४(क) औद्योगिक समूह प्रोत्साहन

औद्योगिक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी आणि रोजगार निर्मितीसाठी राज्य समूह-आधारित दृष्टिकोनावर भर देणार असून प्रत्येकी ५० सदस्यांचा एक गट याप्रमाणे धोरण कालावधीत ५०० औद्योगिक समूह स्थापन करण्याचे लक्ष्य ठेवले आहे. उदयोन्मुख आणि थ्रस्ट सेक्टर्सना प्राधान्य देऊन सर्व जिल्ह्यांमधील समूह क्षमता ओळखण्यासाठी व्यवहार्यता अभ्यास, आंतर मूल्यांकन आणि लक्ष्यित उपाय योजना केल्या जातील. सूक्ष्म आणि लघु उद्योग समुह विकास कार्यक्रम

(MSE-CDP) योजनेनुसार प्रत्येक समूहामध्ये डिझाइन स्टुडिओ, चाचणी सुविधा, कौशल्य विकास केंद्रे, नवोपक्रम इनक्युबेटर व संशोधन आणि विकास केंद्रे यासारख्या सुसज्ज असलेली सामायिक सुविधा केंद्रे असतील.

राज्य महिला-नेतृत्वाखालील, निर्यात-केंद्रित आणि अनुसूचित जाती/जमाती-केंद्रित समुहासह स्मार्ट उत्पादन समुहाच्या विकासाला देखील प्रोत्साहन देईल. नवोन्मेष आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी डिझाइन स्टुडिओ आणि सामायिक सुविधा केंद्रे सारख्या समर्पित पायाभूत सुविधांद्वारे निर्यात-केंद्रित समुहांना पाठिंबा दिला जाईल. राज्य NASSCOM, FICCI, CII आणि इतर तत्सम संस्थेच्या भागीदारीत तंत्रज्ञान मान्यता प्रोत्साहनांमध्ये एमएसएमई प्रवेश सुलभ करेल. याव्यतिरिक्त, सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेल अंतर्गत प्रादेशिक उत्कृष्टता केंद्रे प्रशिक्षण, संशोधन आणि विकास समर्थन व उद्योग दुवे प्रदान करतील.

### २.२.४(ड) एमएसएमई उपक्रमांसाठी उत्कृष्टता केंद्र

राज्य शासनाद्वारे, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांसाठी मार्गदर्शन आणि प्रशिक्षणासाठी उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यास सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. क्षेत्र-विशिष्ट कौशल्य विकासासाठी संस्थात्मक भागीदारींना देखील राज्य सहाय्य देईल. नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाबद्दल जागरूकता व प्रशिक्षण देण्यासाठी संस्थांमध्ये कार्यशाळा देखील आयोजित केल्या जातील.

### २.२.४(इ) समर्पित एमएसएमई पोर्टल

राज्य एमएसएमई उपक्रमांसाठी एक समर्पित पोर्टल विकसित करेल. या पोर्टलवर उद्योगांची वाढ व स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी आवश्यक ते सहाय्य सेवा प्रदान करण्यात येईल. हे पोर्टल बाजारपेठेत प्रवेश, आर्थिक सहाय्य, शासन-ते-व्यवसाय (G२B) आणि व्यवसाय-ते-व्यवसाय (B२B) सेवांसह विविध प्रमुख सेवा प्रदान करतील तसेच बाजारपेठेतील प्रत्यक्ष उपलब्धता व बाजार पोहोच सुधारण्यासाठी डिजिटल उत्पादन यादी देखील प्रदान करण्यात येईल.

### २.२.४(फ) एमएसएमई उपक्रमांचे विस्तारीकरण

सूक्ष्म ते लघु, लघु ते मध्यम आणि मध्यम ते मोठ्या उद्योगांमध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचा विस्तार करण्यावर राज्याचे लक्ष्य असेल. या व्याप्ती वाढविण्याच्या प्रक्रियेमुळे सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे राज्याच्या अर्थव्यवस्थेच्या मोठ्या उद्दिष्टांमध्ये योगदान देण्यास सक्षम केले जाईल. नवीन उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ चे ध्येय विद्यमान स्तरातून उन्नतीसाठी पद्धतशीर कालबद्ध कार्यक्रम असणे हे आहे. क्रमांक वाढीसह ३ वर्षे पूर्ण केलेल्या एमएसएमई उपक्रमांना प्रोत्साहक वाढीसाठी सहाय्य दिले जाईल. दर्जावाढ करण्याची इच्छा असलेल्या आकांक्षी एमएसएमई उपक्रमांना संशोधन आणि विकास व तंत्रज्ञान केंद्रांमध्ये सहज प्रवेश, सामायिक सुविधा केंद्रांमध्ये प्रवेश, राज्य शासनाद्वारे प्रोत्साहन दिलेल्या इनक्यूबेशन/एक्सीलरेटर केंद्रांशी जोडण्यासाठी सहाय्य केले जाईल.

### २.२.४(ग) चाचणी आणि गुणवत्ता प्रमाणन प्रयोगशाळा

राज्य सुयोग्य स्थान निश्चित करेल आणि संबंधित औद्योगिक समुहाजवळ NABL-मान्यताप्राप्त चाचणी आणि गुणवत्ता प्रमाणन प्रयोगशाळा स्थापन करण्यास मदत करेल. नागपूर, नाशिक, पुणे, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, कोल्हापूर, सांगली आणि रत्नागिरी यासारख्या प्रमुख निर्यात समूहांमध्ये समर्पित प्रयोगशाळा स्थापन करण्यात येऊन धोरण कालावधीत राज्यात प्रयोगशाळांच्या स्थापनेसाठी आर्थिक सहाय्य दिले जाईल.

### २.२.४(ह) गुणवत्ता प्रमाणपत्र आणि मूल्यांकनास चालना

भारतीय गुणवत्ता परिषदेमार्फत, अनौपचारिक एमएसएमई उपक्रमांना औपचारिक क्षेत्रात एकत्रित करण्याच्या उद्देशाने एमएसएमई उपक्रमांना ZED, DigiReady, गुणवत्ता व्यवस्थापन मानके (QMS) आणि गुणवत्ता तंत्रज्ञान साधने (QTT) यासह विविध प्रमाणपत्रे देण्यात येतात. राज्य, एमएसएमई उपक्रमांना त्यांच्या प्रमाणन खर्चात अनुदान देऊन ही प्रमाणपत्रे मिळविण्यासाठी सक्रियपणे चालना देईल.

### २.२.४(य) आजारी किंवा बंद पडलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे पुनरुज्जीवन

एमएसएमई उपक्रमांना विशेषतः मर्यादित वित्तपुरवठा, जुने तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधांच्या अडचणी या सारख्या अंतर्गत आणि बाह्य आव्हानांना सामोरे जावे लागते. या आव्हानांमुळे अनेकदा कार्यचालनात्मक घट होते, त्यामुळे घटक आजारी पडतात किंवा बंद पडतात. *आजारी युनिट* म्हणजे असा उपक्रम जिथे कोणतेही कर्ज घेण्यायोग्य खाते तीन महिन्यांपेक्षा जास्त काळ प्रत्यक्ष नॉन-परफॉर्मिंग ॲसेट (NPA) म्हणून वर्गीकृत राहते किंवा जिथे संचित तोट्याने मागील लेखा वर्षात निव्वळ मूल्याच्या ५०% किंवा त्याहून अधिक घट केली आहे. *बंद युनिट* म्हणजे असा उपक्रम जो आजारी घटक वगळता एका वर्षापेक्षा जास्त काळ व्यावसायिक उत्पादनात गुंतलेला नाही.

i. राज्य उत्पादन आणि रोजगार पुनर्संचयित करण्यासाठी अशा युनिटच्या पुनरुज्जीवनाला प्राधान्य देईल. या घटकांची ओळख पटविणे, त्यांचे वर्गीकरण करणे आणि योग्य पुनरुज्जीवन धोरणे तयार करणे यासाठी जिल्हा उद्योग केंद्रे सर्वेक्षण करतील.

ii. खेळत्या भांडवलाला आधार देण्यासाठी, कर्जाची परतफेड पुढे ढकलणे, व्याज अनुदान देणे आणि पुनरुज्जीवन नियोजन सल्लागार शुल्क भरणे यांसाठी एक समर्पित एमएसएमई पुनरुज्जीवन आणि पुनर्वसन निधी स्थापन केला जाईल. संसाधनांचा वापर अनुकूल करण्यासाठी मालमत्ता पुनर्वाटपाला प्रोत्साहित केले जाईल.

iii. औद्योगिक आजार रोखण्यासाठी, जिल्हा उद्योग केंद्रांच्या नेतृत्वाखालील इनक्यूबेटर केंद्रे निवृत्त बँकर्सद्वारे मार्गदर्शन प्रदान करतील तसेच बाजार आणि तांत्रिक सहाय्य देखील प्रदान करतील. ही केंद्रे वेळेवर सरकारी उपयोजनांसाठी तिमाही अहवाल सादर करतील. याव्यतिरिक्त, राज्य कौशल्य विकास कार्यक्रमांसाठी शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती करून क्षमता वाढीस पाठिंबा देईल. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम धोरणांतर्गत तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे जारी केली जातील.

### २.२.४(ज) एमएसएमई धोरण

एमएसएमई विकासात महाराष्ट्राचे नेतृत्व बळकट करण्यासाठी तंत्रज्ञान, संशोधन आणि विकास, कुशल कामगार, पत, विपणन आणि वाद निराकरण यासारख्या सहाय्यक परिसंस्थेला चालना देण्यासाठी राज्य वचनबद्ध आहे. विकासाचा अजेंडा निश्चित करण्यासाठी आणि व्यवसाय सुलभ करण्यासाठी एक समर्पित एमएसएमई धोरण आणले जाईल.

### २.२.५ उद्योग म्हणून सेवा व प्राधान्य क्षेत्रे

### २.२.५(अ) सेवा उद्योग

सेवा क्षेत्र हा अर्थव्यवस्थेचा एक भाग आहे जो विशिष्ट ग्राहक किंवा व्यवसायाच्या गरजा पूर्ण करणारे अमूर्त उत्पादन देण्यावर लक्ष केंद्रित करतो. हे क्षेत्र प्रत्यक्ष वस्तूंशी संबंधित असणाऱ्या प्राथमिक व दुय्यम क्षेत्रांसारखे नाही. सेवा क्षेत्रामध्ये वित्तीय, आरोग्य, शिक्षण, आतिथ्य, वाहतूक, दूरसंचार, माहिती तंत्रज्ञान आणि मनोरंजन यांसारख्या अशा विस्तृत प्रमाणातील कार्यांचा समावेश होतो. या सेवा त्यांच्या अभौतिक स्वरुपामुळे वैशिष्ट्यपूर्ण आहेत आणि आर्थिक उत्पादकता तसेच गुणवत्तापूर्ण जीवन या दोन्ही बाबींसाठी आवश्यक आहेत.

जागतिक बँकेने व्याख्या केल्याप्रमाणे, सेवा क्षेत्रामध्ये ठोक आणि किरकोळ व्यापार, आतिथ्य, वाहतूक, दळणवळण, वित्त, विमा, स्थावर संपदा, व्यवसाय सेवा आणि सामाजिक सेवा यांचा समावेश होतो. संयुक्त राष्ट्रांचे आंतरराष्ट्रीय मानक औद्योगिक वर्गीकरण (ISIC) सर्व आर्थिक क्रियाकलाप विभाग ६-९ (Rev.२), G-Q (Rev.३), किंवा G-U (Rev.४) या अंतर्गत त्यांचे वर्गीकरण केलेले आहे. भारत सरकारच्या, सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय (MoSPI) यामार्फत माहिती संकलनातील आंतरराष्ट्रीय सुसंगततेची सुनिश्चिती करुन, संयुक्त राष्ट्राच्या CPC आवृत्ती २.० शी सुसंगत केले असून सेवाक्षेत्रांसाठी राष्ट्रीय उत्पादन वर्गीकरण (NPCSS), २०१० चा वापर करण्यात येतो. आशियाई विकास बँकेने (ADB) उत्पादकता ही जागतिक बेंचमार्क खाली असली तरी उत्पादन व रोजगार यामध्ये लक्षणीयरित्या योगदान देणारे मुख्य क्षेत्र म्हणून सेवा क्षेत्र निश्चित केलेले आहे व ते आशियातील वृध्दीस चालना देणारे

आहे. भारतात सेवा क्षेत्राचा एकूण मूल्यवर्धित (GVA) मध्ये ५०% पेक्षा जास्त वाटा आहे आणि अंदाजे एक तृतीयांश कामगारांना रोजगार मिळतो.

सेवा क्षेत्र हे महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला चालना देणारे क्षेत्र असून या क्षेत्राने १० ते १२ टक्क्यांचा ऐतिहासिक विकास दर साध्य केला आहे. सेवा क्षेत्र हे माहिती तंत्रज्ञान, वित्तीय सेवा, रिअल इस्टेट, करमणुक व पर्यटन या क्षेत्रातील मजबूत पाया असल्याने महाराष्ट्र हे भारतातील अग्रगण्य सेवा हब म्हणून राहिले आहे. सदर क्षेत्रातील वाढीची गती १३-१४ टक्के पर्यंत करण्यासाठी कृषी आणि उत्पादन क्षेत्रांशी राज्य सहकार्य करेल, त्यामुळे वित्तीय सेवा, लॉजिस्टिक्स आणि पुरवठा साखळी यांसारख्या उपायांची मागणी वाढेल. लक्षित उपाययोजना या विस्तारणाऱ्या आरोग्य सेवांचा प्रवेश, डिजिटल पायाभूत सुविधा वाढवणे आणि ज्ञान-आधारित उद्योगांना चालना यावर लक्ष केंद्रित करतील.

राज्याचे उच्च मूल्यवर्धित सेवा क्षेत्रातील १००० घटकांना प्रोत्साहन देण्याचे ध्येय आहे आणि धोरणाच्या पहिल्या २ वर्षात प्रोत्साहनांचा लाभ घेणाऱ्या सेवा क्षेत्रातील घटकांच्या संख्येनुसार या संख्येत वाढ करण्यात येईल. सेवा क्षेत्रात ५ वर्षांत ३५५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे.

नीती आयोगाच्या "*संभाव्य सेवा उप-क्षेत्रांची ओळख: स्थूल मूल्य वर्धन (GVA), निर्यात आणि रोजगार डेटामधील अंतर्दृष्टी"* या विषयावरील कार्यपत्रकानुसार, सेवांचे ४ श्रेणींमध्ये वर्गीकरण केले आहे. या वर्गीकरणाच्या आधारे आणि महाराष्ट्रासाठी संदर्भित, खालील तक्त्यामध्ये उप-सेवा क्षेत्रांचे वर्गीकरण ॲक्सिलरेट (जे महाराष्ट्राच्या GSDP मध्ये महत्त्वपूर्ण योगदान देतात) आणि परिवर्तन (राज्याच्या GSDP मध्ये संभाव्य महत्त्वपूर्ण योगदानकर्ते) यामध्ये केले आहे.

**तक्ता ३: सेवा उपक्षेत्र**

| अ. क्र. | वर्गवारी | सेवा उपक्षेत्र |
|---|---|---|
| १. | **ॲक्सिलरेट** (जागतिक क्षेत्रीय अस्तित्व टिकवणे आणि बाजार वृध्दीवर अधिक भर देणे) | **संगणक आणि माहिती सेवा :** संशोधन आणि विकास, नवोन्मेष, कौशल्य विकास, जागतिक भागीदारी यावर भर. |
| २. | | **व्यावसायिक, वैज्ञानिक आणि व्यवसाय सेवा :** संशोधन आणि विकास, सल्लागार, लवाद, अभियांत्रिकी, डिझाइन, नियोजन, जागतिक बाजारपेठ प्रवेश यावर भर. |
| ३. | | **विमा आणि सेवानिवृत्तिवेतन सेवा :** डिजिटल विमा, ग्राहक-केंद्रित उत्पादने यांवर भर. |
| ४. | | **व्यापार आणि दुरुस्ती :** ई-कॉमर्स, ऑटोमेशन, निर्यात बाजार विकास यांवर भर. |
| ५. | | **शिक्षण :** ऑनलाइन शिक्षणावर लक्ष केंद्रित करा, आंतरराष्ट्रीय विस्तार |
| ६. | | **वित्तीय सेवा:** फिनटेक, डिजिटल सेवा, जागतिक बाजारपेठ प्रवेश यांवर भर. |
| ७. | **परिवर्तन** (उत्पादकता, नवोन्मेष आणि जागतिक पोहोच वाढवणे) | **प्रवास आणि पर्यटन :** उत्कृष्ट दर्जाचे पर्यटन, वेलनेस पर्यटन, वैद्यकीय पर्यटन, डिजिटल प्लॅटफॉर्म, शाश्वतता यांवर भर. |
| ८. | | **आरोग्य:** टेलिमेडिसिन, आरोग्य-तंत्रज्ञान नवोन्मेष यांवर भर. |
| ९. | | **वैयक्तिक, सांस्कृतिक, पुनर्निर्मितीविषयक सेवा:** डिजिटल कंटेन्ट, स्वास्थ्य यांवर भर. |
| १०. | | **वाहतूक आणि लॉजिस्टिक्स :** स्मार्ट लॉजिस्टिक्स, पायाभूत सुविधा, प्रादेशिक विस्तार यांवर भर. |
| ११. | | **ऑडिओ व्हिज्युअल संबंधित सेवा:** Niche कंटेंट, ग्लोबल प्लॅटफॉर्म, स्थानिकीकरण यांवर भर. |
| १२. | | **दूरसंचार:** ५-G, स्मार्ट शहरे, पायाभूत सुविधा, निर्यात यांवर भर. |

उप क्षेत्रांचे तपशीलवार वर्गीकरण धोरणासोबतच्या **जोडपत्र-२** मध्ये दिलेले आहे.

महाराष्ट्रात, गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विशिष्ट आर्थिक प्रोत्साहने देणारी खालील क्षेत्रीय धोरणे प्रकाशित करण्यात आली आहेत:

१. फिनटेक २०१८
२. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २०२३
३. पर्यटन धोरण २०२४
४. महाराष्ट्र ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्टस्, गेमिंग, कॉमिक्स-एक्सटेन्डेड रिआलिटी (AVGC-XR) धोरण-२०२५
५. महाराष्ट्र जागतिक क्षमता केंद्र (GCC) धोरण-२०२५

या संदर्भात, उद्योग विभागास गुंतवणूक प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांसाठी आराखडा तयार करण्यासाठी आणि क्षेत्रीय वाढीला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करण्याकरिता संबंधित विभागाशी संपर्क साधून त्यांची मदत घेता येईल.

सेवा क्षेत्रात उदाहरणार्थ—डीप-टेक, टेक्नोलॉजी इन गव्हर्नन्स, फिनटेक, कन्सल्टींग, आरर्बिट्रेशन, डिझाइन, एज्युकेशन, हेल्थ, ई-कॉमर्स इत्यादींमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी, उद्योग, गुंतवणूक व सेवा विभाग इतर संबंधित विभागाशी समन्वय साधून एक आर्थिक प्रोत्साहन आराखडा तयार करेल आणि इतर संबंधित विभागाच्या गुंतवणूक प्रोत्साहनांसाठी सहाय्य करेल.

राज्यात गुंतवणूकीला चालना देण्यासाठी ब्रँडिंग, गुंतवणूक प्रोत्साहन आणि गुंतवणूकदारांना सहाय्य करण्यासाठी उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभाग हा एकमेव कस्टोडियन आहे.

**२.२.५(ब) प्राधान्य सेवा क्षेत्रे**

सेवा क्षेत्राच्या विकासाला चालना देण्यासाठी आणि त्यांच्या क्षमता प्रत्यक्षात आणण्यासाठी भारत सरकारने १२ उत्कृष्ट सेवा क्षेत्रे निश्चित केली आहेत. महाराष्ट्राच्या सेवा क्षेत्राला बळकटी देण्यासाठी, केंद्र सरकारच्या आदेशाशी सुसंगत करुन खालील १३ सेवा क्षेत्रांना प्राधान्य सेवा क्षेत्र म्हणून निश्चित करण्यात आलेली आहेत.

१. माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा
२. पर्यटन आणि आदरातिथ्य सेवा
३. वैद्यकीय मूल्य प्रवास
४. वाहतूक आणि लॉजिस्टिक्स सेवा
५. लेखा आणि वित्त सेवा
६. ऑडिओ व्हिज्युअल सेवा
७. कायदेविषयक सेवा
८. संप्रेषण (Communication) सेवा
९. बांधकाम आणि संबंधित अभियांत्रिकी सेवा
१०. पर्यावरणीय सेवा
११. आर्थिक सेवा
१२. शिक्षण सेवा
१३. रिअल इस्टेट

प्रस्तुत धोरणाच्या परि. २.२.३ (क) मध्ये अधोरेखित केल्याप्रमाणे, राज्याने फ्रंटियर आणि उदयोन्मुख क्षेत्रे ओळखली आहेत. खालील उप-क्षेत्रे फ्रंटियर आणि उदयोन्मुख क्षेत्रे (सेवा) म्हणून ओळखली गेली आहेत -

१. क्वांटम संगणकीय सेवा
२. एज (EDGE) कंप्युटींग आणि इंटरनेट ऑफ थिंग्ज एकत्रीकरण सेवा
३. व्हर्च्युअल आणि ऑगमेंटेड रिॲलिटी पर्यटन
४. वेलनेस आणि मेंटल हेल्थ रिट्रीट्स

५. ऑटोनॉमस डिलिव्हरी आणि ड्रोन लॉजिस्टिक्स
६. हायपरलूप आणि हाय-स्पीड रेल सेवा
७. इमर्सिव्ह कंटेंट क्रिएशन (AR/VR/XR)
८. डिजिटल असेट आणि NFTसाठी आयपी व्यवस्थापन
९. ग्रीन सर्टिफिकेशन आणि ESG अनुपालन
१०. ब्लॉकचेन

जागतिक आर्थिक परिस्थिती आणि राज्याच्या प्राधान्यानुसार यादीमध्ये वेळोवेळी सुधारणा केल्या जातील. उदयोन्मुख आणि आघाडीच्या तंत्रज्ञानाला गुंतवणूक आकार, रोजगार क्षमता, धोरणात्मक प्रासंगिकता आणि राज्याच्या आर्थिक प्राधान्यांमध्ये क्षेत्राचे महत्त्व यासारख्या घटकांवर अवलंबून भिन्न मूल्य-आधारित प्रोत्साहने दिले जाईल.

### २.२.५ (क) सेवाभिमुख शहरांचा विकास

ज्ञान-केंद्रित आणि उच्च-मूल्य असलेल्या सेवा उद्योगांमध्ये महाराष्ट्राचे नेतृत्व बळकट करण्यासाठी राज्य, विशेषीकृत *सेवाभिमुख शहरे* विकसित करेल. ही शहरे त्यांच्या संबंधित क्षेत्रात नवोन्मेष, प्रतिभा विकास, गुंतवणूक, संशोधन आणि निर्यात यांना चालना देणारे क्षेत्र-विशिष्ट हब म्हणून काम करतील. देशांतर्गत आणि जागतिक अशा दोन्ही भागधारकांना आकर्षित करण्यासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांनी आणि प्रगतीशील धोरणात्मक आराखड्यासह प्रत्येक शहर सुसज्ज असेल.

### अ. नवोन्मेष आणि नवोपक्रम शहर

महाराष्ट्राला नवोन्मेष आणि उद्योजकतेमध्ये जागतिक स्तरावर अग्रणी म्हणून स्थान देण्यासाठी राज्य शासन पुणे महानगर प्रदेशात किंवा नवी मुंबईमध्ये सुमारे १०० एकर क्षेत्र व्यापून एक समर्पित नवोपक्रम आणि नवोन्मेष हब स्थापन करेल. हे हब आर्टिफिशियल इंटेलिजेंस, ब्लॉकचेन, बायोटेक्नॉलॉजी, क्लीन एनर्जी आणि स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग यासारख्या आघाडीच्या क्षेत्रात काम करणारे स्टार्ट-अप्स, इनक्यूबेटर, ॲक्सिलरेटर्स, संशोधन आणि विकास केंद्रे या जागतिक तंत्रज्ञान उपक्रमांसाठी केंद्रक म्हणून काम करेल.या परिसंस्थेला अत्याधुनिक पायाभूत सुविधांद्वारे पाठिंबा दिला जाईल, ज्यामध्ये को-वर्किंग स्पेसेस, नवोन्मेष प्रयोगशाळा आणि टेक पार्क यांचा समावेश असेल आणि मुद्रांक शुल्क माफी, पेटंट फाइलिंग सहाय्य, टॅक्स हॉलिडेज आणि सिंगल-विंडो क्लिअरन्स प्रदान करणाऱ्या प्रगतीशील नियामक चौकटीद्वारे संचालित केले जाईल. कौशल्य विकास आणि उद्योजकता विभागाअंतर्गत महाराष्ट्र राज्य नवोन्मेष संस्था (MSInS) द्वारे हा उपक्रम राबविला जाईल, ज्यामुळे एक दोलयामान, सर्वसमावेशक आणि भविष्यासाठी तयार नवोपक्रम अर्थव्यवस्था वाढविण्यास मदत होईल.

### ब. शिक्षण शहर

शिक्षण शहर हे विद्यापीठे, संशोधन संस्था, एडटेक फर्म्स आणि व्यावसायिक केंद्रे एकत्रित करून, उद्योग-संलग्न, भविष्यासाठी तयार प्रतिभा विकसित करण्यासाठी जागतिक दर्जाचे ज्ञान आणि कौशल्य हब म्हणून काम करेल, हे जागतिक शैक्षणिक सहकार्य, कौशल्य विकास कार्यक्रम आणि अत्याधुनिक संशोधनाला चालना देईल, त्याद्वारे महाराष्ट्राचे मानवी भांडवल बळकट होईल आणि ते शिक्षण आणि अध्ययनासाठी एक अग्रगण्य ठिकाण होईल.

### क. मेड-टेक शहर

आरोग्यसेवेच्या नवोन्मेषावर लक्ष केंद्रित केलेले, मेड-टेक शहर हे वैद्यकीय तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञानसाठी एक समर्पित समूह आहे. ते प्रयोगशाळेसाठी जागा, बायो-इनक्यूबेटर आणि नियामक सहाय्य यांसारख्या विशेष पायाभूत सुविधा पुरवून संशोधन आणि विकास, उपकरण उत्पादन, रोगनिदान चाचण्या आणि बायोटेक नवउद्योगांना सहाय्य करील. मेड-टेक सोल्यूशन्स आणि जीवन विज्ञानात महाराष्ट्राला आघाडीवर ठेवण्यासाठी हे शहर जागतिक भागीदारी आणि गुंतवणूकीस आकर्षित करेल.

**ड. क्रीडा शहर**

क्रीडा शहर हे क्रीडा पायाभूत सुविधा, प्रशिक्षण अकादमी, पुनर्वसन केंद्रे आणि आरोग्य सुविधांसाठी एकात्मिक हब असेल. ते राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी तयार केलेले असेल. ते खेळाडू विकास, क्रीडा विज्ञान आणि आरोग्य पर्यटनाला प्रोत्साहन देईल. हे शहर क्रीडा प्रतिभेचे संवर्धन करण्यासाठी आणि क्रीडा उत्कृष्टता आणि निरोगी राहणीमानासाठी महाराष्ट्राला एक प्रमुख ठिकाण म्हणून प्रस्थापित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल.

**ई. माध्यम आणि मनोरंजन शहर**

महाराष्ट्राच्या संघटनात्मक मंनोरंजन क्षेत्राला चालना देण्यासाठी राज्य चित्रपट, टेलिव्हिजन, संगीत, रेडिओ, संगीत (ऑडिओ आणि व्हिडिओ उत्पादन), प्रकाशन आणि ऑनलाइन सामग्री तसेच स्ट्रीमिंग सेवा, गेमिंग, समाज माध्यम, डिजिटल जाहिरात आणि कार्यक्रम व्यवस्थापन यासारख्या उदयोन्मुख क्षेत्रांसह एक एकात्मिक माध्यम आणि मनोरंजन शहर विकसित करेल. या परिसंस्थेमध्ये प्रतिभा प्रदर्शित करण्यासाठी व महाराष्ट्राच्या मनोरंजन प्रतिभेला व्यावसायिक संधी प्रदान करण्यासाठी हाऊस प्रोडक्शन आणि थेट मनोरंजन क्षेत्रे देखील असतील.

**२.२.५(ड) जागतिक क्षमता केंद्राद्वारे विकास आणि रोजगाराला गती देणे**

जागतिक क्षमता केंद्रे ही अशी महत्त्वाची केंद्रे आहेत, जिथे बहुराष्ट्रीय कंपन्या माहिती तंत्रज्ञान सेवा, वित्त, संशोधन आणि विकास व विश्लेषण यासारख्या प्रमुख व्यावसायिक कार्यांचे केंद्रीकरण करतात. राज्य जागतिक गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विविध आर्थिक प्रोत्साहने आणि पायाभूत सुविधांच्या सहाय्याद्वारे जागतिक क्षमता केंद्रांच्या स्थापनेला चालना आणि प्रोत्साहन देईल. हे एकात्मिक प्रयत्न जीसीसीसाठी एक पसंतीचे ठिकाण म्हणून राज्याला स्थान देतील, रोजगार निर्माण करतील, तांत्रिक प्रगती करतील आणि प्रादेशिक आर्थिक विकासाला चालना देतील.

**२.२.५(इ) केंद्रीय व्यवसाय जिल्हे** (CBDs)

आर्थिक विविधीकरणाला चालना देण्यासाठी आणि वापराधीन असलेल्या शहरी औद्योगिक जमिनीची क्षमता वापरण्यासाठी खुली करण्यासाठी मुंबईच्या वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (BKC) च्या उपक्रमात मिळवलेल्या यशाच्या आधारे केंद्रीय व्यवसाय जिल्ह्यांच्या विकासाला राज्य प्रोत्साहन देईल. हे CBDs अत्याधुनिक पायाभूत सुविधा आणि स्मार्ट सिटी-स्तरीय सुविधांनी सुसज्ज असतील, याचा उद्देश माहिती तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा, वित्तीय सेवा, फिनटेक, संशोधन आणि विकास, लॉजिस्टिक्स आणि कन्सल्टींग यासारख्या उच्च-मूल्याच्या सेवा क्षेत्रांमध्ये गुंतवणूक आकर्षित करणे आहे. जागतिक अर्थव्यवस्था ऑटोमेशन आणि सेवा-नेतृत्वाखालील वाढीकडे संक्रमण करत असताना, हे जिल्हे ज्ञान-केंद्रित उद्योगांच्या भरभराटीसाठी भविष्यासाठी सज्ज वातावरण उपलब्ध करुन देतील.

या दृष्टिकोनानुसार, राज्य शासन शहरी केंद्रांमधील निवडक उत्पादन-केंद्रित औद्योगिक क्षेत्रांचा विशेष सेवा-केंद्रित औद्योगिक केंद्रांमध्ये पुनर्विकास करेल. ही क्षेत्रे जागतिक चटई क्षेत्र निर्देशांक मानके, प्रोत्साहनात्मक जमीन-वापर धोरणे आणि व्यावसायिक कार्यांसाठी औद्योगिक दर लाभ यांद्वारे संचालित केले जातील. पर्यावरणीय शाश्वततेची सुनिश्चिती करण्यासाठी, फक्त नारंगी-श्रेणी आणि त्यावरील उद्योगांनाच काम करण्याची परवानगी दिली जाईल, त्यामुळे वाढ, नवोन्मेष आणि शहरी राहणीमान यांच्यात संतुलन राखणाऱ्या कमी-प्रभावी उच्च-मूल्याच्या परिसंस्थांना चालना मिळेल.

**२.२.५(फ) सृजनशील अर्थव्यवस्थेला चालना**

महाराष्ट्र राज्य निर्मितीक्षम अर्थव्यवस्थेला नवोन्मेष, सांस्कृतिक ओळख आणि समावेशक विकासाचा प्रमुख प्रेरणा देणारा चालक म्हणून ओळखला जातो. राज्याच्या क्षमतेचा वापर करण्यासाठी चित्रपट, संगीत, कला, डिजिटल सामग्री, ॲनिमेशन, गेमिंग, फॅशन, डिझाइन, प्रकाशन आणि हस्तकला यासारख्या क्षेत्रांना समर्पित धोरणात्मक उपाययोजनाद्वारे राज्य प्रोत्साहन देईल. जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा, सह-कार्यस्थळे आणि जागतिक बाजारपेठांमध्ये प्रवेश प्रदान करण्यासाठी शहरी समूह आणि वारसा शहरांमध्ये सृजनशील आर्थिक क्षेत्रे (CEZ) स्थापन

केले जातील. बौद्धिक संपदा (IP) निर्मिती, निर्यात प्रोत्साहन, कौशल्य आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी यांसाठी राज्य, लक्ष्यित प्रोत्साहने देईल. पर्यटन, तंत्रज्ञान आणि शिक्षण क्षेत्रांशी समन्वय साधण्याच्या प्रयत्नांसह, सर्जनशील क्षेत्रात स्टार्ट-अप्स आणि उद्योजकांना देखील पाठिंबा दिला जाईल.

**२.२.५(ग) महाराष्ट्राला शॉपिंग, जीवनशैली आणि रिटेल डेस्टिनेशनसाठी हब म्हणून चालना देणे**

महाराष्ट्र राज्य, भारतातील भविष्यातील सज्ज व्यापारात आघाडीचे स्थान मिळवण्यासाठी Next-Gen शॉपिंग हब आणि रिटेल झोन तयार करेल. हे हब जागतिक ब्रँड, एमएसएमई, ई-कॉमर्स आणि लॉजिस्टिक्सला एकाच परिसंस्थेत एकत्रित करतील. ते राज्यातील विद्यमान नोड्सचा फायदा घेतील आणि खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीद्वारे संस्कृती, अन्न आणि मनोरंजनासह अनुभवात्मक जीवनशैली गंतव्यस्थाने तयार करण्यासाठी त्यांना चालना दिली जाईल. सर्व हब ग्रीन बिल्डिंग मानदंड, अक्षय ऊर्जा, ईव्ही सुविधा आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांचे पालन करतील. यामध्ये डिजिटल रेडिनेसमध्ये ५G, फिजिटल रिटेल, एआर/व्हीआर आणि एआय-चालित विश्लेषणे यांचा समावेश असेल. तीन प्रमुख स्वरूपांना प्रोत्साहन दिले जाईल: मेगा शॉपिंग हब, स्मार्ट रिटेल झोन आणि स्पेशॅलिटी क्लस्टर्स. राज्य शासन वरील पैलू सुनिश्चित करणाऱ्या व एमएसएमई, कारागीर आणि एफपीओंना (FPOs) समावेशकतेसाठी समर्पित रिटेल स्पेससह एकत्रित करणाऱ्या मार्की प्रकल्पांसाठी अनुदानाच्या बाबतीत समर्थन प्रदान करेल.

**२.२.५(ह) सेवा-आधारित हब म्हणून मुंबई महानगर प्रदेश** (MMR)

मुंबई महानगर प्रदेश हा भारतातील सर्वात मोठा आर्थिक प्रदेश असून सर्वात मोठ्या शहरी समूहांपैकी एक असून या प्रदेशाचा राज्याच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनामध्ये (GSDP) सुमारे ३१.२ टक्के इतके योगदान आहे. मुंबई महानगर प्रदेशाच्या स्थूल राज्यांतर्गत उत्पन्नामध्ये उत्पादन आणि लॉजिस्टिक्स हे क्षेत्र २० टक्के तसेच सेवा क्षेत्र हे जवळजवळ ६० टक्के इतके योगदान देते. नीती आयोगाच्या अहवालानुसार, शहरी विकास केंद्र प्रोत्साहनांतर्गत मुंबई महानगर प्रदेशाला जागतिक आर्थिक हब म्हणून मुंबई महानगर प्रदेशाचा सन २०३० पर्यंत स्थूल देशांतर्गत उत्पादन (GDP) रु.२५ लाख कोटी ( ३०० अब्ज डॉलर) इतका होण्याचा अंदाज आहे. या प्रदेशाला उद्दिष्टे साध्य करण्यासाठी वित्तीय सेवा, फिनटेक, आरोग्य, शिक्षण, माध्यम आणि मनोरंजन, AVGC-XR, लॉजिस्टिक्स इ. वर भर देऊन बहुराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित करण्याची आवश्यकता आहे. राज्य, गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि धोरणात्मक ब्रँडिंग मोहिमा आणि जागतिक व्यवसाय मंचांमध्ये सहभाग यांद्वारे सेवा हब म्हणून स्वतःचे स्थान मिळविण्यासाठी, लक्ष्यित बाजारपेठांमध्ये (USA, EU, UAE, Singapore) नियमित आंतरराष्ट्रीय रोड शो आयोजित करेल.

मुंबई महानगर प्रदेश ही भारताची आर्थिक तंत्रज्ञान आणि डेटा सेंटर राजधानी असून ती जागतिक कपन्यांना विनियामक सहाय्य आणि पायाभूत सुविधा प्रदान करेल. राज्य, उत्पादन प्रोत्साहन, कौशल्य कार्यक्रम आणि उत्पादन हबसह राज्याचे AVGC-XR उद्योग क्षेत्र मजबूत करील. वर्ल्ड ऑडिओ-व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट (WAVES) हा उपक्रम मीडिया मार्केटप्लेस, टॅलेंट शोकेस, कौशल्य आव्हाने, B२B बैठका आणि परिषदांद्वारे AVGC-XR उद्योगाच्या वाढीस चालना देईल. राज्य डेस्टिनेशन ब्रँडिंग आणि पर्यटन वाढवेल.

**२.२.५ (य) समुह विकासाद्वारे सेवा प्रोत्साहन**

राज्य सामायिक सुविधा केंद्रे, डिझाइन स्टुडिओ, चाचणी आणि प्रमाणन घटक, कौशल्य विकास केंद्रे, इनक्यूबेटर, संशोधन आणि विकास सुविधा तसेच हरित उपक्रमांच्या स्थापनेला प्रोत्साहन देऊन समूह-आधारित विकास दृष्टिकोनाला चालना देईल. यामुळे आर्थिक वाढ व रोजगार निर्मितीला चालना मिळेल आणि महाराष्ट्राला गुंतवणूक, नवोन्मेष आणि सेवा वितरणात उत्कृष्टतेसाठी एक अग्रगण्य गंतव्यस्थान म्हणून स्थान मिळेल. सेवा क्षेत्र प्रोत्साहित करण्यावर लक्ष केंद्रित करुन सर्व प्राधान्य सेवा क्षेत्रांपर्यंत विस्तार करण्यात येईल. राज्य नवीन योजना जाहीर करेल आणि राज्यातील सेवा-आधारित समूह विकासाच्या प्रोत्साहनामधील परिणामकारकता सुधारण्यासाठी प्रचलित योजनांमध्ये सुधारणा करेल.

### २.२.६ संशोधन आणि विकास व नवोन्मेष

संशोधन आणि विकास, बौद्धिक संपदा (IP) आणि प्रगत तंत्रज्ञान विकास यांच्या आधारे स्वत:ला एक जागतिक नवोन्मेष हब म्हणून स्थापित करण्याचे राज्याचे ध्येय आहे. प्रमुख उपक्रमांमध्ये संशोधन आणि विकास केंद्रे, उद्योग-शैक्षणिक सहयोग आणि तंत्रज्ञानाच्या अवलंबनासाठी आर्थिक प्रोत्साहने यांचा समावेश आहे. नवोन्मेषाला चालना देऊन उच्च-तंत्रज्ञानाच्या प्रगतीला गती देणे, जागतिक संशोधन गुंतवणूकीस आकर्षित करणे आणि औद्योगिक परिसंस्था बळकट करण्यात येईल.

### २.२.६ (अ) राज्यातील जागतिक क्षमता केंद्राचा विकास

भक्कम पायाभूत सुविधा, कुशल मनुष्यबळ आणि उद्योगस्नेही धोरणे यांचा लाभ देऊन महाराष्ट्राला जागतिक क्षमता केंद्रांचे (पूर्वी ग्लोबल इन-हाऊस सेंटर्स किंवा जीआयसी म्हणून ओळखले जाणारे) एक प्रमुख ठिकाण म्हणून स्थान प्राप्त करणे हे राज्याचे ध्येय आहे. जागतिक क्षमता केंद्रे त्यांच्या मूळ कंपन्यांच्या एखाद्या छोट्या आवृत्तीसारखे काम करतात. ते मुख्य व्यवसाय गटांसोबत जोडलेले असून संशोधन व डिजिटल नवोन्मेषामध्ये सक्रिय सहभागी असतात. राज्य, मुंबई आणि पुणे यांना स्थापित जीसीसी हब म्हणून प्रोत्साहन देईल आणि नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि नागपूर सारखी टियर-२ आणि टियर-३ शहरे उदयोन्मुख जीसीसी स्थान म्हणून विकसित करेल.

महाराष्ट्र राज्य उच्च-मूल्याच्या गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी एक एकत्रित सामुहिक प्रोत्साहन देईल, त्यामध्ये वेतन अनुदान, कर सवलती, संशोधन आणि विकास, कर कपात आणि भांडवली गुंतवणूकीच्या प्रोत्साहनांचा समावेश असेल. पायाभूत सुविधांच्या सहाय्यामध्ये टेक पार्कमध्ये अर्थसहाय्यित कार्यालयीन जागा, सुधारित डिजिटल जोडणी आणि हरित-प्रमाणित सुविधा या प्रोत्साहनांचा समावेश असेल.

राज्य, प्रतिभेची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी कौशल्य विकास प्रोत्साहने देईल तसेच भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT), मुंबई आणि भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM), नागपूर यांसारख्या संस्थांशी भागीदारी करेल व विशेष व्यावसायिकांना नवीन ठिकाणी व्यवसाय करण्यास समर्थन देईल. राज्य शासन एआय, फिनटेक, बायोटेक आणि आरोग्यसेवा यांसारख्या क्षेत्रात इनोव्हेशन हब, क्षेत्र-विशिष्ट उद्योग शिखर परिषदा आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) यांना देखील प्रोत्साहन देईल. डेटा सेंटर, फिनटेक आणि आरोग्यसेवा क्षेत्रातील जागतिक क्षमता केंद्रांना विशेष प्रोत्साहने देण्यात येतील.

जागतिक क्षमता केंद्रांना चालना देण्यासाठी राज्याने एक स्वतंत्र धोरण जाहीर केले आहे. सदर धोरणांतर्गत लाभ घेणाऱ्या संस्थांना राज्यातील बिगर-कृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये पारंपारिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप/अप्रेंटिसशिप प्रदान करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल.

### २.२.६ (ब) इनक्युबेशन, एक्सीलरेटर्स आणि सेंटर्स ऑफ एक्सलन्स

राज्य, उद्योजकीय परिसंस्था बळकट करण्यासाठी सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेल अंतर्गत क्षेत्र-विशिष्ट इनक्युबेशन, एक्सीलरेटर्स आणि सेंटर्स ऑफ एक्सलन्सची स्थापना करेल. कौशल्यांमधील तफावत भरून काढण्यासाठी आणि क्षेत्रीय आवश्यकतांनुसार संशोधन आणि विकासाचे संरेखन करण्यासाठी औद्योगिक समुहांलगत उत्कृष्टता केंद्रे स्थापन केली जातील. ही उत्कृष्टता केंद्रे NASSCOM, CII, FICCI, ASSOCHAM सारख्या उद्योग संस्था, जागतिक कंपन्या आणि राज्यातील संबंधित शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), रोबोटिक्स आणि डिजिटल ट्विन प्रणालीसारख्या प्रगत तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करतील. राज्य, एमएसएमई आणि नवोपक्रमांसाठी प्लग-अँड-प्ले सुविधा, मार्गदर्शन आणि प्रशिक्षणासह एम-हब इन्क्युबेशन केंद्रासह १०० इनक्यूबेटर आणि एक्सीलरेटर देखील विकसित करेल. याव्यतिरिक्त, उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण उपायांचा शोध घेण्यासाठी व उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी नाविन्यपूर्ण आव्हाने आणि संकल्पना स्पर्धा (Hackathon) आयोजित करील.

**२.२.६(क) बौद्धिक संपदा हक्क (IPR) आणि पेटंटना बळकटी व समर्थन देणे.**

बौद्धिक संपदा हक्क आणि पेटंट हे संशोधन आणि विकास परिसंस्थेचे प्रमुख घटक असून नवोन्मेष आणि औद्योगिक स्पर्धात्मकता वाढवण्यासाठी आवश्यक आहेत. संशोधन आणि विकास कार्यास प्रोत्साहन देण्यासाठी व बौद्धिक मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी पेटंट नोंदणी, आंतरराष्ट्रीय प्रमाणन आणि त्यासंबंधित खर्चासाठी राज्य, आर्थिक सहाय्य देईल.

**२.२.६(ड) संशोधन आणि विकास क्षेत्रात खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक आकर्षित करणे**

राज्याच्या संशोधन आणि विकास परिसंस्थेला बळकटी देण्याकरिता खाजगी क्षेत्रातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी, निधीमधील तफावत भरून काढण्यासाठी आणि नवोन्मेष-चालित वाढीत वृध्दी घडविण्यासाठी राज्य, धोरणात्मक उपाययोजना राबवेल. संशोधन आणि विकासाचे भांडवल-केंद्रित स्वरूप पाहता, खाजगी सहभागाला प्रोत्साहन दिल्याने शाश्वत तांत्रिक प्रगती आणि जागतिक स्पर्धात्मकता सुनिश्चित होईल. उद्योग आणि खाजगी उपक्रमांनी हाती घेतलेल्या संशोधन आणि विकास प्रकल्पांना पारंपरिक आणि व्यावसायिक विद्यापीठे आणि महाविद्यालयांशी सक्रियपणे सहकार्य करण्यास प्रोत्साहित केले जाईल, जेणेकरून ज्ञानाची देवाणघेवाण, कौशल्य विकास आणि संशोधन परिणामांचे व्यावसायीकरण सुनिश्चित होईल. या संदर्भात तंत्रशिक्षण संचालनालय आणि मित्रा या संस्था उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाला उद्योग-शैक्षणिक संबंध सुलभ करण्यासाठी मदत करतील.

**२.२.६(इ) संशोधन आणि विकास गुंतवणुकीद्वारे नवोन्मेषाला चालना देणे**

महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ अंतर्गत प्रोत्साहनांचा लाभ घेणाऱ्या विशाल आणि अतिविशाल उद्योगांनी त्यांच्या एकूण स्थिर भांडवल गुंतवणुकीपैकी किमान २ टक्के रक्कम संशोधन आणि विकासासाठी देणे बंधनकारक आहे. यामुळे प्रमुख क्षेत्रांमध्ये नवोन्मेष, तंत्रज्ञानाचा अवलंब आणि उत्पादन विकासाला चालना मिळेल. भविष्यासाठी सज्ज असलेल्या ज्ञान-चालित उद्योगांसाठी हब म्हणून, महाराष्ट्राचे स्थान मजबूत करण्याकरीता संशोधन आणि विकासावरील गुंतवणूकीचा वापर इन-हाऊस संशोधन सुविधा उभारणे, शैक्षणिक संस्थांशी सहयोग करणे किंवा प्रगत तंत्रज्ञान उपक्रमांना निधी देणे यासाठी करता येईल.

**२.२.६(फ) समर्पित उदयोन्मुख तंत्रज्ञान धोरणे**

नवोन्मेष आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी राज्य उदयोन्मुख तंत्रज्ञान धोरणे तयार करेल. आर्टिफिशियल इंटेलिजेंस (AI) आणि ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स (AVGC) साठी लक्ष्यित चौकट अत्याधुनिक डिजिटल सामग्री आणि स्मार्ट सोल्यूशन्सना प्रोत्साहन देतील, तर जागतिक क्षमता केंद्रे (GCC) मधील केंद्रित उपक्रम आणि मजबूत संशोधन आणि विकास कनेक्टिव्हिटी, सायबर सुरक्षा आणि आंतरविद्याशाखीय संशोधनात महत्त्वपूर्ण प्रगतीला आधार देतील. त्याच वेळी, तयार केलेल्या बायोटेक धोरणांमुळे आरोग्य आणि जीवन विज्ञानातील प्रगती वेगवान होईल, ज्यामुळे राज्याला तांत्रिक परिवर्तनात जागतिक नेता म्हणून स्थान मिळेल. या धोरणात्मक उपाययोजनांचे उद्दिष्ट एक गतिमान परिसंस्था तयार करणे आहे जी गुंतवणूक आकर्षित करते, प्रतिभेचे संगोपन करते आणि भविष्यासाठी तयार अर्थव्यवस्थेसाठी आंतर-क्षेत्रीय सहकार्यांना उत्प्रेरित करते.

**२.२.७ उत्कृष्टता पुरस्कार**

**२.२.७(अ) व्यवसाय सुलभता गौरव पुरस्कार (EoDB Recognisition Awards)**

अनुकूल व्यवसाय वातावरणाला चालना देणे, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे, प्रशासनात पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढवणे यांसाठी उल्लेखनीय योगदान देणारे उद्योग, शासकीय संस्था आणि व्यक्तींना सन्मानित करण्यासाठी राज्य *'व्यवसाय सुलभता गौरव पुरस्कार'* सुरु करेल.

**२.२.७(ब) महाउद्योग पुरस्कार**

विविध क्षेत्रांमध्ये उत्कृष्टता, नवोन्मेष आणि शाश्वतता यांचे प्रचालन करण्यामध्ये औद्योगिक पुरस्कार महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. उत्पादन, लॉजिस्टिक्स, शाश्वतता, तंत्रज्ञान आणि उद्योजकता यामधील उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन अतिशय चांगल्या कार्यपध्दतींना प्रोत्साहन देणे, उत्पादकता सुधारणे आणि राष्ट्रीय आर्थिक वाढीस हातभार लावणे हे राज्य शासनाचे उद्दिष्ट आहे. महाउद्योग पुरस्कारांच्या श्रेणी पुढीलप्रमाणे असतील:

- उत्पादन उत्कृष्टता पुरस्कार
- एमएसएमई आणि स्टार्टअप पुरस्कार
- शाश्वतता आणि हरित उद्योग पुरस्कार
- लॉजिस्टिक्स आणि पुरवठा साखळी पुरस्कार
- तंत्रज्ञान आणि नवोन्मेष पुरस्कार
- निर्यात उत्कृष्टता पुरस्कार
- व्यवसाय सुलभता उत्कृष्टता पुरस्कार
- जिल्हा उद्योग अधिकाऱ्यांसाठी उत्कृष्टता पुरस्कार

राज्य शासनाकडून उद्योगांना देण्यात येणारे हे पुरस्कार औद्योगिक स्पर्धात्मकता आणि जागतिक स्थानासाठी प्रमुख प्रेरक म्हणून चालक ठरतील. एक संरचित आणि प्रभावीपणे प्रोत्साहनपर दिलेले पुरस्कार हे सातत्यपूर्ण सुधारणांना प्रोत्साहन देतात, उद्योग-शासन सहकार्य वाढवतात आणि राष्ट्रीय आर्थिक विकासात योगदान देतात.

**२.२.७ (क) उद्योगरत्न पुरस्कार**

*'उद्योगरत्न पुरस्कार'* हा, राज्याच्या औद्योगिक वाढीमध्ये आणि आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या उत्कृष्ट उद्योगपती आणि उद्योजकांना दिला जाणारा एक प्रतिष्ठेचा असा सन्मान आहे. उद्योग क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी राज्य शासनाचा पहिला *'उद्योगरत्न'* हा सर्वोच्च पुरस्कार दिवंगत ज्येष्ठ उद्योजक पद्मविभूषण रतन टाटा यांना प्रदान करण्यात आला होता. श्री. आदर पूनावाला, मुख्य कार्यकारी अधिकारी, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया, पुणे यांना *'उद्योग मित्र'* पुरस्कार देण्यात आला आहे. महिला उद्योजकांसाठीचा *'उद्योगिनी पुरस्कार'* किर्लोस्कर समूहाच्या संचालिका श्रीमती गौरी किर्लोस्कर यांना देण्यात आला आहे. *'उत्कृष्ट मराठी उद्योजक'* पुरस्कार सह्याद्री फार्म्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री. विलास शिंदे यांना देण्यात आला आहे.

**प्रकरण ३: उद्दिष्ट २**

## शाश्वत वाढ - संतुलित, न्याय्य आणि शाश्वत रोजगार समृद्ध वाढ निर्माण करणे

### ३.१ रोजगार आणि समावेशकता

#### ३.१.१. रोजगार सहाय्य

आर्थिक वर्ष २०२९-३० पर्यंत ५० लाख नवीन रोजगाराचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने कामगार-केंद्रित क्षेत्रे, कौशल्य विकास कार्यक्रम आणि उद्योजकता प्रशिक्षणास राज्य प्राधान्य देत आहे. राज्य, व्यावसायिक शिक्षण, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमातून रोजगार आणि प्रत्यक्ष कार्यात महिलांचा सहभाग बळकट करेल. हे उपक्रम जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर रोजगाराची निर्मिती,, आर्थिक समृद्धी, सामाजिक समावेशन आणि संतुलित प्रादेशिक वाढीस चालना देतील.

रोजगाराच्या संधी निर्माण करणे आणि उपजीविका सुधारणे ही महाराष्ट्राच्या उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरणाची मुख्य उद्दिष्टे आहेत. हा आधारस्तंभ कौशल्य विकास कार्यक्रमांची अंमलबजावणी, रोजगार-प्रधान उद्योगांना प्रोत्साहन आणि रोजगार निर्मिती उपक्रमांना पाठिंबा देण्यावर भर देतो. व्यावसायिक प्रशिक्षण मजबूत करून आणि उद्योजकतेला चालना देऊन, आर्थिक समृद्धी आणि सामाजिक विकासाला चालना देणे हे राज्याचे ध्येय आहे यामुळे संतुलित प्रादेशिक वाढीची सुनिश्चिती होईल.

राज्य शासन रोजगार-प्रधान क्षेत्रांवर विशेष भर देत आहे. अंतर्निहित क्षमता आणि विद्यमान परिसंस्था लक्षात घेऊन या क्षेत्रांची क्षमता निश्चित केली जाते. रोजगार निर्मितीचे अधिकाधिक फायदे तळागाळापर्यंत पोहोचण्यासाठी, औद्योगिक, गुंतवणुक व सेवा धोरण २०२५ मध्ये विशेष कार्यक्रम आणि सहाय्य देण्यात आले आहे.
धोरणात पुढील रोजगारकेंद्रित क्षेत्रांवर लक्ष केंद्रित केले आहे :

- तांत्रिक वस्त्रोद्योगासह कापड आणि वस्त्रोद्योग
- पादत्राणे आणि चामड्याचे उत्पादने
- रत्ने आणि आभूषणे
- फर्निचर आणि हस्तकला
- अन्न प्रक्रिया आणि कृषी-आधारित उद्योग
- गौण खनिजे आणि वन-आधारित उपक्रम
- पुनर्नवीकरणीय ऊर्जा निर्मिती आणि उत्पादन
- चक्रीय अर्थव्यवस्था उपक्रम आणि पर्यावरणपूरक साहित्य निर्मिती
- इलेक्ट्रॉनिक्स असेंम्बली
- लॉजिस्टिक्स आणि वेअरहाऊसिंग
- सेवा क्षेत्र

महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी आणि राज्याचे जीवनमान सुधारण्यासाठी राज्य शासनाने राज्यात रोजगार निर्मिती आणि कौशल्य विकासासाठी प्रमुख उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. रोजगार निर्मिती आणि कौशल्य विकास आाधारस्तंभ, रोजगार-आधारित क्षेत्रांना प्रोत्साहन देणे, कौशल्य विकास कार्यक्रम आणि रोजगार निर्मितीमध्ये पुढाकार घेणे यावर लक्ष केंद्रित करण्यात आले असून प्रस्तावित प्रमुख उपाययोजना पुढीलप्रमाणे आहेत:

#### ३.१.१.(अ) सेवा आधारित समुहाचा विकास

वरील परि. २.२.५.(य) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे, राज्य आर्थिक वाढ आणि रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी सेवा-आधारित समुह विकसित करेल आणि महाराष्ट्राला गुंतवणूक, नवोन्मेष आणि सेवा वितरणातील

उत्कृष्टतेसाठी एक अग्रगण्य गंतव्यस्थान म्हणून स्थान देईल. सेवा क्षेत्राच्या प्रोत्साहनावर लक्ष केंद्रित करून सर्व प्राधान्य सेवा क्षेत्र विस्तारित केले जातील.

### ३.१.१.(ब) उद्योग जोडणीसाठी रोजगार विनिमय पोर्टल :

महाराष्ट्रातील कौशल्य तफावत भरून काढण्यासाठी आणि उद्योगांना प्रमाणित मनुष्यबळाशी जोडण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व कौशल्य विकास विभागामार्फत एक केंद्रीकृत ऑनलाइन कुशल मनुष्यबळ विनिमय पोर्टल राज्य विकसित करेल. हे रिअल-टाइम प्लॅटफॉर्म औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतने आणि प्रशिक्षण संस्थेकडून डेटा एकत्रित करेल, ज्यामुळे उद्योगांना प्रमुख क्षेत्रांमधील स्थानानुसार टॅलेंट पूलमध्ये प्रवेश मिळू शकेल. मागणी-चालित कौशल्य आणि कार्यक्षम मनुष्यबळ तैनात सुनिश्चित करण्यासाठी कौशल्य रुपरेखा आखणे, अनुरुप रोजगार मिळवून देणे, प्रमाणनाचा पाठपुरावा करणे आणि उद्योगाकडून प्रतिसाद मिळवणे यांचा समावेश करील.

### ३.१.२ व्यवसाय केंद्रे म्हणून जिल्हा

### ३.१.२.(अ) जिल्हा उद्योग भवन

महाराष्ट्र शासन जिल्हा उद्योग भवनांच्या स्थापनेद्वारे जिल्हा पातळीवर औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी वचनबद्ध आहे. ही उद्योग भवने प्रत्येक जिल्ह्यातील उद्योजक आणि उद्योगपतींना व्यापक आधार आणि सेवा प्रदान करणारी एकात्मिक केंद्रे म्हणून कार्य करतील. याचे उद्दिष्ट आवश्यक त्या परवानग्या आणि मान्यता मिळविण्याची प्रक्रिया सुलभ करणे, औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी एकाच छताखाली आधुनिक सुविधा प्रदान करणे हे आहे. पहिल्या टप्प्यात, रत्नागिरी, सातारा आणि इतर काही जिल्ह्यांतील उद्योग भवनांच्या विकासासाठी निवड करण्यात आली आहे, प्रकल्पात उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या सुविधेच्या प्रमाणानुसार (लहान, मध्यम किंवा मोठे) प्रकल्प खर्चात सुधारणा करण्यात येईल.

### ३.१.२.(ब) जिल्हा व्यवसाय सुविधा केंद्रे (DBFCs)

तळागाळातील स्तरावर व्यवसाय करण्याची सुलभता वाढविण्यासाठी आणि गुंतवणूकदारांना अखंडपणे सुविधा देण्यासाठी राज्य प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा व्यवसाय सुविधा केंद्रे स्थापन करेल तसेच त्यांना '*जिल्हा उद्योग सेवा केंद्रे*' असेही संबोधले जाईल. ही केंद्रे गुंतवणूकदार आणि उद्योजकांना नियामक मान्यता, मंजुरी, धोरण सल्लागार आणि शासनाच्या योजना आणि प्रोत्साहने मिळविण्यास मदत करण्यासाठी एककेंद्री यंत्रणा (Single-Point Interface Platform) म्हणून काम करतील. एमएसएमई व मोठ्या उद्योगांवर विशेष लक्ष केंद्रित करून जिल्हा उद्योग सुविधा केंद्रे ही जिल्हा पातळीवर एकात्मिक सुविधा नोड्स म्हणून काम करतील.

महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा (MAITRI) पोर्टलद्वारे उपलब्ध असलेल्या सर्व सेवा प्रत्येक जिल्हा व्यवसाय सुविधा केंद्रे (DBFCs)/ जिल्हा उद्योग सुविधा केंद्रे (USKs) द्वारे उपलब्ध करून दिल्या जातील, यामुळे राज्याच्या शेवटच्या टप्प्यापर्यंत सेवा पोहोचतील आणि गुंतवणूकदारांना विविध विभागांशी संपर्क साधण्याची आवश्यकता नसेल. ही जिल्हा उद्योग केंद्रे, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांच्या नेतृत्वाखाली कार्य करतील आणि त्यांना लक्षित मार्गदर्शन प्रदान करण्यासाठी क्षेत्र-विशिष्ट तज्ज्ञांच्या पथकाद्वारे सहाय्य दिले जाईल. राज्य सेवा हक्क अधिनियमातील तरतुदींनुसार मंजूरी आणि सेवा विहीत वेळेत दिल्या जातील त्यामुळे जिल्हा पातळीवर पारदर्शक, कार्यक्षम आणि गुंतवणूकदार-केंद्रित परिसंस्थांची जोपासना होईल.

### ३.१.२ (क) उदयोन्मुख जिल्हे

*'उदयोन्मुख जिल्हे'* हे महाराष्ट्रातील कमी औद्योगिकीकरण झालेले जिल्हे आहेत ज्यात मर्यादित औद्योगिकरण आहे परंतु उच्च विकास क्षमता आहे. महाराष्ट्र आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये अधोरेखित केल्याप्रमाणे भारत आणि

महाराष्ट्राच्या दरडोई उत्पन्नाच्या तुलनेत त्यांच्या दरडोई उत्पन्नाच्या आधारे हे जिल्हे ओळखण्यात आलेले आहेत. या संदर्भात, जिल्ह्यांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केले आहे.

- **झोन १ - भारतापेक्षा कमी दरडोई उत्पन्न (रु.१,८८,८९२) असलेले जिल्हे :** नंदुरबार, वाशीम, बुलढाणा, गडचिरोली, हिंगोली, यवतमाळ, परभणी, बीड, जालना, नांदेड, जळगाव, गोंदिया
- **झोन २- महाराष्ट्रापेक्षा कमी (रु.२,७८,६८१) परंतु भारतापेक्षा जास्त दरडोई उत्पन्न असलेले मोठे जिल्हे**: धुळे, धाराशिव, अमरावती, लातूर, भंडारा, अकोला, चंद्रपूर, वर्धा, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सातारा, रत्नागिरी, नाशिक, सोलापूर, सांगली.

### ३.१.२(ड) विकासाचा केंद्रबिंदू म्हणून जिल्हा

गुंतवणूक आणि निर्यात प्रोत्साहन, विक्रेता विकास कार्यक्रम, प्रदर्शने आणि गुंतवणूकदार सुविधा याद्वारे जिल्ह्यांना विकासाचा केंद्रबिंदू म्हणून प्रोत्साहन देण्यासाठी विविध उपक्रम विकसित करण्यावर राज्य लक्ष केंद्रित करेल. प्रादेशिक बाजारपेठांमध्ये एमएसएमईची वाढ आणि विस्तार सुलभ करण्यासाठी जिल्हा पातळीवर गुंतवणुकीला राज्य प्राधान्य देईल.

राज्य, जिल्ह्यांचे मूल्यांकन करेल आणि त्यांच्या औद्योगिक कामगिरी आणि क्षमतेनुसार त्यांची क्रमवारी लावून जिल्हा औद्योगिक विकास निर्देशांक (DIDI) तयार करेल. हा निर्देशांक उच्च-क्षमता असलेले जिल्हे, गुंतवणूक संधी आणि धोरणात्मक उपाययोजनांची आवश्यकता असलेले क्षेत्र शोधून काढण्यास मदत करेल. प्रमुख मापदंडामध्ये औद्योगिक पायाभूत सुविधा, गुंतवणुकीसाठी वातावरण, मानवी भांडवल आणि कौशल्य विकास, वित्त उपलब्धता, औद्योगिक उत्पादन व वाढ, शाश्वतता व नवोन्मेष, लॉजिस्टिक्स व बाजारपेठ प्रवेश यांचा समावेश असेल. महाराष्ट्रात प्रमाणित जिल्हा औद्योगिक विकास निर्देशांक अंमलात आणल्याने जिल्हा पातळीवर औद्योगिक क्षमता व आव्हाने यांचे सखोल आकलन होईल आणि संतुलित प्रादेशिक विकास आणि माहितीपूर्ण निर्णय प्रक्रिया सुलभ होईल. जिल्ह्यांमध्ये असलेल्या औद्योगिक विकासाच्या क्षमतेचा आढावा घेण्यासाठी, जिल्हा धोरणात्मक गुंतवणूक योजना, जिल्हा निर्यात योजना आणि जिल्हा उद्योग रूपरेखा जिल्हा प्रशासनामार्फत तयार करण्यात येईल. औद्योगिक कारणांसाठी एमआयडीसी आणि बिगर-एमआयडीसी क्षेत्रांमध्ये जिल्हानिहाय जमीन बँक तयार करण्यात येईल.

### ३.१.२(इ) एक जिल्हा एक उत्पादन (ODOP)

*मेक इन महाराष्ट्र* धोरणाचा एक महत्त्वाचा घटक म्हणजे राज्याच्या व्यापक औद्योगिक विकास चौकटीत *एक जिल्हा एक उत्पादन* या उपक्रमाचे एकत्रीकरण करणे हा आहे. जिल्हा-विशिष्ट उत्पादने आणि क्षमता ओळखून व त्यांचे पोषण करून, एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) विकेंद्रित उत्पादन परिसंस्थांचा विकास सक्षम करेल, प्रादेशिक स्पर्धात्मकता वाढवेल आणि समावेशक आर्थिक विकासाला चालना देईल. या दृष्टिकोनामुळे वैशिष्टपूर्ण स्थानिक उत्पादनांचे ब्रँडिंग, विपणन आणि निर्यात सुधारेल, ज्यामुळे ग्रामीण आणि निम-शहरी अर्थव्यवस्थेला चालना मिळेल.

### भौगोलिक संकेताचे (GI) प्रचालन

एमएसएमईंची विस्तारक्षमता, शाश्वतता व स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी महाराष्ट्र शासन एक सर्वसमावेशक अशा प्रोत्साहन चौकटीसह एक जिल्हा एक उत्पादन आणि भौगोलिक संकेत प्रचालन रणनिती सादर करेल. कृषी-औद्योगिक व कारागीर शक्तींमध्ये रुजलेल्या जिल्हा-विशिष्ट औद्योगिक परिसंस्थांना चालना देण्याच्या उद्देशाने, राज्याने आपल्या ३६ जिल्ह्यांमध्ये एक जिल्हा एक उत्पादन या उपक्रमाखाली आपली ७२ उत्पादने निश्चित केली आहेत. प्रत्येक जिल्ह्यासाठी राज्याने घोषित केलेली ODOP उत्पादनेच या चौकटीअंतर्गत धोरणात्मक लाभ आणि प्रोत्साहनांसाठी पात्र असतील.

### ३.१.२ (फ) हातमाग आणि हस्तकला यांना चालना

राज्याला हातमाग आणि हस्तकलांचा समृद्ध वारसा लाभला आहे. हा समृद्ध वारसा टिकवून ठेवण्यासाठी, कारागीरांना सक्षम करणे, शाश्वत पद्धतींना प्रोत्साहन देणे, बाजारपेठेतील प्रवेश वाढवणे, आर्थिक सहाय्य प्रदान करणे आणि सांस्कृतिक वारसा जतन करणे हे राज्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये प्रशिक्षण केंद्रांद्वारे कारागीर सक्षमीकरण आणि कौशल्य विकास, डिझाइन सहाय्य, बाजारपेठेतील दुवे व प्रवेश तसेच ऑनलाइन प्लॅटफॉर्म, व्यापार मेळे आणि जागतिक पोहोच यांच्याद्वारे निर्यातीस चालना यांचा समावेश असेल.

### ३.१.३ सर्वसमावेशकतेसाठी उपाययोजना

### ३.१.३ (अ) दिव्यांग व्यक्तींसाठी

दिव्यांग व्यक्तींना सक्षम करण्यासाठी आणि महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात दिव्यांगांचा सक्रिय सहभाग वाढविण्यासाठी पात्र उद्योगांना राज्य, अतिरिक्त प्रोत्साहन देईल. दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६ (तद्नंतरच्या वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सुधारणा) मधील तरतुदीनुसार दिव्यांगत्वाची व्याख्या करण्यात येईल. ज्या औद्योगिक घटकामध्ये ५०% किंवा त्याहून अधिक मालकी/भागीदारी/धारणाधिकार दिव्यांग व्यक्तींकडे आहे किंवा ५०% किंवा त्याहून अधिक दिव्यांग व्यक्तींना रोजगार आहे त्या व्यक्ती अनुज्ञेय धोरण लाभांव्यतिरिक्त अतिरिक्त प्रोत्साहने मिळण्यास पात्र असतील.

### ३.१.३ (ब) ग्रामीण उद्योजकता आणि उपजीविका विकास

राज्य, ग्रामीण उद्योजकता आणि उपजीविकेला प्रोत्साहन देईल, यामुळे बाजार जोडणी कार्यक्रम, खरेदीदार-विक्रेता बैठका व ग्रामीण उत्पादक, कारागीर व शेतकऱ्यांना शहरी बाजारपेठा, ई-कॉमर्स प्लॅटफॉर्म व निर्यात चॅनेल यांच्याबरोबर जोडणारे व्यापार मेळावे आयोजित केले जातील त्यामुळे उद्योजकांना नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळेल आणि त्यांच्या उत्पन्नाच्या संधी वाढतील.

नवीन उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण-२०२५ यामध्ये महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ व महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ यांच्या समन्वयाने पारंपरिक कला आणि हस्तकला, हस्तकला आणि हातमाग, खादी, बांबू कला, वन आधारित उपक्रम, गौण खनिजे, काथ्या, दुय्यम कृषी-आधारित उपक्रम, हर्बल आणि सौंदर्यप्रसाधने इत्यादींचा आढावा घेण्यासाठी ग्रामीण आणि कुटीर आधारित उद्योगांची पुनर्बांधणी करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाची स्थापना राज्यभरातील विविध ग्रामोद्योगांसह खादीला चालना देण्यासाठी आणि विकास करण्यासाठी करण्यात आली आहे. पारंपरिक आणि लघु उद्योगांना प्रोत्साहन देऊन ग्रामीण भागात शाश्वत रोजगार निर्माण करणे हे या मंडळाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. तर महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ हे सुविधा देण्याचे आणि सेवा प्रदात्याचे काम करते, यामुळे लहान व्यवसायांना संसाधने, बाजारपेठा आणि पायाभूत सुविधा उपलब्ध होतील याची खात्री होते. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ हे दोन्ही ग्रामीण उद्योजकता वाढवण्यात, रोजगाराच्या संधी निर्माण करण्यात आणि महाराष्ट्रातील लघु आणि ग्रामोद्योगांच्या शाश्वत वाढीस पाठिंबा देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.

### ३.१.३ (क) गडचिरोली-उदयोन्मुख स्टील सिटी आणि पूर्व विदर्भ स्टील कॉरिडोर

राज्य शासन गडचिरोलीला, विशेषतः सुरजागड प्रदेशास, त्याच्या समृद्ध लोहखनिज साठ्यांचा वापर करून पोलाद उत्पादनाचे एक नवीन केंद्र म्हणून धोरणात्मकदृष्ट्या महत्वाचे स्थान देत आहे. विशाल आणि अति विशाल गुंतवणुकीला चालना देण्यासाठी आणि प्रादेशिक असमानता कमी करण्यासाठी, राज्य मजबूत मल्टीमोडल

कनेक्टिव्हिटी, सुव्यवस्थित मंजुरी व भांडवली अनुदान, कर सवलती व प्लग-अँड-प्लेच्या पायाभूत सुविधा यासारख्या लक्ष्यित धोरणात्मक प्रोत्साहनांद्वारे समर्पित स्टील औद्योगिक क्षेत्रे विकसित करत आहे. कौशल्य विकास आणि रोजगाराच्या संधींद्वारे स्थानिक आदिवासी लोकसंख्येला एकत्रित करण्यावर विशेष लक्ष केंद्रित केले जात आहे. निर्यात सुलभता सुविधा यंत्रणा आणि सक्रिय जागतिक गुंतवणूकदारांपर्यंत पोहोचण्यासोबत, या उपाययोजनांचे उद्दिष्ट गडचिरोलीला शाश्वत, उच्च-दर्जाचे स्टील उत्पादन हब बनवणे हे आहे, यामुळे विदर्भ प्रदेशात सर्वसमावेशक आणि लवचिक औद्योगिक विकासाला चालना मिळेल.

या दृष्टिकोनाशी सुसंगत राहून, पूर्व विदर्भ स्टील कॉरिडॉर म्हणून विकसित केला जात आहे, जो खनिजांनी समृद्ध भूप्रदेश आणि प्रमुख लॉजिस्टिक्स मार्गांच्या सान्निध्याचा फायदा घेत आहे. हा कॉरिडॉर विदर्भ प्रदेशात महाराष्ट्राच्या औद्योगिक पुनरुत्थानासाठी कणा म्हणून काम करेल अशी अपेक्षा आहे, ज्यामुळे कच्चा माल आणि तयार वस्तूंची अखंड वाहतूक शक्य होईल. गडचिरोलीच्या संसाधन पाया आणि चंद्रपूरच्या औद्योगिक पायाभूत सुविधांमधील धोरणात्मक दुवा प्रणेता गुंतवणूकदारांना आकर्षित करण्यासाठी, प्रवाही उद्योगांना चालना देण्यासाठी आणि स्टील उत्पादनात एक मजबूत मूल्य साखळी तयार करण्यासाठी संरचित केला आहे.

## ३.२ कौशल्य आणि शाश्वतता

### ३.२.१ कामगारांचे कौशल्य विकास

#### ३.२.१(अ) उद्योग- शिक्षण क्षेत्र जोडणी

राज्यातील कामगारांची गुणवत्ता आणि स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी समर्पित कौशल्य केंद्रे स्थापन करून कौशल्य विकासाला राज्य, सक्रियपणे चालना देईल. ही केंद्रे उद्योजक आणि शैक्षणिक संस्थांसोबत भागीदारीमध्ये विकसित केली जातील, यामुळे सध्याच्या बाजारातील मागण्या आणि तांत्रिक प्रगती यांमध्ये सुसंगती निर्माण होईल. हा उपक्रम विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, व्यावहारिक कौशल्यांना चालना देणे आणि शिक्षण आणि रोजगार यांच्यातील दरी भरून काढणे यावर लक्ष केंद्रित करेल.

#### ३.२.१(ब) कौशल्य विद्यापीठ आणि इन-सिटू कौशल्य विकास केंद्रांना प्रोत्साहन

ईलेक्ट्रॉनिक वाहन, सेमीकंडक्टर, प्रगत उत्पादन आणि लॉजिस्टिक्स इत्यादी सारख्या उच्च-वृद्धी असलेल्या क्षेत्रांमध्ये मॉड्यूलर, क्रेडिट आधारित कार्यक्रमांद्वारे, उद्योगाच्या गरजांच्या अनुषंगाने कौशल्य निर्मिती करण्यासाठी राज्य, एका समर्पित कौशल्य विद्यापीठाला प्रोत्साहन देईल. हे विद्यापीठ, प्रत्यक्ष क्षेत्रात औद्योगिक प्रशिक्षणासोबतच वर्ग अध्ययनाचे एकत्रिकरण करुन दुहेरी शिक्षण मॉडेल स्वीकारेल आणि अभ्यासक्रमाचे आरेखन, प्रमाणन आणि कौशल्य नवोन्मेषासाठी उत्कृष्टता केंद्र म्हणून काम करेल.

या धोरणामुळे उद्योगांना ऑन-द-जॉब प्रशिक्षण, इन-सिटू कौशल्य विकास केंद्राद्वारे कौशल्य विकासात सक्रिय सहभाग घेण्यास चालना मिळेल. या केंद्रांना उच्च-रोजगार क्षेत्रांचे प्राधान्य देऊन, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास संस्थेद्वारे (MSSDS) आणि संबंधित योजनांद्वारे सहाय्य करण्यात येईल. एक मजबूत कौशल्य संपन्न कामगारांचा अविरत प्रवाह सुनिश्चित करण्यासाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्रनिकेतने आणि कौशल्य विद्यापीठांशी समन्वय करण्यास प्रोत्साहन दिले जाईल.

#### ३.२.१(क) इग्नाइट (IGNITE) महाराष्ट्र

उद्योग विभागाच्या नेतृत्वाखाली जिल्हास्तरीय जागरूकता आणि क्षमता-निर्मिती अभियांनाचे व्यासपीठ म्हणून समावेशक परिवर्तन आणि सक्षमीकरणासाठी राज्य, IGNITE महाराष्ट्र या उपक्रमाची अंमलबजावणी सुरू ठेवील. या कार्यशाळांमुळे कर्जाची उपलब्धता, लॉजिस्टिक आणि निर्यात, डिजिटल कॉमर्स, प्रशिक्षण आणि पॅकेजिंग, ब्रँडिंग आणि

गुणवत्ता वाढ यासारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये काम करणे सुलभ होते. राज्य अर्थपूर्ण सहकार्य वाढविण्यासाठी, शासकीय योजना व धोरणे यांबद्दल जागरूकता वाढविण्यासाठी, धोरण अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी आणि सर्व प्रदेशांमध्ये सर्वसमावेशक औद्योगिक विकास आणि आर्थिक विकास वाढविण्यासाठी, उद्योग भागधारक आणि महामंडळे यांसोबतचा आपला संस्थात्मक सहभाग आणखी मजबूत करेल.

### ३.२.१(ड) स्थानिक कौशल्यांना चालना देणे

स्थानिक कौशल्याच्या औद्योगिक परिवर्तनाला सहाय्य करण्यासाठी, राज्य, कामगारांच्या क्षमतांचा बदलत्या गरजांशी ताळमेळ घालेल, अशा मागणी आधारित कौशल्य संरचनेची अंमलबजावणी करेल. क्षेत्र-विशिष्ट प्रशिक्षण मॉड्यूल, कौशल्य विकास केंद्रे आणि अप्रेंटिसशिप कार्यक्रम उद्योग जगतातील भागधारकांच्या भागीदारीत सुरू केले जातील. हे उपक्रम, इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोटिव्ह, हरित ऊर्जा आणि वैद्यकीय उपकरणे यासारख्या उच्च-वाढ असलेल्या आणि तंत्रज्ञान-केंद्रित क्षेत्रांवर विशेषरीत्या लक्ष केंद्रित करतील, त्याद्वारे स्थानिक रोजगारक्षमतेत वाढ होईल आणि महाराष्ट्राच्या उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळाच्या अखंड प्रवाहाची सुनिश्चिती होईल.

### ३.२.२ शाश्वत आणि चक्रीय अर्थव्यवस्था

हरित उत्पादने, नवीकरणीय ऊर्जा आणि चक्रीय अर्थव्यवस्था पद्धतींना प्रोत्साहन देऊन शाश्वत औद्योगिकीकरणाला चालना देणे, हे राज्याचे उद्दिष्ट आहे. या धोरणांमध्ये चक्रीय अर्थव्यवस्था पार्क, पर्यावरणपूरक उद्योगांसाठीची प्रोत्साहने आणि कार्बन न्यूट्रयालिटी या उपक्रमांचा समावेश आहे. महाराष्ट्र औद्योगिक कचरा, उत्सर्जन आणि ऊर्जेचा वापर कमी करून त्याव्दारे पर्यावरणीय लवचिकता सुनिश्चित करतानाच शाश्वत औद्योगिक पद्धतींमध्ये स्वतःला आघाडीवर ठेवण्याची अपेक्षा करतो.

महाराष्ट्र, भारताच्या राष्ट्रीय ध्येयांच्या अनुषंगाने, २०७० पर्यंत निव्वळ शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी वचनबद्ध आहे. राज्याकडून आगामी समर्पित चक्रीय अर्थव्यवस्था धोरण लवकरच जाहीर करण्यात येईल.

### ३.२.२(अ) हरित पार्कस्‌चा विकास

राज्य, शाश्वत उत्पादनाला चालना देण्यासाठी, पर्यावरणावरील परिणाम कमी करण्यासाठी व नवीकरणीय ऊर्जा, जलसंवर्धन आणि प्रदूषण नियंत्रण उपायांद्वारे संसाधनांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सामायिक संसाधन सुविधांसह हरित औद्योगिक पार्कस विकसित करण्यास राज्य चालना देईल. ही क्षेत्रे हरित ऊर्जा, चक्रीय अर्थव्यवस्थेची तत्त्वे आणि पर्यावरणपूरक पायाभूत सुविधा एकत्रित करतील ज्यामुळे कमी प्रमाणात कार्बनचे उत्सर्जन होऊन औद्योगिक विकासाला चालना मिळेल.

### ३.२.२(ब) पर्यायी आणि स्वच्छ तंत्रज्ञानाच्या विकासासाठी संशोधन आणि विकासाला प्रोत्साहन

राज्य, पर्यायी आणि स्वच्छ तंत्रज्ञान यावर काम करणाऱ्या कंपन्यांच्या संशोधन व विकासाला चालना व प्रोत्साहन देईल. यामध्ये उद्योग-शैक्षणिक सहकार्याला चालना देणे, समर्पित संशोधन आणि विकास केंद्रे स्थापन करणे व हरित उत्पादन, कचऱ्यापासून ऊर्जा निर्माण करण्याचे उपाय आणि संसाधन कार्यक्षम उत्पादन पद्धतींमध्ये नवोन्मेषासाठी निधी उपलब्ध करून देणे याचा देखील समावेश आहे. जैव-आधारित साहित्य, ऊर्जा-कार्यक्षमता प्रक्रिया आणि प्रगत पुनर्वापर तंत्रज्ञानाच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल.

### ३.२.२ (क) जीवाश्म इंधनावर आधारित ऊर्जेपासून हरित ऊर्जेकडे टप्प्याटप्प्याने संक्रमण

राज्य, नवीकरण न होणाऱ्या ऊर्जा संसाधनाकडून नवीकरणीय ऊर्जा संसाधनांकडे स्थानांतरीत होण्यासाठी/स्थलांतरित होण्यासाठी उद्योगांना चालना देईल. भारत सरकारने उच्च उत्सर्जन क्षेत्रांपासून सुरुवात करून

नवीकरणीय ऊर्जा क्रमश: स्वीकारण्यासाठी स्पष्ट कालबध्द आराखडा तयार केला आहे. उत्पादन परिसंस्थेत नवीकरणीय ऊर्जा एकत्रित करण्यासाठी आर्थिक सहाय्य, व्यवहार्यता तफावत निधी आणि पायाभूत सुविधांच्या आधारे संक्रमण धोरणाला पाठिंबा दिला जाईल. शासन, बाजारपेठांमधील आणि हरित वित्तपुरवठा यंत्रणेमधील प्रवेश सुलभ करेल, जेणेकरुन, शाश्वत ऊर्जा वापराच्या दिशेने किफायतशीर आणि स्पर्धात्मक बदल सुनिश्चित करता येतील.

### ३.२.२ (ड) उत्सर्जन कमी करण्यासाठी कार्बन-केंद्रित उद्योगांवर लक्ष केंद्रित करणे

शाश्वत उत्पादन पद्धतींना प्रोत्साहन देऊन, स्टील, सिमेंट, वस्त्रोद्योग, साखर, औष्णिक ऊर्जा, खते, आसवनी (Distilleries), औषधनिर्माण आणि रसायने यासारख्या कार्बन-केंद्रित क्षेत्रांमधून होणारे कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी करण्यास राज्य प्राधान्य देईल.

प्रगतीस प्रोत्साहन देणे व मापदंड निश्चित करणे यासाठी राज्य उद्योगांसाठी आणि औद्योगिक उद्यानांसाठी ५-स्टार ते १-स्टार पर्यंतची GHG मूल्यांकन प्रणाली तयार करील आणि अंमलात आणील. उच्च-उत्सर्जन क्षेत्रांचे वर्गीकरण त्यांच्या कार्बन उत्सर्जन फूटप्रिंट आणि शाश्वत पद्धतींचे पालन याच्या आधारावर रंगधारित प्रणाली (उदा. पिवळे आणि लाल श्रेणी) वापरून केले जाईल. ही मूल्यांकन प्रणाली उद्योगांच्या पर्यावरणीय कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी आणि आर्थिक प्रोत्साहनांसाठी पात्रतेचा आधार म्हणून काम करील.

याव्यतिरिक्त, राज्य कार्बन क्रेडीट आणि अकाउंटिंग फ्रेमवर्क विकसित करील आणि कार्यान्वित करील, जे पाणी आणि ऊर्जेचा वापर, वृक्षारोपण प्रयत्न, कार्बन डायऑक्साईड उत्सर्जन आणि तृतीय-पक्ष ऑडिट केलेल्या शाश्वतता विधानांसारख्या प्रमुख शाश्वतता मापदंडांविरुद्ध कामगिरीचे मूल्यांकन करील. या प्रणालीद्वारे कार्बन क्रेडीट तयार करणारे उद्योग, हरित अनुदान कार्यक्रम अंतर्गत आर्थिक प्रोत्साहनांसाठी पात्र असतील.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने (CPCB) उत्पादन प्रक्रियेदरम्यान लक्षणीय कार्बन डायऑक्साईड उत्सर्जित करणाऱ्या अत्यंत प्रदूषणकारी उद्योगांच्या १७ श्रेणी निश्चित केल्या आहेत. राज्य, एकत्रिकृत हरित अनुदान योजनेद्वारे या उद्योगांना लक्षियत प्रोत्साहन देईल, ज्यामध्ये कार्बन-कपात तंत्रज्ञान आणि शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यासाठी आर्थिक सहाय्य आणि प्रतिपूर्ती समाविष्ट आहे.

सध्या, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) पर्यावरणीय अनुपालनाच्या आधारे उद्योगांचे मूल्यांकन करण्यासाठी पंचतारांकित (five star) मूल्यांकन यंत्रणा लागू करते. यावर आधारित, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ नवीन GHG मूल्यांकन प्रणालीला समर्थन देण्यासाठी कार्बन उत्सर्जन आणि नवीकरणीय ऊर्जा मॅट्रिक्स देखील विकसित करील.

**प्रस्तावित ५-स्टार हरित गृह वायू (GHG) मूल्यांकन यंत्रणा:**

- **५-स्टार :** उद्योग पूर्णपणे हरित आणि कार्बन प्रभावमुक्त आहे.
- **४-स्टार :** उद्योगात कार्बन उत्सर्जनाचे फूटप्रिंट खूप कमी आहे.
- **३-स्टार :** उद्योग, उत्सर्जन कमी करण्यात चांगली प्रगती करत आहे.
- **२-स्टार :** उद्योग मूलभूत पर्यावरणीय मानकांची पूर्तता करतो.
- **१-स्टार :** उद्योग किमान पर्यावरणीय अनुपालन पातळीवर कामगिरी करतो.

### ३.२.२(इ) सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापरासाठी सहाय्य

विशेषतः विशाल आणि अति-विशाल घटकामध्ये, प्रक्रिया केलेल्या पाण्यातील २५ टक्के पाण्याच्या पुनर्वापराचे लक्ष्य ठेवून शाश्वत औद्योगिक पद्धतींना चालना देणे हे धोरणाचे उद्दिष्ट आहे. पाणी टंचाई असलेल्या क्षेत्रात आणि जास्त

पाणी वापरणाऱ्या क्षेत्रातील उद्योगांना शून्य द्रव उत्सर्जन (ZLD) किंवा समतुल्य तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहित केले जाईल. जास्त पाणी वापरणाऱ्या उद्योगांना (उदा. वस्त्रोद्योग, रसायने, औषधनिर्माण) २०३० पर्यंत प्रक्रिया केलेल्या सांडपाण्यातील किमान ५० टक्के पाण्याचा पुनर्वापर करणे आवश्यक असेल.

राज्य, अर्थसहाय्यित सार्वजनिक-खाजगी भागीदारी मॉडेल्सद्वारे समूह-आधारित सांडपाणी पायाभूत सुविधांना प्रोत्साहन देईल, ज्यामुळे सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (CETP) आणि महानगरपालिका STP/CETP मधून उद्योगांना प्रक्रिया केलेले सांडपाणी पुरविण्यासाठी पाइपलाइन नेटवर्क विकसित व कार्यान्वित करणे शक्य होईल. या उपक्रमाचे उद्दिष्ट सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना समर्थन देणे, गोड्या पाण्यावरील अवलंबित्व कमी करणे आणि केंद्रीकृत प्रक्रिया आणि वितरण प्रणाली सुलभ करून पुनर्वापराला प्रोत्साहन देणे हे आहे. खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी भांडवली अर्थसहाय्य, व्यवहार्यता तफावत निधी, जलद मंजुरी आणि महानगरपालिकेच्या पायाभूत सुविधांशी एकत्रीकरण यासारखी प्रोत्साहने दिली जातील.

### ३.२.२(फ) हरित इमारतींना प्रोत्साहन

Indian Green Building Council (IGBC), Green Rating for Integrated Habitat Assessment (GRIHA), किंवा Leadership in Energy and Environmental Design (LEED) या संस्थाकडून हरित इमारत प्रमाणपत्र मिळवणाऱ्या उद्योग प्रमाणपत्र शुल्काची प्रतिपूर्ती, हरित पायाभूत सुविधांच्या कर्जासाठी व्याज अनुदान, अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक (FSI) आणि मालमत्ता करात सवलत अशा प्रोत्सहनांसाठी पात्र असतील. हे बदल लवकर स्वीकारणाऱ्या सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना प्रमाणपत्र शुल्काची पूर्ण प्रतिपूर्ती मिळेल आणि उत्कृष्ट हरित औद्योगिक प्रकल्पांना राज्यस्तरीय पुरस्कारांद्वारे पुरस्कृत केले जाईल.

### ३.२.२(ग) कार्बन क्रेडिट अकाउंटिंग आणि व्यवस्थापन संरचना

कार्बन मुक्त वातावरणाला चालना देण्यासाठी आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी, राज्य, आंतरराष्ट्रीय कार्बन बाजारपेठेत उद्योगांच्या सक्रिय सहभागाला प्रोत्साहित केले जाईल. उद्योगांना, जागतिक स्तरावरील मान्यताप्राप्त मानके, जसे की, व्हेरा चे व्हेरिफाईड कार्बन स्टँडर्ड्स (VCS), जागतिक उद्दिष्टांसाठी सुवर्ण मानक आणि क्योटो प्रोटोकॉल अंतर्गत स्वच्छ विकास यंत्रणा (CDM) स्वीकारण्यास प्रोत्साहित केले जाईल.

राज्य, जरी कार्बन अकाउंटिंग थेट करणार नसले तरी, ते मान्यताप्राप्त देखरेख, अहवाल आणि पडताळणी (MRV) संस्थांना प्रवेश सुलभ करेल, क्षमता-बांधणी उपक्रमांना सहाय्य देईल आणि पडताळणीयोग्य कार्बन क्रेडीट निर्माण करणाऱ्या उत्सर्जन-कपात करणाऱ्या प्रकल्पांना प्रोत्साहन देईल. प्रमाणित कार्बन क्रेडीट तयार करण्यास कारणीभूत असलेल्या शाश्वत पद्धतींचा अवलंब करणारे उद्योग कामगिरी-आधारित प्रोत्साहन(PLI) यासाठी पात्र असतील.

या व्यतिरिक्त, निवडक औद्योगिक पार्कना हरित गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी कार्बन न्यूट्रल धोरणे तयार करण्यासाठी आणि ते अंमलात आणण्यासाठी समर्थन दिले जाऊ शकते. पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठी, प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी आणि माहिती आधारित धोरण तयार करणे शक्य होण्यासाठी तयार करण्यात आलेले व्हेरिफाईड कार्बन क्रेडीट, एमआरव्ही एजन्सी प्रमाणपत्रे आणि उद्योग सहभागावरील सर्व संबंधित डेटा नियमितपणे उद्योग विभागाच्या ऑनलाइन पोर्टलवर नियमितपणे दिली जाईल.

### ३.२.२(ह) नवउपक्रमांना माध्यमातून शाश्वत नवोन्मेषास प्रोत्साहन देणे

हरित औद्योगिकीकरणाला चालना देण्यासाठी, उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाच्या मदतीने कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोन्मेष विभाग स्वच्छ तंत्रज्ञान, शाश्वत उत्पादन, ऊर्जा कार्यक्षमता, कचऱ्यापासून

मूल्यापर्यंत आणि वर्तुळाकार अर्थव्यवस्था उपायांमध्ये गुंतलेल्या नवोपक्रमांना प्रोत्साहन देईल. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवोन्मेष धोरण-२०२५ नवीन उद्योगांना शाश्वत तंत्रज्ञान आणि प्रथांचा स्वीकार करण्यासाठी प्रोत्साहीत करते. हे धोरण, अभ्यासक्रम आणि प्रत्यक्ष कार्यान्वयनामध्ये सुध्दा पर्यावरणासंदर्भातील शाश्वतता आणि जपणूक समाविष्ट करण्याच्या तरतूदी आहेत, ज्याद्वारे पर्यावरणस्नेही उपाययोजना तयार करणे किती महत्वाचे आहे, हे अधोरेखित होते. समर्थन यंत्रणेमध्ये सर्मपित ग्रीन इनोव्हेशन फंड, बीज भांडवल सहाय्य, ग्रीन टेक पार्कमध्ये अनुदानित इनक्यूबेशन आणि पायलट प्रकल्पांसाठी शासकीय टेस्टबेडची उपलब्धता यांचा समावेश असेल. शासन ग्रामीण आव्हानांसाठी शाश्वत उपाय विकसित करण्यासाठी स्थानिक ज्ञान आणि संसाधनांचा वापर करणाऱ्या तळागाळातील आणि ग्रामीण नवोन्मेषांना प्रोत्साहन देईल. स्टार्टअप्सना जलद-ट्रॅक नियामक मंजुरी, पेटंट समर्थन आणि विपणन सहाय्याचा फायदा होईल तसेच ग्रीन-प्रमाणित उत्पादनांसाठी सार्वजनिक खरेदीसाठी प्राधान्य प्रवेश मिळेल. नवोपक्रम आणि व्यापारीकरणाला गती देण्यासाठी राज्य शैक्षणिक आणि संशोधन संस्थांसोबत सहकार्य देखील सुलभ करेल.

### ३.२.२(य) चक्रीय अर्थव्यवस्थेला चालना

महाराष्ट्र राज्याने कचरा कमी करण्यासाठी, संसाधन कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि शाश्वत विकासाला चालना देण्यासाठी ६R तत्त्वे - Reduce, Recover, Recycle, Repair, Redesign, and Remanufacture - याद्वारे चक्रीय अर्थव्यवस्था स्वीकारण्याचे उद्दिष्ट समोर ठेवले आहे. आगामी सर्मपित चक्रीय अर्थव्यवस्था धोरणामुळे कचरा व्यवस्थापनात सुधारणा होईल,औद्योगिक सहजीवनास प्रोत्साहन मिळेल आणि हे धोरण हरित विकास, रोजगार निर्मिती आणि पर्यावरणीय शाश्वततेला समर्थन देईल. या धोरणात, पुनर्वापर, संसाधन पुनर्प्राप्ती आणि अक्षय ऊर्जेसाठी हब म्हणून चक्रीय अर्थव्यवस्था पार्कस विकसित करण्याच्या तरतुदी असतील. हे पार्कस ईव्ही, स्क्रॅप मेटल, प्लास्टिक, रबर, बांधकाम, वस्त्रे आणि कागद यासारख्या उद्योग क्षेत्रातील कचऱ्यावर प्रक्रिया करतील.

### ३.२.२(ज) विकेंद्रित ऊर्जा पायाभूत सुविधांतर्गत फ्लाय ॲश-आधारित उद्योग आणि हरित प्रकल्पांना प्रोत्साहन देणे

राज्य, शाश्वत आणि चक्रीय औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी, ऑफ-ग्रिड, बायोमास आणि कचऱ्यापासून ऊर्जा-आधारित वीज निर्मिती युनिट्समधून निर्माण होणाऱ्या फ्लाय ॲश आणि उप-उत्पादनांच्या औद्योगिक वापराला प्रोत्साहन देण्यासाठी वचनबद्ध आहे. ऊर्जा विभागाच्या शासन निर्णय, क्र. विकास-२०२५/ प्र.क्र./ऊर्जा-४, दि. १३ डिसेंबर, २०१६ आणि फ्लाय ॲश वापर धोरण,२०२५ च्या अनुषंगाने, राज्याने १००% फ्लाय ॲश वापर साध्य करण्याचे आणि विकेंद्रित, संसाधन-कार्यक्षम अशा हरित औद्योगिक परिसंस्थाना प्रोत्साहन देण्याचे ध्येय ठेवले आहे.

राज्य, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ द्वारे प्लग-अँड प्ले पायाभूत सुविधा सुलभ आाणि जमीनींचे सुलभ वाटप करुन त्याद्वारे या ऊर्जा निर्मिती केंद्रांच्या जवळपास फ्लाय ॲश-आधारित औद्योगिक समूहांच्या विकासाला प्रोत्साहन देईल. औष्णिक वीज प्रकल्प, बायोमास वीज प्रकल्प आणि औद्योगिक बॉयलर जवळील सेनोस्फीअरने समृद्ध असलेली क्षेत्रे विटा, ब्लॉक, टाइल्स, इन्सुलेशन साहित्य आणि इतर पर्यावरणपूरक बांधकाम उत्पादनांच्या निर्मितीमध्ये गुंतलेल्या फ्लाय ॲश-आधारित उद्योगांसाठी राखून ठेवले जातील.

**प्रकरण ४ उद्दिष्ट ३**

**वाढीव स्पर्धात्मकता - अर्थपूर्ण बदल घडवण्यासाठी वाढीव भांडवल कार्यक्षमता**

**४.१ वित्तीय प्रोत्साहने**

**४.१.१ उपक्रम वर्गीकरणानुसार वित्तीय प्रोत्साहने (उत्पादन)**

**४.१.१ (अ) एमएसएमईकरिता वित्तीय प्रोत्साहने**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रमांची वर्गवारी ही सूक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ (MSMED Act, २००६) मधील व्याख्येनुसार तसेच भारत सरकारच्या दि. २१ मार्च, २०२५ च्या असाधारण राजपत्रातील अधिसूचनेनुसार निश्चित करण्यात आलेली असून ती पुढीलप्रमाणे आहे.

- **सूक्ष्म उपक्रम -** सूक्ष्म उपक्रम, जिथे संयंत्र व यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री गुंतवणूक मर्यादा रु.२.५कोटी पर्यंत.
- **लघु उपक्रम** - लघु उपक्रम, जिथे संयंत्र व यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री गुंतवणूक मर्यादा रु.२.५ कोटी ते रु. २५ कोटी पर्यंत.
- **मध्यम उद्योग** - मध्यम उपक्रम, जिथे संयंत्र व यंत्रसामग्री किंवा साधनसामग्री गुंतवणूक मर्यादा रु. २५ कोटी ते रु. १२५ कोटी पर्यंत.

खालील तक्ता क्र. ४ मध्ये नमूद केलेल्या किमान स्थिर भांडवली गुंतवणूकीचे निकष पूर्ण करणाऱ्या औद्योगिक घटकाला सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम म्हणून प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात येतील.

**तक्ता क्र. ४ — सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटकांसाठी पात्रता निकष**

| तालुका / क्षेत्र वर्गीकरण | कमाल स्थिर भांडवल गुंतवणूक मर्यादा (रु. कोटीत) | स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या टक्केवारीनुसार कमाल मर्यादा | प्रोत्साहन कालावधी (वर्षे) |
|---|---|---|---|
| अ | रु. १२५ कोटी | ३०% | ५ |
| ब | | ४०% | ७ |
| क | | ५०% | ७ |
| ड | | ६०% | १० |
| ड+ | | ७०% | १० |
| विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव आणि धुळे | | ८०% | १० |
| विना उद्योग जिल्हे, नक्षलवाद प्रभावित क्षेत्रे* व आकांक्षी जिल्हे** | | १००% | १० |

** शासन निर्णय, गृह विभाग, क्र एनएएक्स -१२२०/प्र.क्र.१५३/ वि.शा.१ब, दि. २७.०६.२०२५ च्या नुसार किंवा शासन सुधारणा करेल, त्याप्रमाणे नक्षलवाद प्रभावित क्षेत्रे.*

*** आकांक्षी जिल्हे -धाराशिव , गडचिरोली , वाशिम आणि नंदुरबार*

- **औद्योगिक प्रोत्साहन अनुदान (IPS)** - पात्र सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना (तक्ता ४ नुसार) महाराष्ट्र राज्यात बिल केलेल्या व वितरित केलेल्या पात्र उत्पादनांच्या पहिल्या विक्रीवर घटकाद्वारे देय असलेल्या एकूण राज्य वस्तू व सेवा कराच्या (SGST) १००% रकमेवर औद्योगिक प्रोत्साहन अनुदान दिले जाईल.
- **भांडवली अनुदान** - भांडवली अनुदान खालील श्रेणी अंतर्गत थ्रस्ट क्षेत्रांसाठी लागू असेल:

i. निर्यातीच्या वार्षिक उलाढालीच्या किमान ५०% निर्यात करणारे असलेले निर्याताभिमुख घटक.

**किंवा**

ii. चक्रीय अर्थव्यवस्था प्रकल्प यांनी किमान ५०% देशांतर्गत/स्थानिक कच्चा माल पुनर्वापरित सामग्रीतून वापरणे आवश्यक असेल (ISO 14021 आणि EN 15343 सारख्या जागतिक मानकांचे पालन दर्शविण्यासाठी पुनर्वापरित सामग्री प्रमाणपत्र आवश्यक)

**किंवा**

iii. महिला उद्योजक किंवा अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती किंवा दिव्यांग व्यक्तींच्या पूर्णत: मालकीचे असलेले आणि एकूण कर्मचाऱ्यांपैकी किमान ५०% महिला असलेले घटक.

गट ड, ड+ व त्या वर्गवारी खालील क्षेत्रामधील घटकांसाठी, जमीन, इमारत आणि यंत्रसामुग्री यामधील १००% गुंतवणूक भांडवली अनुदानासाठी विचारात घेण्यात यईल.

गट क वर्गवारीमधील घटकांसाठी यंत्रसामुग्री यामधील ८०% गुंतवणूक भांडवली अनुदानासाठी विचारात घेण्यात यईल. आणि गट अ आणि ब वर्गवारीमधील घटकांसाठी यंत्रसामुग्री यामधील ५०% गुंतवणूक भांडवली अनुदानासाठी विचारात घेण्यात यईल.

भांडवली अनुदानाची कमाल मर्यादा रु.२५ कोटी किंवा पात्र स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या २०% यापैकी जे कमी असेल इतके अनुज्ञेय असेल. वार्षिक कमाल मर्यादा रु.५ कोटी इतकी असून प्रोत्साहन कालावधीमध्ये समान हप्त्यामध्ये वितरीत करण्यात येईल. प्रोत्साहन कालावधीत कोणत्याही वर्षामध्ये घटकाने विहीत अटी पूर्ण न केल्यास त्या वर्षाकरीता भांडवली अनुदान मंजूर करण्यात येणार नाही व अनुदानाची रक्कम पुढील वर्षाकरिता हस्तांतरित देखील करण्यात येणार नाही.

- **व्याज अनुदान** - जर पात्र एमएसएमई घटकाने दरवर्षी देय व्याजदराच्या किमान ५% योगदान दिले तर घटकाला दरवर्षी ५% पर्यंत व्याजदर अनुदान देय असेल. सदर एमएसएमई घटकांसाठी वार्षिक अनुदान मर्यादा रु. १ कोटी इतकी असेल.
- **मुद्रांक शुल्क सूट** - गट क, ड, ड+ व त्या वर्गवारी खालील क्षेत्रामधील नवीन आणि विस्तारित घटकांसाठी १००% मुद्रांक शुल्क सूट अनुज्ञेय राहील. गट अ व ब वर्गवारीमधील घटक जमीन संपादन किंवा मुदत कर्जाच्या प्रयोजनासाठी पहिल्या भाडेपट्टा / हस्तांतरण विलेखावर ५०% सूट मिळण्यास पात्र असतील.
- **वीज दर अनुदान** – गट ड, ड+ व त्या वर्गवारी खालील क्षेत्रामधील पात्र नवीन सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना प्रति युनिट रु. १ इतके वीज दर अनुदान ३ वर्षाकरिता रु. १ कोटीच्या मर्यादेत अनुज्ञेय राहील.
- **वीज शुल्क माफी** - गट क, ड, ड+ आणि त्या वर्गवारी खालील क्षेत्रातील पात्र आणि नवीन एमएसएमई घटकांना प्रोत्साहन अनुज्ञेय कालावधीत वीज शुल्कातून सूट दिली जाईल. गट अ व ब मधील क्षेत्रात ही सूट फक्त ५०% निर्यात उलाढाल (DGFT प्रमाणित) असलेल्या निर्याताभिमुख घटक (EOUs) आणि महिला, अनुसूचित जाती/जमाती किंवा अपंग व्यक्तींच्या पूर्णपणे मालकीच्या असलेल्या आणि प्रोत्साहन कालावधीमध्ये संबंधित ५०% कामगारांना रोजगार देणाऱ्या घटकांना लागू असेल.

  वीज शुल्क कायदा, १९५८ च्या तरतुदींनुसार आवश्यक आदेश/अधिसूचना/कार्यान्वयन आदेश ऊर्जा विभागाकडून स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.
- **रोजगार संलग्न अनुदान (ELS)** - राज्यात प्रत्यक्ष रोजगार निर्मितीला चालना देण्यासाठी रोजगार संलग्न अनुदान प्रस्तावित केले आहे. हे अनुदान प्रति रु. १ कोटी गुंतवणुकीमध्ये निर्माण झालेल्या रोजगार संख्येवर आधारित असेल. गट ड, ड+ आणि त्या वर्गवारी खालील क्षेत्रांसाठी घटकाला ५ वर्षाच्या कालावधीसाठी नियोक्त्याने केलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) योगदानाची प्रतिपूर्ती प्रति घटक प्रति वर्ष कमाल रु.५ कोटीच्या मर्यादेत अनुज्ञेय असेल. पात्रता व अनुदानाचे दर रोजगार गुणक (Employment Factor) यावर अवलंबून असेल. रोजगार गुणक म्हणजे रु. १ कोटी गुंतवणूकीमध्ये निर्माण झालेल्या रोजगारांची संख्या आहे.

**-रोजगार गुणक प्रति रु. १ कोटी गुंतवणूकीमध्ये २० पेक्षा अधिक प्रत्यक्ष रोजगार निर्मिती**: याकरीता गट ड व ड+ व त्या वर्गवारी खालील क्षेत्रात ५ वर्षासाठी नियोक्त्याने केलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) योगदानाची ५० टक्के प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

- **उत्पादन संलग्न प्रोत्साहन (PLI)**

उत्पादन संलग्न प्रोत्साहन ज्यांचा औद्योगिक प्रोत्साहन अनुदान (SGST) अंतर्गत समावेश नाही अशा पात्र घटकांना खालीलप्रमाणे लागू राहील.

  - १०० टक्के निर्याताभिमुख घटक (EOU)
  - ५०% पेक्षा जास्त निर्यातभिमुख घटक (EOUs)

सदर प्रोत्साहने हे १००% निर्याताभिमुख घटकांसाठी (EOUs) वाढीव उलाढालीच्या १.५% असेल आणि ५०% पेक्षा जास्त निर्याताभिमुख घटकांसाठी वाढीव उलाढालीच्या १% असेल. ही प्रोत्साहने ५ वर्षांच्या कालावधीसाठी स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या कमाल १०% च्या मर्यादेत अनुज्ञेय असतील. एमएसएमई घटकांना प्रोत्साहने ही वार्षिक कमाल रु. १ कोटीपर्यंत अनुज्ञेय असतील.

- **एमएसएमई घटकांसाठी परफॉर्मन्स आधारित अतिरिक्त प्रोत्साहने:**

पात्र एमएसएमईंना परफॉर्मन्स, गुणवत्ता स्पर्धात्मकता, शून्य दोष शून्य परिणाम (ZED योजना), संशोधन आणि विकास, तंत्रज्ञान अद्ययावतीकरण, पाणी आणि ऊर्जा संवर्धन, स्वच्छ उत्पादन उपाय, क्रेडिट रेटिंग, प्रमाणपत्र आणि पेटंट सहाय्य यांना प्रोत्साहन देण्यासाठी खालील प्रोत्साहने देय राहतील:

१. **तंत्रज्ञान अद्यावतीकरण सहाय्य:** तंत्रज्ञान अद्ययावतीकरणासाठी घेतलेल्या अतिरिक्त भांडवली उपकरणांच्या झालेल्या खर्चाच्या ५० टक्के अनुदान, कमाल रु.२५ लाखच्या मर्यादेत ५ वर्षाच्या कालावधीत अनुज्ञेय असेल.

२. **ऊर्जा व जल लेखापरीक्षणासाठी प्रोत्साहने:** जल लेखापरीक्षणावर झालेल्या खर्चाच्या ५० टक्के अनुदान कमाल रु. १ लाख मर्यादेत प्रति घटक तसेच ऊर्जा लेखापरिक्षणावर झालेल्या खर्चाच्या ५० टक्के अनुदान कमाल रु. २ लाख मर्यादेत प्रति घटक यानुसार प्रोत्साहन अनुज्ञेय असेल.

३. **ऊर्जा कार्यक्षमता प्रोत्साहन:** ऊर्जा कार्यक्षमता वाढविण्यासाठी अतिरिक्त भांडवली उपकरणाच्या खर्चाच्या ५० टक्के अनुदान कमाल रु. ५ लाख मर्यादेत अनुज्ञेय असेल.

४. **क्रेडिट रेटिंग प्रोत्साहन:** एमएसएमई घटकांना क्रेडिट रेटिंगसाठी भारतीय लघु उद्योग विकास बँक (सिडबी) /शासन मान्यता प्राप्त क्रेडीट रेटिंग संस्थेकडून केलेल्या रेटिंग खर्चाच्या ५० टक्के अनुदान कमाल रु. १ लाख मर्यादेत अनुज्ञेय असेल.

५. **सूचीकरण(Listing) खर्च प्रतिपूर्ती:** एसएमई स्टॉक एक्सचेंज वरील सूचीकरण खर्चाच्या ५० टक्के रक्कम कमाल रु. ५ लाख मर्यादेत किंवा सनदी लेखापाल व्दारा प्रमाणित प्रत्यक्ष सूचीकरण खर्च यापैकी जे कमी असेल ती रक्कम प्रोत्साहन म्हणून अनुज्ञेय असेल.

६. **गुणवत्ता, चाचणी आणि प्रमाणन प्रयोगशाळा स्थापित करण्यासाठी प्रोत्साहन:** प्रयोगशाळा स्थापित करण्यासाठी भांडवली खर्चाच्या (जमीन वगळून) ५० टक्के रक्कम कमाल रु.५ कोटी मर्यादेत अनुदान अनुज्ञेय असेल. ही तरतूद धोरण कालावधीत प्रथम स्थापित होणाऱ्या १२ प्रयोगशाळांकरीता मर्यादित असेल.

७. **गुणवत्ता प्रमाणन प्रोत्साहन:** एमएसएमई घटकांमध्ये गुणवत्ता सुधारणांना प्रोत्साहन देण्यासाठी प्रमाणन खर्चावर ७५ टक्के अनुदान देय असेल. GMP व Hallmark प्रमाणपत्रांकरिता रु.१ लाख पर्यंत तसेच पेटंट व भौगोलिक संकेतांक (GI) नोंदणीसाठी रु. २ लाखापर्यंत तसेच स्वतंत्र संशोधन आणि विकास प्रकल्पांना राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय प्रमाणपत्र मिळाल्यास प्रमाणन खर्चाच्या ५० टक्के रक्कम अनुज्ञेय असेल. अनुदानाची रक्कम सनदी लेखापालाव्दारे प्रमाणित केली जाईल आणि गुंतवणूक कालावधीमध्ये कमाल रु. ५ कोटी पर्यंत मर्यादित असेल.

८. **पेटंट खर्च परतावा:** संशोधन, नवोन्मेष आणि शाश्वत औद्योगिक पध्दतींना चालना देण्यासाठी धोरण कालावधीत स्थापित पात्र घटकांना देशांतर्गत पेटंट, कॉपीराईट, ट्रेडमार्क व जीआय नोंदणीवर झालेल्या खर्चासाठी साठी कमाल रु. २ लाख व आंतरराष्ट्रीय नोंदणी खर्चाकरिता कमाल रु. १० लाख प्रोत्साहन अनुज्ञेय असेल.

९. **ZED योजना प्रमाणपत्र खर्च परतावा:** उद्यम पोर्टलवर नोंदणीकृत सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योग घटकांना शून्य दोष शुन्य परिणाम (ZED) योजनेअंतर्गत प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अदा केलेल्या प्रमाणत्र शुल्काच्या ५० टक्के, कमाल मर्यादा रु. ५०,००० प्रति घटक परतावा देण्यात येईल.

- **एमएसएमई उपक्रमांच्या वाढीसाठी एक वेळ वाढीचे अनुदान**- एमएसएमई वाढीसाठी, त्यांची स्पर्धात्मकता वाढविण्यासाठी तसेच त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी राज्य शासन सदर धोरणांतर्गत एक वेळ वाढीचे अनुदान देईल. पूर्व-परिभाषित गुंतवणूक आणि उलाढालीची मर्यादा पूर्ण करणाऱ्या पात्र उद्योगांना तंत्रज्ञान सुधारणा, क्षमता विस्तार आणि बाजार एकात्मता समर्थन देण्यासाठी आर्थिक अनुदान मिळेल. हे अनुदान केवळ पहिल्या २५,००० पात्र घटकांना लागू असेल.

| | |
|---|---|
| **सूक्ष्म ते लघु उपक्रम** | अतिरिक्त स्थिर भांडवल गुंतवणुकीच्या ५० % किंवा रु.५ लाख,यांपैकी जे कमी असेल ते |
| **लघु ते मध्यम उपक्रम** | अतिरिक्त स्थिर भांडवल गुंतवणुकीच्या ५०% किंवा रु.१० लाख, यांपैकी जे कमी असेल ते |
| **मध्यम ते मोठे उपक्रम** | अतिरिक्त स्थिर भांडवल गुंतवणुकीच्या ५०% किंवा रु.२५ लाख, यांपैकी जे कमी असेल ते |

- **विशेष श्रेणी प्रोत्साहने:** महाराष्ट्रातील पात्र एमएसएमई घटकांना खालीलपैकी कोणत्याही एका श्रेणी अंतर्गत यंत्रसामग्री व उपकरणातील स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या १० टक्के अतिरिक्त प्रोत्साहन देण्यात येईल. हे प्रोत्साहन एकूण स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या १२० टक्के कमाल मर्यादेत लागू राहतील.

i. महिला उद्योजक, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती किंवा दिव्यांग व्यक्तींच्या पूर्णत: मालकीचे असलेले आणि एकूण कर्मचाऱ्यांपैकी किमान ५०% महिला, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती मधील व्यक्ती किंवा दिव्यांग व्यक्ती असलेले घटक

**किंवा**

ii. गट ड, ड+ व त्या वर्गवारीखालील क्षेत्रातील आणि उदयोन्मुख जिल्ह्यांतील घटक

**किंवा**

iii. प्राधान्य क्षेत्रात कार्यरत आणि प्रति रु. १ कोटी गुंतवणूकीमागे किमान १० प्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणारे घटक

• **निर्यात प्रोत्साहन** - पात्र एमएसएमई घटकांना राज्य निर्यात प्रोत्साहन धोरण २०२३ मधील तरतुदींनुसार प्रोत्साहन अनुज्ञेय राहील.

**४.१.१ ब ) मोठे उद्योग आणि विशेष मोठे उद्योगांसाठी वित्तीय प्रोत्साहने**

**मोठे उद्योग :** ज्या घटकाची स्थिर भांडवली गुंतवणूक मध्यम उद्योगांपेक्षा (₹१२५ कोटी) जास्त आहे परंतु, तक्ता क्र. ५ मध्ये विशेष मोठ्या उद्योग (Special LSI) म्हणून वर्गीकरणासाठी विहित केलेल्या किमान गुंतवणूक मर्यादेपेक्षा कमी गुंतवणूक आहेत त्यांना मोठे उद्योग (LSI) म्हणून वर्गीकृत केले जाईल. अशा घटकांना महाराष्ट्र राज्याच्या सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम धोरणांतर्गत अनुज्ञेय असणारी प्रोत्साहने देय राहतील

**विशेष मोठे उद्योग :** खालील तक्त्यांमध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे स्थिर भांडवली गुंतवणूक किंवा किमान प्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणाऱ्या औद्योगिक घटकांना विशेष मोठे उद्योग म्हणून वर्गीकृत केले जाईल.

**तक्ता क्र. ५ — विशेष मोठ्या उद्योगांसाठी पात्रता निकष**

| तालुका / क्षेत्र वर्गीकरण | पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीची किमान मर्यादा (रु. कोटीत) | किमान प्रत्यक्ष रोजगार (संख्या) | स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या टक्केवारीच्या प्रमाणात मर्यादा | प्रोत्साहन कालावधी (वर्षे) |
|---|---|---|---|---|
| अ आणि ब | ७५० | १००० | ४०% | ७ |
| क | ५०० | ७५० | ५०% | ७ |
| ड | ३५० | ५०० | ६०% | ७ |
| ड+ | २५० | २०० | ८०% | ७ |
| विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधूदुर्ग, जळगाव व धुळे | २०० | १५० | ९०% | ९ |
| विना उद्योग जिल्हे नक्षलवाद प्रभावित क्षेत्रे * आणि आकांक्षी जिल्हे ** | १५० | १२५ | १००% | ९ |

* शासन निर्णय, गृह विभाग, क्र एनएएक्स -१२२०/प्र.क्र.१५३/ वि.शा.१ब, दि. २७.०६.२०२५ च्या नुसार किंवा शासन सुधारणा करेल, त्याप्रमाणे नक्षलवाद प्रभावित क्षेत्रे.

** आकांक्षी जिल्हे - धाराशिव , गडचिरोली , वाशिम आणि नंदुरबार

**विशेष मोठ्या उद्योगांना खालील प्रोत्साहने लागू राहतील.**

- **औद्योगिक प्रोत्साहन अनुदान** - पात्र विशेष मोठे उद्योग (वरील तक्ता क्र. ५ नुसार) घटकांना महाराष्ट्र राज्यात बिल केलेल्या व वितरित केलेल्या पात्र उत्पादनांच्या पहिल्या विक्रीवर घटकाद्वारे देय असलेल्या एकूण राज्य वस्तू व सेवा कराच्या (SGST) १००% रकमेवर औद्योगिक प्रोत्साहन अनुदान अनुज्ञेय राहील.

- **मुद्रांक शुल्क माफी** - गट क, ड, ड+, व त्या वर्गवारी खालील क्षेत्रांमधील १०० टक्के मुद्रांक शुल्क सूट देण्यात येईल. तसेच गट अ व ब मधील घटक जमीन संपादनासाठी किंवा मुदत कर्जाच्या प्रयोजनासाठी पहिल्या भाडेपट्टयावर / हस्तांतरण करारावर ५० टक्क्यांची सूट मिळण्यास पात्र असतील.

- **वीज दर अनुदान** – गट ड, ड+ व त्या वर्गवारी खालील क्षेत्रांमधील पात्र नवीन विशेष मोठे उद्योगांना रु. १.५ कोटींच्या मर्यादेत ३ वर्षांकरीता वीज दरामध्ये प्रति युनिट रु. १ प्रमाणे वीज दर अनुदान दिले जाईल.

- **विद्युत शुल्क माफी** - गट क, ड, ड+ आणि त्या वर्गवारी खालील क्षेत्रातील पात्र नवीन विशेष मोठे उद्योगांना प्रोत्साहन कालावधीसाठी वीज शुल्कातून सूट देण्यात येईल. गट अ आणि ब वर्गवारी क्षेत्रामध्ये ही सूट केवळ ५०% निर्यात उलाढाल (DGFT प्रमाणित) असलेल्या EOUs आणि महिला, अनुसूचित जाती/अनुसूचित जमामी किंवा अपंग व्यक्तींच्या पूर्णपणे मालकीच्या असलेल्या आणि ७ वर्षांच्या कालावधीसाठी सदर गटातील ५०% कामगारांना रोजगार देणाऱ्या घटकांना लागू असेल.

- **रोजगार संलग्न अनुदान** (ELS) - राज्यात प्रत्यक्ष रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी रोजगार संलग्न अनुदान प्रस्तावित करण्यात येत आहे. हे प्रोत्साहन प्रति रु. १ कोटीच्या गुंतवणुकीमध्ये निर्माण झालेल्या प्रत्यक्ष रोजगाराच्या संख्येवर आधारित राहील. गट ड, ड+ आणि त्या वर्गवारी खालील क्षेत्रांतील पात्र घटकाला ५ वर्षाच्या कालावधीसाठी नियोक्त्याने केलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी योगदानाची प्रतिपूर्ती प्रति घटक प्रति वर्ष कमाल रु.१० कोटीच्या मर्यादेत असेल. अनुदानाचे दर रोजगार गुणक (Employment Factor) यावर अवलंबून राहील. रोजगार गुणक म्हणजे रु. १ कोटी गुंतवणूकीमध्ये निर्माण झालेल्या प्रत्यक्ष रोजगाराची संख्या आहे.

**-रोजगार गुणक प्रति रु. १ कोटी गुंतवणूकीमध्ये २० पेक्षा अधिक प्रत्यक्ष रोजगार निर्मिती:** याकरीता गट ड व ड+ व त्याखालील क्षेत्रात ५ वर्षासाठी नियोक्त्याने केलेल्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी (EPF) योगदानाची ५० टक्के प्रतिपूर्ती.

**टीप:** राज्य शासनाच्या विविध विभागांनी किंवा अभिकरणांनी मंजुरी दिलेली एकूण वित्तीय प्रोत्साहने ही राज्य शासनाने परिभाषित केलेल्या कमाल स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या मर्यादेत असतील.

**४.१.१ क) विशाल प्रकल्प आणि अति विशाल प्रकल्पांसाठी आर्थिक प्रोत्साहने**

तक्ता क्र. ६ मध्ये विहित केल्याप्रमाणे स्थिर भांडवल गुंतवणूकीची किंवा प्रत्यक्ष रोजगाराच्या किमान मर्यादेची पूर्तता करणाऱ्या औद्योगिक घटकांना विशाल प्रकल्प / अति विशाल प्रकल्प म्हणून वर्गीकरण करण्यात येईल.

**तक्ता क्र. ६ – विशाल आणि अति विशाल घटकासाठी पात्रता निकष**

| घटकाचा प्रकार | तालुका/क्षेत्र वर्गीकरण | विशाल घटक | | अति विशाल घटक | |
|---|---|---|---|---|---|
| | | पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीची किमान मर्यादा ( रु. कोटीत ) | किमान प्रत्यक्ष रोजगार (संख्या) | पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीची किमान मर्यादा ( रु. कोटीत ) | किमान प्रत्यक्ष रोजगार (संख्या) |
| विशाल आणि अति-विशाल | अ आणि ब | १५०० | २००० | ४००० | ४००० |
| | क | १००० | १५०० | ३००० | ३००० |
| | ड | ७५० | १००० | १५०० | २००० |
| | ड+ | ५०० | ७५० | १२५० | १५०० |

| घटकाचा प्रकार | तालुका/क्षेत्र वर्गीकरण | विशाल घटक | | अति विशाल घटक | |
|---|---|---|---|---|---|
| | | **पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीची किमान मर्यादा ( रु. कोटीत )** | **किमान प्रत्यक्ष रोजगार (संख्या)** | **पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीची किमान मर्यादा ( रु. कोटीत )** | **किमान प्रत्यक्ष रोजगार (संख्या)** |
| **औद्योगिक घटक** | विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव आणि धुळे | ३५० | ५०० | १००० | १००० |
| | विना उद्योग जिल्हे, नक्षलवाद प्रभावित क्षेत्रे आणि *आकांक्षी* जिल्हे | २०० | ३५० | ७५० | ७५० |

** शासन निर्णय, गृह विभाग, क्र एनएएक्स -१२२०/प्र.क्र.१५३/ वि.शा.१ब, दि. २७.०६.२०२५ च्या नुसार किंवा शासन सुधारणा करेल, त्याप्रमाणे नक्षलवाद प्रभावित क्षेत्रे.*
*** आकांक्षी जिल्हे - धाराशिव , गडचिरोली , वाशिम आणि नंदुरबार*

परंतु,

अ. रोजगाराच्या निकषानुसार अति विशाल आणि विशाल उद्योग घटकांना अर्हताधारक रोजगारांना संपूर्ण वर्षभर आपल्या हजेरी पटावर प्रत्यक्ष रोजगाराची आवश्यक पातळी कायम ठेवणे अनिवार्य आहे. वर्षाच्या कोणत्याही कालावधीत रोजगाराचा निकष पूर्ण न केल्यास, त्या वर्षासाठी औद्योगिक प्रोत्साहन अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

ब. उपरोक्त तक्त्यात नमूद विहित किमान प्रत्यक्ष रोजगार हा व्यावसायिक उत्पादन सुरू झाल्याच्या दिनांकापासून ३ वर्षांच्या कालावधीत निर्माण करणे आवश्यक आहे.

क. कॅप्टीव्ह ऊर्जा प्रकल्पासाठी केलेली गुंतवणूक ही विशाल किंवा अति विशाल प्रकल्प म्हणून पात्रतेचा निकषासाठी विचारात घेतली जाणार नाही.

ड. त्याच तालुक्यात असलेल्या १००% कॅप्टीव्ह प्रोसेस वेंडर (CPVs) किंवा १००% अनुदानित (Subsidiary) कंपनीने केलेल्या गुंतवणूकीचा समावेश पात्र स्थिर भांडवली गुंतवणूकीचा भाग म्हणून विचारात घेता येईल. तथापि, कॅप्टीव्ह प्रोसेस वेंडर गुंतवणूकीचा विशाल किंवा अति विशाल प्रकल्प म्हणून पात्रतेच्या निकषासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**टीप :**

- या योजनेअंतर्गत पात्रतेसाठी किमान गुंतवणूक आवश्यकतांचे (म्हणजेच गुंतवणूक मर्यादेत) विशिष्ट परिस्थितीत किंवा धोरणात्मक विचार यांवर अवलंबून, उच्चाधिकार समितीद्वारे पुर्नविलोकन केले जाऊ शकते आणि त्यात सुधारणा केली जाऊ शकते.
- विशाल आणि अति विशाल प्रकल्पांना सानुकूलित प्रोत्साहनांची तरतूद केली जाईल. मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीला विशाल आणि अतिविशाल प्रकल्पांसाठी सानुकूलित सामुहिक प्रोत्साहने मंजूर करण्याचे अधिकार असतील. उच्चाधिकार समितीने केलेल्या शिफारशीनुसार मंत्रिमंडळ उपसमितीला धोरणात्मक विशाल आणि अति विशाल प्रकल्पांसाठी विशेष / अतिरिक्त प्रोत्साहने देण्याचे अधिकार असतील.
- रोजगार निर्मितीच्या निकषावर आधारित विशाल प्रकल्प हे स्थिर भांडवली गुंतवणूक निकषावर आधारित प्रकल्पांमध्ये रूपांतरित करता येणार नाही. अशा प्रकल्पांना प्रोत्साहन कालावधीत पात्रता निकषांनुसार विहित रोजगार संख्या राखणे आवश्यक आहे. याशिवाय सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत राज्य शासनाकडून प्रोत्साहन घेणाऱ्या प्रकल्पांना शासनाने (शा.नि. क्र. ईएलपी-२००८/प्र.क्र. ९३/उद्योग-६, दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ नुसार) निर्धारित केल्यानुसार स्थानिक व्यक्तींना रोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. घटकांनी रोजगाराच्या निकषाची पूर्तता न केल्यास प्रोत्साहनांमध्ये कपात करण्यात येईल.

- उद्योग विभागाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनांव्यतिरिक्त राज्य शासनाच्या इतर प्रशासकीय विभागांकडून (उदा. सूतगिरण्या) सूक्ष्म, लघु, मध्यम, मोठे, विशाल व अति विशाल घटकांना प्रोत्साहने/सवलती दिल्या जातात. तथापि, सर्व स्रोतांमधून एकत्रितपणे कोणत्याही औद्योगिक घटकांना मिळणारे आर्थिक परतावे/प्रोत्साहने, ही शासनाने स्वतंत्रपणे अपवाद अधिसूचीत केल्याखेरीज स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १००% या कमाल मर्यादेतच कोणत्याही घटकाला अनुज्ञेय राहतील.
- विशाल, अति विशाल व प्राधान्य क्षेत्र प्रकल्पांसाठी एमआयडीसी आणि एमआयटीएल यांचेमार्फत जमीन वाटप प्राधान्याने केले जाईल. एमआयडीसीकडून कोणतेही प्राधान्य शुल्क किंवा रस्तारुंदी शुल्क आकारले जाणार नाही.
- घटकांना गट ड, ड+ व त्यापेक्षा खालील वर्गीकृत क्षेत्रामधील कमाल ३ ठिकाणांवरील गुंतवणूक एकत्रित करण्यास परवानगी राहील. तथापि, प्रत्येक ठिकाणावरील स्थिर भांडवली गुंतवणूक ही एकूण गुंतवणूकीच्या किमान ४० टक्के असणे बंधनकारक राहील. अशी एकत्रित गुंतवणूक तक्ता क्र. ५ व ६ नुसार विशेष मोठे, विशाल व अति विशाल श्रेणीतील पात्रता निश्चित करण्यासाठी ग्राह्य धरण्यात येईल. तथापि, या करिता सर्व गुंतवणूक ही एकाच उत्पादन क्षेत्रातील असणे बंधनकारक असेल.
- संयंत्रे व यंत्रसामग्री किंवा उपकरणांशी संबंधित अनुदानांची गणना करण्यासाठी एकूण स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या केवळ २०% गुंतवणूक ही विचारात घेतले जाईल. संयंत्रे व यंत्रसामग्री किंवा उपकरणांचा खर्च एखाद्या विशिष्ट घटकासाठी २०% स्थिर भांडवली गुंतवणूकीपेक्षा जास्त असल्यास सदर अनुदानासाठी अतिरिक्त टक्केवारीचा विचार केला जाणार नाही. हे सर्व वर्गीकरणातील घटकांना लागू असेल.

### ४.१.१ ड) अँकर व्हेंडर कनेक्टसाठी प्रोत्साहने

अँकर-व्हेंडर प्रोत्साहन हे मोठे अँकर उद्योग आणि त्यांच्या व्हेंडर परिसंस्थांमधील संबंध मजबूत करण्यासाठी संरचित केले आहे, ज्यामध्ये एमएसएमई उपक्रम आणि पुरवठादारांचा समावेश आहे. मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेच्या अधीन राहून विशाल आणि अति विशाल घटकांशी संबंधित १००% कॅप्टिव्ह व्हेंडर घटकांना अँकर घटकांप्रमाणे (भांडवल आणि जमीन खर्च अनुदान वगळता) प्रोत्साहनांसाठी पात्र असतील.

### ४.१.१ ई) आयात पर्यायासाठी प्रोत्साहने

लक्ष्यित प्रोत्साहने आणि धोरणात्मक समर्थनाद्वारे आयात पर्यायाला प्रोत्साहन देऊन औद्योगिक स्वयंपूर्णता वाढविणे आणि आयातीवरील अवलंबित्व कमी करणे हे राज्याचे उद्दिष्ट आहे. राज्यस्तरीय समिती HSN [Harmonized System of Nomenclature - आंतरराष्ट्रीय व्यापारात वस्तूंचे वर्गीकरण करण्यासाठी जागतिक सीमाशुल्क संघटनेने (WCO) विकसित केलेली एक प्रमाणित प्रणाली] कोड वर्गीकरण, स्थानिक उत्पादन पात्रता, राज्याच्या थ्रस्ट सेक्टरशी संरेखन आणि इतर देशांमधून आयातीचा कल यावर आधारित आयात पर्यायी उत्पादनांचे मूल्यांकन आणि प्रमाणन करेल जेणेकरून महत्त्वाचे पर्याय ओळखता येतील आणि प्रोत्साहन पात्रता निश्चित करता येईल.

आयात पर्यायात गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यासाठी, पात्र घटकांना खालील आर्थिक प्रोत्साहने मिळतील:

- **वाढीव आर्थिक सहाय्य:** राज्यातील पात्र घटकांना संयंत्र आणि यंत्रसामग्रीमध्ये स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या १०% अतिरिक्त प्रोत्साहन मिळेल.
- **तंत्रज्ञान व संशोधन आणि विकास प्रोत्साहनs:** देशांतर्गत तांत्रिक ज्ञान बळकट करण्यासाठी, पेटंट, कॉपीराइट, ट्रेडमार्क आणि भौगोलिक संकेत (GI) सारख्या बौद्धिक मालमत्तेच्या डिझाइनिंग, प्रोटोटाइपिंग आणि नोंदणीसाठी झालेल्या खर्चासह संशोधन आणि विकास व तंत्रज्ञान हस्तांतरण खर्चाची २०% पर्यंत प्रतिपूर्ती कमाल रु.१० कोटीच्या मर्यादेत अनुज्ञेय करण्यात येईल.

### ४.१.२ सेवा क्षेत्रातील घटकांसाठी आर्थिक प्रोत्साहने

नवीन सेवा क्षेत्रांतर्गत धोरण कालावधीत सुमारे ३५ लाखांहून अधिक रोजगार निर्मिती करण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे. प्राधान्य क्षेत्रातील सेवा घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी, खालील तक्ता क्र. ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे, किमान प्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणारे नवीन सेवा क्षेत्रातील घटक प्रोत्साहनासाठी पात्र असतील:

**तक्ता क्र. ७ – सेवा क्षेत्र घटकांसाठी पात्रता निकष**

| तालुका / क्षेत्र वर्गीकरण | एमएसएमई उपक्रम (किमान रोजगार निर्मिती) | मोठे (किमान रोजगार निर्मिती) | विशाल प्रकल्प (किमान रोजगार निर्मिती) | अति विशाल प्रकल्प (किमान रोजगार निर्मिती) |
|---|---|---|---|---|
| अ आणि ब | ३५० | ७५० | १५०० | ३००० |
| क | २५० | ५०० | १००० | २००० |
| ड | १५० | ३५० | ७५० | १५०० |
| ड+ | १२५ | २०० | ५०० | १००० |
| **विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, जळगाव आणि धुळे** | १०० | १५० | ३५० | ४०० |
| **विना उद्योग जिल्हे, नक्षलवाद प्रभावित क्षेत्रे आणि आकांक्षी जिल्हे** | ५० | १२५ | २५० | ३५० |

** शासन निर्णय, गृह विभाग, क्र एनएएक्स -१२२०/प्र.क्र.१५३/ वि.शा.१ब, दि. २७.०६.२०२५ च्या नुसार किंवा शासन सुधारणा करेल, त्याप्रमाणे नक्षलवाद प्रभावित क्षेत्रे.*
**** **आकांक्षी जिल्हे** *- धाराशिव , गडचिरोली , वाशिम आणि नंदुरबार*

परंतु :

अ. प्रोत्साहनाचा लाभ घेण्यासाठी , सेवा क्षेत्रातील घटकांना संपूर्ण वर्षभर आपल्या हजेरीपटावर अर्हताधारक प्रत्यक्ष रोजगाराची (पात्र घटकाच्या नोंदणीवर आणि परिसरात) आवश्यक पातळी कायम ठेवणे अनिवार्य आहे आणि अशा कर्मचाऱ्यांपैकी किमान ८०% कर्मचारी स्थानिक व्यक्ती असणे आवश्यक आहे (सामान्य स्थानिक रोजगार आदेशावरील शासन निर्णय, क्र. ELP-२००८/C.No.९३/उद्योग-६ दिनांक १७ नोव्हेंबर, २००८ नुसार)

ब. उपरोक्त तक्त्यात नमूद विहित किमान प्रत्यक्ष रोजगार हा सेवा दिल्याच्या दिनांकापासून २ वर्षांच्या कालावधीत निर्माण करणे आवश्यक आहे.

**४.१.२ (अ) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी प्रतिपूर्ती-**

- राज्य शासन, गट ड, ड+ आणि त्या वर्गवारी खालील क्षेत्रांमध्ये ५ वर्षांसाठी पहिल्या ५०० पात्र घटकांसाठी प्रति महिना रु.५०,०००/- पेक्षा जास्त वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी नियोक्त्याने केलेल्या भविष्य निर्वाह निधी योगदानाची ५०% प्रतिपूर्ती प्रति घटक रु. १० कोटीच्या मर्यादेत देय असेल.
- राज्य शासन गट क वर्गवारीतील क्षेत्रामध्ये ५ वर्षांसाठी प्रति महिना रु.७५,००० पेक्षा जास्त वेतन असलेले तसेच गट अ व ब मध्ये प्रति महिना रु.१ लाख पेक्षा जास्त वेतन असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी नियोक्त्याने केलेल्या भविष्य निर्वाह निधी योगदानाची ५०% प्रतिपूर्ती प्रति घटक रु.१० कोटीच्या मर्यादेत देय असेल. सदर प्रोत्साहन हे पहिल्या ५०० पात्र घटकांसाठी लागू राहील. स्थानिक रोजगार, महिला आणि अपंग व्यक्तींना (PWD) प्रोत्साहन देण्यासाठी अतिरिक्त अनुदान देण्यात येईल.

**४.१.२ (ब) भाडेपट्टा अनुदान –**

उद्योग, गुंतवणूक आणि सेवा विभागाने राज्याच्या वेगवेगळ्या भागांमधील वेगवेगळ्या भाडेपट्ट्याच्या दरांची दखल घेतली आहे. त्यानुसार, विविध प्रदेशांमधील प्रचलित भाडेपट्ट्याच्या दरांच्या प्रमाणात प्रोत्साहनांचे प्रमाण निश्चित केले आहे. राज्य शासन भाडेपट्ट्यावर खालीलप्रमाणे अनुदान देईल:

- गट ड, ड+, व त्या वर्गवारी खालील क्षेत्रांमधील पात्र घटकांसाठी ५०% पर्यंत किंवा रु. १ कोटीच्या मर्यादेत यापैकी जे कमी असेल ते, अनुदान केवळ पहिल्या २० घटकांसाठी ५ वर्षाच्या कालावधीकरीता अनुदेय असेल.
- गट क वर्गवारी क्षेत्रामधील पात्र घटकांसाठी ५०% पर्यंत किंवा रु. १० कोटीच्या मर्यादेत यापैकी जे कमी असेल ते, अनुदान केवळ पहिल्या २० घटकांसाठी ५ वर्षाच्या कालावधीकरीता अनुदेय असेल.
- गट अ व ब वर्गवारी क्षेत्रामधील पात्र घटकांसाठी ५०% पर्यंत किंवा रु. २० कोटीच्या मर्यादेत यापैकी जे कमी असेल ते, अनुदान केवळ पहिल्या २० घटकांसाठी ५ वर्षाच्या कालावधीकरीता अनुदेय असेल.

**४.१.२ (क) मुद्रांक शुल्क माफी** - गट क, ड, ड+ व त्या वर्गवारी खालील क्षेत्रांमधील पात्र नवीन सेवा क्षेत्रातील घटकांना १०० टक्के मुद्रांक शुल्कात माफी देण्यात येईल तसेच गट अ व ब वर्गवारी क्षेत्रातील घटक पहिल्या भाडेपट्टावर / हस्तांतरण करारावर ५० टक्क्यांची माफी मिळण्यास पात्र असतील. ही सवलत केवळ विशाल व अतिविशाल घटकांकरिता लागू राहील.

**४.१.२ (ड) विद्युत शुल्क माफी** –गट क, ड, ड+ आणि त्या वर्गवारी खालील क्षेत्रातील पात्र नवीन सेवा क्षेत्रातील घटकांना ५ वर्ष कालावधीसाठी विद्युत शुल्क माफी देण्यात येईल तसेच गट अ आणि ब वर्गवारी क्षेत्रात केवळ ३ वर्ष कालावधीसाठी विद्युत शुल्क माफी अनुज्ञेय असेल.

**४.१.२ (इ) कौशल्य अनुदान -**

उद्योग विभाग, उद्योग-शिक्षण-कौशल्य केंद्रांमधील भागीदारी सुलभ करील. खाजगी क्षेत्राला, आघाडीच्या शैक्षणिक संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था तसेच राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळ (NSDC) अंतर्गत अधिसूचित प्रशिक्षण केंद्रे यांमध्ये कौशल्यवर्धनासाठी अभ्यासक्रमाची रचना करण्यासाठी सहभागी होण्यास व तो अभ्यासक्रम सुरू करण्यास प्रोत्साहन दिले जाईल. यासाठी राज्य शासन प्रति घटक कमाल १०० कर्मचाऱ्यांना आर्थिक सहाय्य देईल. हे प्रोत्साहन केवळ विशाल आणि अति विशाल घटकांना लागू आहे.

- गट ड, ड+ आणि त्या वर्गवारी खालील क्षेत्रात, पहिल्या २० पात्र घटकांना ५ वर्षांच्या कालावधीत प्रशिक्षण खर्चाच्या ५० % किंवा रु. २ कोटी, यांपैकी जे कमी असेल ते अनुदान देय असेल.
- गट क तसेच गट अ व ब वर्गवारी क्षेत्रात पहिल्या २० पात्र घटकांना ५ वर्षांच्या कालावधीत प्रशिक्षण खर्चाच्या ५० % किंवा रु.१ कोटी, यांपैकी जे कमी असेल ते अनुदान देय असेल.

**४.१.२ (फ) संशोधन आणि विकास व नवोन्मेष अनुदान** – संशोधन आणि विकास निधी यासाठी रु.१००० कोटींची तरतूद करण्यात येईल. यापैकी रु. ३०० कोटी निधी सेवा क्षेत्रातील संशोधन आणि विकासासाठी राखीव ठेवला जाईल. पात्र घटकांना त्यांच्या संशोधन आणि विकास खर्चाच्या ५०% पर्यंत १० समान हप्त्यांमध्ये अर्थसहाय्य देण्यात येईल. ज्याची मर्यादा रु.१० कोटीपर्यंत असेल. किमान संशोधन आणि विकास गुंतवणूक मर्यादा एकूण वार्षिक उलाढालीच्या २% असेल. पात्रता ही वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन विभाग (DSIR) द्वारे मान्यताप्राप्त सेवा क्षेत्रातील संशोधन आणि विकास घटकांपुरतीच मर्यादित असेल. हे प्रोत्साहन केवळ विशाल आणि अति विशाल घटकांना लागू असेल.

**४.१.२ (ग) फॉर्च्यून-५०० आणि बिलियन डॉलर कंपन्यांना विशेष अनुदान**

- झोन- १ मधील १२ उदयोन्मुख जिल्ह्यांसाठी - जिथे दरडोई उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे – अशांसाठी राज्य शासन प्रति एकर रु. १ उच्च अनुदानित दराने जमीन देईल. हा लाभ प्रति जिल्हा एक घटक आणि कमाल ५० एकर पर्यंत मर्यादित राहील.
- पात्र होण्यासाठी कंपन्यांनी Fortune ५००, Forbes Global २०००, FT Global ५००, किंवा ET-५०० यासारख्या मान्यताप्राप्त जागतिक यादींचा भाग असणे आवश्यक आहे किंवा त्यांचे बाजार भांडवल किमान एक अब्ज अमेरिकन डॉलर्स असणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त प्रकल्पाने किमान १,००० प्रत्यक्ष रोजगार निर्मिती करणे आवश्यक असून प्रादेशिक विकास, कौशल्य वाढीमध्ये योगदान देणे आवश्यक आहे आणि राज्यासाठी धोरणात्मकदृष्टया तो प्रकल्प महत्त्वाचा असणे आवश्यक आहे.
- महाराष्ट्राच्या आर्थिक सर्वेक्षण २०२४ नुसार झोन-१ मध्ये नंदुरबार, वाशिम, बुलढाणा, गडचिरोली, हिंगोली, यवतमाळ, परभणी, बीड, जालना, नांदेड, जळगाव, गोंदिया यांचा समावेश आहे.

- जिल्हा राजधानी आणि औद्योगिक विकसित तालुक्यांच्या तुलनेत दुर्गम तालुक्यांमधील (ज्यामध्ये झोन-१ च्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा जास्त फरक आहे) गुंतवणूक अधिक प्रोत्साहन आकर्षित करेल.

**४.१.२ (ह) टियर २ शहरांमधील सेवा क्षेत्रांना प्रोत्साहने**

टियर १ महानगरांच्या तुलनेत भाडे, उपयुक्तता आणि प्रतिभा संपादन यासह ऑपरेशनल खर्च लक्षणीयरीत्या कमी असल्याने, सेवा कंपन्यांना टियर २ शहरांमध्ये स्थापनेसाठी प्रोत्साहन दिले जाईल, ज्यामुळे नफा आणि प्रमाणता वाढेल. याव्यतिरिक्त, ही शहरे कुशल पदवीधरांच्या वाढत्या समूहाला आणि सुधारित पायाभूत सुविधांना प्रवेश सुलभ करतात, ज्यामुळे ते आयटी, बीपीओ आणि बॅक-ऑफिस ऑपरेशन्ससाठी आदर्श बनतात.

टियर-२ शहरांमध्ये आयटी/बीपीओ/केपीओ सेवा घटकांना प्रोत्साहन देण्यासाठी, उच्चाधिकार समिती आणि मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेच्या अधीन राहून, विशाल आणि अतिविशाल यांना स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या कमाल १२०% मर्यादेपर्यंत अतिरिक्त प्रोत्साहने दिली जातील. महाराष्ट्रातील टियर-२ शहरांमध्ये पायाभूत सुविधांच्या विकासाला प्राधान्य दिले जाईल.

सेवा क्षेत्रातील घटकांच्या कामगिरीच्या आधारे, एक वर्षानंतर आढावा घेतला जाईल, त्यानंतर मंत्रिमंडळ उपसमिती उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनुसार पात्रता आणि प्रोत्साहनांवर निर्णय घेईल.

**४.१.३ अतिरिक्त प्रोत्साहने (उत्पादन आणि सेवा क्षेत्रातील घटकांसाठी)**

**४.१.३ (अ) उदयोन्मुख जिल्ह्यांमध्ये औद्योगिक वाढीसाठी प्रोत्साहन**

२७ उदयोन्मुख जिल्ह्यांचा समावेश असलेल्या झोन १ आणि २ मधील नवीन घटक किंवा विस्तार घटक स्थापन करणाऱ्या औद्योगिक घटकांना विशेष प्रोत्साहने दिली जातील.

**झोन १: भारतापेक्षा कमी दरडोई उत्पन्न असलेले जिल्हे (रु.१,८८,८९२):** नंदुरबार, वाशीम, बुलढाणा, गडचिरोली, हिंगोली, यवतमाळ, परभणी, बीड, जालना, नांदेड, जळगाव, गोंदिया

**झोन २: महाराष्ट्रापेक्षा कमी दरडोई उत्पन्न (रु.२,७८,६८१) परंतु भारतापेक्षा जास्त दरडोई उत्पन्न असलेले जिल्हे:** धुळे, धाराशिव, अमरावती, लातूर, भंडारा, अकोला, चंद्रपूर, वर्धा, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सातारा, रत्नागिरी, नाशिक, सोलापूर, सांगली

- राज्यातील सर्वांगीण औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात २५ नवीन प्रकल्प स्थापन करण्याचे धोरणाचे उद्दिष्ट आहे.
- सदर प्रोत्साहनांचा लाभ घेण्यासाठी किमान स्थिर भांडवली गुंतवणूक रु.५०० कोटी आणि ५०० रोजगार निर्मिती करणे आवश्यक आहे.
- पात्रता निकष पूर्ण करणाऱ्या पात्र घटकांना झोन १ मध्ये स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या २५% आणि झोन २ मध्ये १५% पर्यंत अतिरिक्त प्रोत्साहने अनुज्ञेय असतील.

**उदाहरणार्थ:** एक उत्पादन घटक ₹६०० कोटी इतकी स्थिर भांडवली गुंतवणूक आणि ७०० रोजगार निर्मिती करुन पात्रता निकष पूर्ण करत असेल आणि जर हे घटक झोन १ मध्ये स्थित असेल, तर त्याला त्याच्या स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या २५% इतके अतिरिक्त प्रोत्साहन मिळेल, जे ₹१५० कोटी इतके असेल. याउलट, जर तेच घटक झोन २ मध्ये स्थित असेल, तर अतिरिक्त प्रोत्साहन स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या १५% पर्यंत असेल, जे ₹९० कोटी इतके असेल.

- दुर्गम तालुक्यांमधील गुंतवणूक (ज्यामध्ये झोन १ च्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा फरक जास्त आहे) जिल्हा राजधानी आणि औद्योगिक विकसित तालुक्यांच्या तुलनेत अधिक प्रोत्साहने आकर्षित करतील.
- उदयोन्मुख जिल्ह्यातील गुंतवणुकीमुळे रोजगार निर्मिती, स्थानिक पुरवठा साखळी मजबूत करून आणि पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देऊन प्रादेशिक परिवर्तन घडवून आणण्याचा मानस आहे. अशा घटकांना एकल खिडकी प्रणालीद्वारे जलद-मान्यता आणि समर्पित सहाय्यासह प्राधान्य सुविधा मिळतील.

### ४.१.३ (ब) मनुष्यबळ बकटीकरणासाठी प्रोत्साहने

कौशल्यातील तफावत भरून काढणे, रोजगार निर्मितीला चालना देणे आणि उद्योगासाठी तयार असलेल्या प्रतिभांची उपलब्धता सुनिश्चित करून महाराष्ट्र राज्याला पसंतीचे गुंतवणूक गंतव्यस्थान म्हणून स्थान देणे हे या उपक्रमाचे उद्दिष्ट आहे.

**(i) व्यापक योजना**

- **मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना (CMYKPY) आणि EDTP -** मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सारख्या उपक्रमांद्वारे कौशल्य विकास आणि उद्योजकता मजबूत करण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे, जी स्थानिक प्रतिभांना नियुक्त करणाऱ्या उद्योगांना ६ ते ११ महिन्यांसाठी (अभ्यासक्रमावर आधारित) प्रति उमेदवार रु.१०,००० पर्यंत कामगिरीवर आधारित प्रोत्साहन देते (www.cmykpy.mahaswayam.gov.in) आणि एक सुधारित उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (EDTP), जो 'कॅच देम यंग' दृष्टिकोनाखाली निवासी आणि अनिवासी प्रशिक्षणासाठी रु.१०,००० पर्यंत वाढीव वेतन प्रदान करेल.
- **महाराष्ट्र अप्रेंटिसशिप प्रमोशन स्कीम (MAPS) -** संरचित ऑन-द-जॉब प्रशिक्षणात सहभागी होणाऱ्या उद्योगांसाठी राज्य प्रति अप्रेंटिस दरमहा रु.५,००० पर्यंत मर्यादित अप्रेंटिसशिप खर्चाच्या ५०% पर्यंत विद्यावेतन परतफेड ३ वर्षांच्या कालावधीपर्यंत देईल.
- **कौशल्य-संलग्न प्रोत्साहन योजना (SLIS):** राज्य स्थानिक लोकसंख्येला कौशल्य आणि रोजगार देण्यासाठी उद्योगांकरीता कामगिरी-आधारित प्रोत्साहन सुरू करेल. घटकाच्या एकूण मनुष्यबळ क्षमतेच्या कमाल २०% पर्यंत प्रति उमेदवार रु.२०,००० ची प्रोत्साहन रक्कम दिली जाईल. कौशल्य विकास विभागाशी समन्वय साधून कंपन्या, उद्योग संघटनांकडून कौशल्य विकास, पुनर्कौशल्य निर्माण करण्यास राज्य प्रोत्साहन देईल.
- **पीएम विकसित भारत रोजगार योजना:** जी पूर्वी रोजगार संलग्न प्रोत्साहन (ELI) योजना म्हणून ओळखली जात होती, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना (EPFO) द्वारे औपचारिक रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्यासाठी भारत सरकारचा हा एक उपक्रम आहे. या योजनेअंतर्गत, दरमहा रु.१ लाख पर्यंत उत्पन्न असलेल्या कर्मचाऱ्यांना ६ आणि १२ महिने सतत नोकरी पूर्ण केल्यानंतर दोन हप्त्यांमध्ये रु. १५,००० प्रोत्साहन मिळू शकेल. २ ते ५ नवीन कामगारांना कामावर ठेवणारे नियोक्ते २ वर्षांपर्यंत प्रति कर्मचारी रु.१,००० ते रु.३,००० पर्यंत मासिक प्रोत्साहनासाठी पात्र आहेत, ज्यामध्ये उत्पादन क्षेत्रातील फायदे ४ वर्षांपर्यंत वाढवले जातील. ही योजना १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७ याकालावधीत निर्माण झालेल्या रोजगारासाठी लागू आहे.

**(ii) महिला सक्षमीकरण उपक्रम**

महाराष्ट्रातील महिला उद्योजकांच्या सक्षमीकरणासाठी व राज्याच्या आर्थिक विकासामध्ये त्यांचा सहभाग वाढविण्यासाठी, व्यापक पाठिंबा, आर्थिक सहाय्य, प्रशिक्षण व संसाधन उपलब्धतेत सुधारणेस चालना देणे या उद्देशाने राज्यातील महिला उद्योजकांसाठी खालीलप्रमाणे विशेष प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

**तक्ता क्र. ८: महिला उद्योजकांसाठी अतिरिक्त प्रोत्साहने**

| वर्गीकरण | महिला मालकी/ भागीदारी/ भाग भांडवल | कंपनीतील किमान महिला कर्मचारी | अतिरिक्त प्रोत्साहने (पात्र प्रोत्साहनांव्यतिरिक्त) |
|---|---|---|---|
| विदर्भ, मराठवाडा, विना उद्योग जिल्हे, आकांक्षी जिल्हे व नक्षलवाद प्रभावित क्षेत्र | १००% | १००% | २०% |
| समूह ड, ड+ | १००% | ५०% | १०% |
| | ५०% | १००% | |
| | ५०% | ५०% | |
| क | ५०% | ५०% | ५% |

घटकास पात्र होण्यासाठी मालकी आणि रोजगार निकष पूर्ण करणे बंधनकारक राहील.

**(iii) अनुसूचित जाती (SC) / अनुसूचित जमाती (ST)**

राज्य शासनाचा अनुसूचित जाती/जमाती प्रवर्गातील उद्योजकांना राज्याच्या आर्थिक विकासात त्यांचा सहभाग वाढवून सक्षम करणे हा उद्देश असून पात्र अनुसूचित जाती/जमाती उद्योजकांना खालीलप्रमाणे अतिरिक्त प्रोत्साहने अनुज्ञेय राहतील.

**तक्ता क्र. ९: अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती साठी अतिरिक्त प्रोत्साहने**

| वर्गीकरण | अ.जा./अ.ज. मालकी/ भागीदारी/ भाग भांडवल | कंपनीतील किमान अ.जा./ अ.ज. प्रवर्गातील कर्मचारी | अतिरिक्त प्रोत्साहने (पात्र प्रोत्साहनांव्यतिरिक्त) |
|---|---|---|---|
| विदर्भ, मराठवाडा, विना उद्योग जिल्हे, आकांक्षी जिल्हे व नक्षलवाद प्रभावित क्षेत्र | १००% | १००% | २०% |
| ड, ड+ | १००% | ५०% | १०% |
| | ५०% | १००% | |
| क | ५०% | ५०% | ५% |

घटकास पात्र होण्यासाठी मालकी व रोजगार निकष पूर्ण करणे बंधनकारक राहील.

**टीप:** कोणत्याही घटकास उपरोक्त २ पर्यायांपैकी फक्त एकच प्रोत्साहनाचा लाभ अनुज्ञेय राहील. दोन्ही लाभ एकत्रितपणे अनुदेय राहणार नाहीत.

**(iv) एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) साठी प्रोत्साहने**

राज्यातील पात्र ODOP घटक म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या "एक जिल्हा एक उत्पादन" उपक्रमांतर्गत संबंधित जिल्ह्यांत अधिकृतरित्या निर्दिष्ट उत्पादनांच्या उत्पादन अथवा प्रक्रियेत गुंतलेली घटक असतील. अशा पात्र ODOP घटकांना संयंत्र व यंत्रसामग्रीतील स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १०% अतिरिक्त प्रोत्साहनांचा लाभ हा स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १२०% च्या मर्यादेच्या अधीन अनुज्ञेय करण्यात येईल.

**४.१.३ क) शाश्वतता व उत्कृष्ठतेसाठी प्रोत्साहने**

**i) हरित प्रोत्साहने**

हरित प्रोत्साहने हे उद्योगांना त्यांच्या उत्पादन प्रक्रियेत पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत तंत्रज्ञान आणि पद्धतींचा अवलंब करण्यास मदत करण्यासाठी दिले जाणारे आर्थिक प्रोत्साहने आहे.

- विशाल व अतिविशाल प्रकल्पांना, त्यांच्या उत्पादन प्रक्रियेत हरित तंत्रज्ञान अवलंबल्यास त्या तंत्रज्ञान खर्चाच्या २५% इतकी प्रतिपूर्ती कमाल ₹१० कोटी मर्यादेत यापैकी जे कमी असेल ते अनुज्ञेय राहील.
- राष्ट्रीय उत्पादन धोरण-२०११ नुसार, हरित तंत्रज्ञान म्हणजे असे तंत्रज्ञान जे महत्त्वपूर्ण ऊर्जा कार्यक्षमतेत लक्षणीय सुधारणा, संसाधनांचा शाश्वत वापर किंवा पर्यावरण संरक्षण उपायांमुळे नकारात्मक पर्यावरणीय परिणाम कमी करते.
- यासाठी उद्योग, गुंतवणूक व सेवा विभागामार्फत स्वतंत्र तपासणी यादी व संबंधित मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येतील.

**ii) सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापरासाठी आर्थिक प्रोत्साहने**

शाश्वत जल व्यवस्थापन आणि चक्रीय अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी, राज्य शासन औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर यंत्रणा स्थापनेसाठी खालीलप्रमाणे आर्थिक प्रोत्साहने प्रदान करेल.

- **भांडवली सहाय्य:** एमआयडीसी क्षेत्रे, औद्योगिक वसाहती/पार्क्स आणि सहकारी वसाहतींमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ETPs), सामायिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (CETPs) आणि मलशुद्धीकरण प्रक्रिया प्रकल्प (STPs) उभारण्यासाठी भांडवली खर्चाच्या २५% पर्यंत भांडवली अनुदान दिले जाईल. हे अनुदान रु. ५ कोटी किंवा भांडवली गुंतवणुकीच्या २५%, यापैकी जे कमी असेल त्या मर्यादेत अनुज्ञेय करण्यात येईल. यासाठी घटकाने वापरलेल्या औद्योगिक पाण्यापैकी किमान २५% पाणी पूनर्वापर करणे बंधनकारक राहील.

- **शून्य द्रव विसर्जनाकरीता प्रोत्साहने**: शून्य द्रव विसर्जन (ZLD) तंत्रज्ञान अवलंबणाऱ्या उद्योगांना २५% अतिरिक्त भांडवली अनुदान देण्यात येईल. ज्यामुळे पाण्याचे संवर्धन आणि पर्यावरणीय परिणाम कमी करण्यास मदत होईल.
- **हरित प्रमाणित उद्योगांसाठी प्रोत्साहने:** पाण्याचा पूनर्वापर करणाऱ्या आणि हरित प्रमाणित उद्योगांना जमीन वाटपामध्ये प्राधान्य व १०% अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक उपलब्ध दिला जाईल.
- **तृतीयक प्रक्रिया केलेले पाणी पुनर्वापर:** पुनर्वापरासाठी वचनबद्ध असलेल्या उद्योगांना तृतीयक प्रक्रिया केलेले पाणी ३ वर्षांच्या कालावधीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

**टीप:** पात्र घटकांना उच्चाधिकार समितीच्या शिफारशीनुसार मंत्रिमंडळ उपसमितीच्या मान्यतेच्या अधीन राहून स्थिर भांडवली गुंतवणुकीच्या १२०% पर्यंत एकत्रित प्रोत्साहनांचा लाभ घेता येईल.

**iii) कार्यक्रम सहभाग**

राज्य मान्यताप्राप्त उद्योग संघटनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय औद्योगिक शिखर परिषदा, कार्यशाळा, प्रदर्शने आणि नेटवर्किंग कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी सक्रियपणे प्रोत्साहन आणि सुविधा देईल. हे व्यासपीठ ज्ञानाची देवाणघेवाण करण्यास, धोरणात्मक सहकार्यांना चालना देण्यास आणि जागतिक आणि देशांतर्गत उद्योगांमधील संबंध मजबूत करण्यास सक्षम करतील. राज्य शासन अशा कार्यक्रमामध्ये सहभागी उद्योगांना पात्र खर्चाच्या ३०% पर्यंत परतावा देईल. यामध्ये सहभाग शुल्क, नोंदणी शुल्क आणि प्रचार साहित्य खर्च यांचा समावेश असेल. प्रति घटक देशांतर्गत कार्यक्रमांसाठी रु. ५ लाख आणि आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांसाठी रु. १० लाख या मर्यादेत प्रोत्साहन देण्यात येतील.

### ४.२ वित्तपुरवठा सुलभता वाढविणे

### ४.२.१ शासकीय संस्थांसाठी

### ४.२.१ (अ) निर्णायक औद्योगिक पायाभूत सुविधा निधी(CIIF)

- महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण २०२५ अंतर्गत, निर्णायक औद्योगिक पायाभूत सुविधा निधी हा एक धोरणात्मक उपक्रम असून, एमआयडीसी आणि बिगर एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा अद्ययावत करण्याचे उद्दिष्ट आहे. बिगर एमआयडीसी औद्योगिक क्षेत्रातील पायाभूत सुविधा निर्मिती आणि विकास करण्यासाठी निधीचे व्यवस्थापन एमआयडीसी कडून करण्यात येईल. ही योजना विशेषतः एमएसएमई, औद्योगिक क्षेत्रे/पार्क्स व प्रादेशिक समूह यांच्यासाठी लाभदायक ठरेल.
- या उपक्रमाचे उद्दीष्ट राज्यातील सर्व विद्यमान तसेच प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रे जसे की संरक्षण कॉरिडॉर यांना एकत्रित करणे असा आहे. ज्यात ३ महत्वाच्या कॉरिडॉरवर लक्ष केंद्रीत केले जाईल.
  - कॉरिडॉर १ –पुणे, अहिल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगर
  - कॉरिडॉर २ – नागपूर, वर्धा, अमरावती आणि सावनेर
  - कॉरिडॉर ३ – नाशिक आणि धुळे
- दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर (DMIC), बंगळुरू-मुंबई आर्थिक कॉरिडॉर (BMEC), दिल्ली-नागपूर आर्थिक कॉरिडॉर (DNEC) यांसह पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी या निधीचा वापर करण्यात येईल.
- एमआयडीसीद्वारे विकसित केले जाणाऱ्या फार्मा सिटी करीता निर्णायक औद्योगिक पायाभूत सुविधा निधीमधून निधी उपलब्ध करून दिला जाईल.
- एमआयडीसी क्षेत्रामध्ये या निधीचा वापर विशेषतः माल व सेवा वाहतुकीसाठी आवश्यक लास्ट माईल कनेक्टिव्हिटी पायाभूत सुविधांवर केला जाईल तसेच एमआयडीसी अधिसूचित क्षेत्राबाहेरील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी देखील हा निधी उपलब्ध करून दिला जाईल.
- गडचिरोली-चंद्रपूर स्टील कॉरिडॉर आणि बुटीबोरी येथील ग्रीन कॉरिडॉर यांच्या विकासासाठी हा निधी उपलब्ध करून दिला जाईल.

- एमआयडीसी क्षेत्रांमधील उद्योगांना रस्ते, वीज आणि पाणीपुरवठा यासारख्या आवश्यक पायाभूत सुविधा ह्या एमआयडीसीकडून पुरविल्या जातात, परंतु बिगर- एमआयडीसी क्षेत्रातील उद्योगांना अनेकदा अपुऱ्या सुविधांचा सामना करावा लागतो, ज्यामुळे उत्पादकता आणि विकासावर परिणाम होतो. या आव्हानांना तोंड देण्यासाठी राज्य शासन रु. ५००० कोटी निधी राखून ठेवेल. या निधीअंतर्गत रस्ते जोडणी, समर्पित वीज पुरवठा, जलसंपत्ती, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (STP), औद्योगिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (ETP) आणि लास्ट माईल कनेक्टिव्हिटी यासारख्या आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. हा निधी उभारण्यासाठी अशियाई विकास बँक (ADB), जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य अभिकरण (JICA) इ. बहुपक्षीय संस्थाना सहभागी करून घेतले जाईल.
- प्रभावी अंमलबजावणीसाठी, निर्णायक औद्योगिक पायाभूत सुविधा निधी संरचित आर्थिक सहाय्यता यंत्रणेव्दारे व्यवस्थापित केला जाईल, ज्यावरुन राज्य प्रकल्प प्रकार व स्थानानुसार ५०% ते १००% पर्यंत खर्चाचे योगदान देईल. अंमलबजावणी यंत्रणांमध्ये PWD, MIDC, MSEDCL, MSETCL, रेल्वे व प्रादेशिक विकास प्राधिकरण यांचा समावेश असेल. या यंत्रणा पायाभूत सुविधा नियोजन, निधी वापर व अंमलबजावणीवर देखरेख करतील. सहकारी औद्योगिक वसाहती/पार्क्स, खाजगी औद्योगिक क्षेत्रे / पार्क्स, लॉजिस्टिक हब / पार्क्स आणि विशेष क्षेत्रीय पार्क्स इत्यादींना या निधीतून आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. या बाबी विचारात घेता, औद्योगिक पायाभूत सुविधांच्या निर्मिती आणि विकास या विद्यमान योजनेत आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील.

### ४.२.१ (ब) औद्योगिक पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी व्यवहार्यता तफावत निधी (VGF)

नंदुरबार, वाशिम, धाराशिव, हिंगोली आणि गडचिरोली सारख्या आकांक्षी जिल्हे आणि विना-उद्योग जिल्ह्यांमध्ये औद्योगिक पायाभूत सुविधांच्या विकासाला चालना देण्यासाठी, राज्य शासन व्यवहार्यता तफावत निधी (VGF) योजना सुरू करण्यात येईल. या उपक्रमाद्वारे औद्योगिक पार्क्स, समूह-आधारित विकास, लॉजिस्टिक्स आणि वेअरहाऊसिंग हब, नवीकरणीय ऊर्जा व हरित हायड्रोजन प्रकल्प तसेच औद्योगिक पाणी व वीज पुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांसाठी पात्र प्रकल्पांकरीता एकूण प्रकल्प खर्चाच्या ३०% पर्यंत आर्थिक सहाय्य प्रदान करण्यात येईल. ही योजना सार्वजनिक-खाजगी भागीदारी (PPP) मॉडेल्सना, विशेषतः हायब्रिड ॲन्युइटी मॉडेल (HAM) आणि बांधा-वापरा-हस्तांतरण (BOT) चौकटीला प्राधान्य देण्यात येईल. वितरण एका मैलाचा दगड-आधारित दृष्टिकोनाचे अनुसरण करेल. यामध्ये निधी वितरण आर्थिक समाप्तीपासून सुरू होऊन रोजगार निर्मिती, उत्पादन क्षमता आणि पर्यावरणीय, सामाजिक आणि प्रशासन (ESG) अनुपालन यासारख्या निर्देशकांचा विचार करण्यात येईल.

अखंड सह-निधी सक्षम करण्यासाठी व्यवहार्यता तफावत निधीचे आराखडे भारत सरकारच्या योजनेशी सुसंगत करण्यात येतील. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव यांच्या अध्यक्षतेखालील एक राज्य वित्तीय टास्क-फोर्स अंमलबजावणीवर देखरेख करेल. भारतीय लघु उद्योग विकास बँक (SIDBI), राष्ट्रीय कृषी आणि ग्रामीण विकास बँक (NABARD), बँक ऑफ महाराष्ट्र (BoM), महाराष्ट्र ग्रामीण बँक (MGB) आणि महाराष्ट्र सहकारी विकास महामंडळ लिमिटेड (MCDC) या सारख्या संस्थांच्या भागीदारीत आर्थिक प्रवेश आणि कामगिरीचे निरीक्षण सुलभ करण्यात येईल.

### ४.२.२ उपक्रमांसाठी

### ४.२.२ (अ) समर्पित संशोधन व विकास निधी

राज्य शासन नवोन्मेष-चालित औद्योगिक परिसंस्थेला चालना देण्यासाठी आणि भविष्यातील तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्यासाठी एक समर्पित संशोधन आणि विकास निधी स्थापन करेल. भारताची संशोधन आणि विकासाची राजधानी बनण्याचे महाराष्ट्र राज्याचे उद्दिष्ट आहे. राज्य शासन उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये संशोधन आणि विकास खर्चासाठी सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या ०.२-०.३% खर्च करते. राज्याने हा खर्च आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये सकल राज्य देशांतर्गत उत्पादनाच्या ०.८%, आर्थिक वर्ष २०३५-३६ मध्ये १.५% आणि शेवटी आर्थिक वर्ष २०४७-४८ मध्ये २.५% पर्यंत वाढवण्याची योजना आखली आहे. याकरीता रु. १,००० कोटींचा निधी केवळ संशोधन आणि विकास उपक्रमांसाठी राखून ठेवण्यात येईल. एकूण निधीपैकी रु.७०० कोटी इतका निधी उत्पादन क्षेत्रातील घटकांसाठी आणि उर्वरित रु.३०० कोटी इतका निधी सेवा क्षेत्रातील घटकांसाठी

राखीव ठेवला जाईल. प्रत्येक पात्र उत्पादन घटकाला रु. ३० कोटी किंवा एकूण संशोधन आणि विकास खर्चाच्या ५०%, जे कमी असेल ते, १० समान हप्त्यांमध्ये मिळण्यास पात्र असेल आणि एकूण वार्षिक उलाढालीच्या २% किमान संशोधन आणि विकास गुंतवणूक करणे आवश्यक आहे. हा निधी हा निधी नॉन लॅप्सेबल स्वरुपाचा असेल तसेच या निधीचा वापर औद्योगिक संशोधन आणि तांत्रिक प्रगतीचे केंद्र म्हणून महाराष्ट्राचे स्थान मजबूत करण्यासाठी वापरला जाईल.

**४.२.२ (ब) महाराष्ट्रातील एमएसएमईसाठी वित्तपुरवठ्याचे बळकटीकरण:**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये कर्ज उपलब्धता वाढविण्यासाठी, खेळत्या भांडवलातील आव्हाने कमी करण्यासाठी आणि आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी, राज्य शासन राज्यभर बँकिंग आणि वित्तीय संबंध मजबूत करण्यासाठी एक बहुआयामी धोरण राबवणार आहे.

i. **सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी कर्ज हमी निधी ट्रस्ट (CGTMSE)** : राज्य शासन सूक्ष्म व लघु उद्योगांसाठी कर्ज हमी निधी ट्रस्ट सोबत सहकार्य करेल जेणेकरून महिला उद्योजक, अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती नेतृत्वाखालील उद्योग आणि झोन-१ मधील उदयोन्मुख जिल्ह्यांमधील घटकांना तारणमुक्त कर्ज मिळू शकेल. हमी कव्हरेज ८५% पर्यंत वाढवण्यासाठी रु. २०० कोटींची अर्थसंकल्पीय तरतूद केली जाईल. सूक्ष्म व लघु उद्योगांवरील आर्थिक जोखीम कमी करण्यासाठी यामध्ये अतिरिक्त १०% राज्य-समर्थित कव्हरेज, नॉन-परफॉर्मिंग ॲसेट (NPA) पातळींवर आधारित पातळीवर निधी वितरित केले जाईल.

ii. **डिजिटल व समभाग वित्तपुरवठा बळकटीकरण करणे** : एमएसएमईंकरीता तरलता व भांडवलाची उपलब्धता वाढविण्यासाठी, राज्य शासन RXIL, M1xchange व Invoicemart यांसारख्या ट्रेड रिसीवेबल्स डिस्काउंटिंग सिस्टिम (TReDS) स्वीकारण्यास प्रोत्साहन देईल. यासंदर्भात प्रशिक्षण, जनजागृती मोहीमा व शासकीय खरेदी प्रणालींचे एकत्रिकरण करण्यात येईल. राज्य शासन सर्व शासकीय विभाग, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम तसेच वार्षिक उलाढाल रु.१०० कोटीपेक्षा जास्त असलेल्या कंपन्यांसाठी TReDS प्रणालीवर नोंदणी करणे अनिवार्य केली जाईल. रु.५ लाखांवरील प्रलंबित देयके TReDS प्रणालीव्दारे निकाली काढली जातील. सदर देयके निकाली काढण्याकरीता देय तारखेपासून ४५ दिवसांपेक्षा अधिक विलंब झाल्यास दंड लागू केला जाईल. एमएसएमई उपक्रमांना सवलतीच्या शुल्कावर ०.२५% अनुदान प्रदान करण्यात येईल.

तसेच BSE-SME व NSE-SME प्लॅटफॉर्मद्वारे एमएसएमईंसाठी समभाग वित्तपुरवठा सुलभ करण्यासाठी राज्य शासनाने फेब्रुवारी २०२४ मध्ये केलेल्या सामंजस्य करारानुसार तांत्रिक सहाय्य, आर्थिक साक्षरता कार्यक्रम आणि सूचीकरण शुल्क परतावा उपलब्ध करुन देईल. SME भांडवल बाजार परिसंस्था मजबूत करण्यासाठी गुंतवणूकदारांपर्यंत पोहोच आणि नेटवर्किंग उपक्रम देखील हाती घेतले जातील.

iii. देयक विलंब सोडवण्यासाठी आणि कायदेशीर मार्ग मजबूत करण्यासाठी, मुंबई, ठाणे, पुणे आणि नागपूर यासारख्या उच्च घनतेच्या जिल्ह्यांमध्ये **सूक्ष्म आणि लघु उद्योग सुविधा परिषद (MSEFC)** चा विस्तार केला जाईल.

iv. **मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचे (CMEGP) सुदृढीकरण** : उत्पादनासाठी रु. ५० लाख किमतीच्या प्रकल्पांसाठी CMEGP योजनेतील आर्थिक सहाय्य मर्यादा रु. १ कोटी आणि सेवांसाठी रु. २० लाखांवरून रु. ५० लाख पर्यंत वाढविण्यात येईल.

v. **महाराष्ट्र राज्य औद्योगिक समुह विकास कार्यक्रम (MSI-CDP) चे बळकटीकरण**: राज्यातील औद्योगिक समुहामध्ये सामायिक सुविधा केंद्र उभारणीसाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक समुह विकास कार्यक्रम (MSI-CDP) अंतर्गत देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्य मर्यादेत रु. १० कोटी वरून रु. २० कोटी पर्यंत वाढ केली जाईल.

vi. **RAMP (Raising and Accelerating MSME Performance) कार्यक्रमाशी एकात्मता**: महाराष्ट्र राज्य बाजारपेठेतील प्रवेश, कर्ज उपलब्धता, संस्थात्मक पाठिंबा, प्रशासन आणि केंद्र-राज्य भागीदारी वाढविण्यासाठी आणि प्रलंबित देयके निकाली काढण्यासाठी आणि हरित एमएसएमईंना प्रोत्साहन देण्यासाठी RAMP कार्यक्रमाशी जुळवून घेईल. १० वर्षांच्या पथदर्शी आराखड्यासह, राज्याचे उद्दिष्ट शाश्वत आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक एमएसएमई विकसित करण्याचे आहे. या उपक्रमाला पाठिंबा देण्यासाठी, RAMP अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारच्या निधीच्या प्रमाणात राज्य शासनाकडून अनुदान देण्यात येईल.

### ४.२.२ (क) उत्पादकता आणि आधुनिकीकरण वर्धन निधी (PEF)

MITRA, SICOM, MSSIDC, KVIB, MSFC, बहुपक्षीय संस्था आणि बँकांच्या भागीदारीत थ्रस्ट क्षेत्रांसाठी उत्पादकता आणि आधुनिकीकरण वर्धन निधी (PEF) स्थापन केला जाईल. यामुळे अ-प्रमाणित उत्पादनामुळे (Non-standardized Production) वारंवार पुनर्बांधणीची आवश्यकता असलेल्या उद्योगांसाठी खेळते भांडवल उपलब्ध होण्यास मदत होईल. उत्पादन असेंब्ली लाइनमध्ये बदल आणि आधुनिकीकरण करण्यासाठी भांडवलाची कमतरता असलेल्या एमएसएमईंवर हा निधी लक्ष केंद्रित करेल. यामुळे एमएसएमई स्पर्धात्मक, गतिमान आणि देशांतर्गत आणि जागतिक अर्थव्यवस्थेवर परिणाम करणाऱ्या बदलांसाठी सक्रिय असतील याची खात्री होईल. हा निधी एका प्रतिष्ठित बँकेद्वारे व्यवस्थापित केला जाईल ज्याची निवड पारदर्शक बोली प्रक्रियेद्वारे (Bid Process) केली जाईल.

### ४.२.२ (ड) स्टार्टअपसाठी निधी

राज्यातील प्रारंभिक टप्प्यातील स्टार्टअप्सना पाठिंबा देण्यासाठी राज्य, बीज निधी (Seed Funding) उपलब्ध करून देईल, ज्यामध्ये नाविन्यपूर्ण आणि वाढत्या व्यवसाय कल्पनांना प्राधान्य देणाऱ्या स्टार्टअप्सना स्पर्धात्मक निवड प्रक्रियेद्वारे अनुदान दिले जाईल. पारंपरिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नवोन्मेष आणि उद्योजकता वाढविण्यासाठी राज्य, दरवर्षी राज्यस्तरीय हॅकेथॉन आयोजित करेल. या उपक्रमांतर्गत ओळखल्या जाणाऱ्या प्रथम १० नाविन्यपूर्ण कल्पना किंवा स्टार्टअप्सना पुरस्कार आणि मान्यता दिली जाईल. याव्यतिरिक्त, निर्यात प्रोत्साहन कार्यक्रम, व्यापार सुविधा उपक्रम आणि बाजार विकास योजनांद्वारे नवीन बाजारपेठांमध्ये विस्तार करण्यासाठी स्टार्टअप्सना पाठिंबा दिला जाईल. पात्र स्टार्टअप घटकांना महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवोन्मेष धोरण, २०२५ अंतर्गत नमूद केलेल्या तरतुदींनुसार लाभ मिळतील.

## जोडपत्रे

## जोडपत्र १: तालुका/क्षेत्रांचे वर्गीकरण

**१. कोंकण विभाग**

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
|---|---|---|---|---|---|
| बृहन्मुंबई शहर | बृहन्मुंबई | | | | |
| ठाणे | ठाणे<br>कल्याण<br>उल्हासनगर<br>अंबरनाथ<br>भिवंडी @ | मुरबाड | भिवंडी $ शहापूर | | |
| पालघर | वसई<br>पालघर | डहाणू | | | जव्हार<br>मोखाडा<br>तलासरी<br>वाडा<br>विक्रमगड |
| रायगड | अलिबाग @<br>उरण<br>पनवेल<br>कर्जत @<br>खालापूर<br>पेण<br>रोहा | अलिबाग $<br>सुधागड | कर्जत $<br>महाड<br>माणगांव<br>मुरुड | श्रीवर्धन | पोलादपूर<br>म्हासळा<br>तळा |
| रत्नागिरी | | | रत्नागिरी<br>चिपळूण | खेड | गुहागर<br>दापोली<br>लांजा<br>मंडणगड<br>राजापूर<br>संगमेश्वर |
| सिंधुदूर्ग | | | | वेंगुर्ला | कणकवली<br>कुडाळ<br>सावंतवाडी<br>मालवण<br>देवगड<br>वैभववाडी<br>दोडा मार्ग |

मुंबई महानगर प्रदेश/ मुंबई महानगर प्रदेशाबाहेरील वर्गवारी दि.०१ एप्रिल, २०१९ पासून लागू असून महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ च्या कालावधीकरीता वैध राहील.

@: मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील

$: मुंबई महानगर प्रदेशाबाहेरील क्षेत्र

**२. पुणे विभाग**

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
|---|---|---|---|---|---|
| पुणे | पुणे शहर<br>मावळ<br>हवेली @<br>भोर @<br>दौंड @<br>शिरुर @<br>खेड @<br>मुळशी @<br>पुरंदर @<br>वेल्हे @ | | शिरुर $<br>दौंड $<br>भोर $<br>खेड $<br>इंदापूर<br>बारामती<br>पुरंदर $ | आंबेगांव<br>जुन्नर | वेल्हे $ |
| सोलापूर | | | | सोलापूर (उत्तर)<br>पंढरपूर<br>माळशिरस | बार्शी<br>अक्कलकोट<br>सोलापूर (दक्षिण)<br>मोहोळ<br>मंगळवेढा<br>सांगोला<br>करमाळा<br>माढा |
| सातारा | | | | सातारा<br>खंडाळा<br>कोरेगांव<br>फलटण<br>खटाव<br>कराड<br>महाबळेश्वर | वाई<br>माण<br>पाटण<br>जावळी |
| सांगली | | | | मिरज | तासगांव<br>खानापूर<br>आटपाडी<br>जत<br>कवठे महांकाळ<br>वाळवा<br>शिराळा<br>कडेगांव<br>पलूस |
| कोल्हापूर | | | | करवीर<br>पन्हाळा<br>हातकणंगले<br>शिरोळ | कागल<br>गडहिंगलज<br>चंदगड<br>आजरा<br>भुदरगड<br>राधानगरी<br>बावडा<br>शाहूवाडी |

पुणे महानगर प्रदेश/ पुणे महानगर प्रदेशाबाहेरील वर्गवारी दि.०१ एप्रिल, २०१९ पासून लागू असून महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण-२०२५ च्या कालावधीकरीता वैध राहील. @: पुणे महानगर प्रदेश क्षेत्रातील $: पुणे महानगर प्रदेशाबाहेरील क्षेत्र.

**३. नाशिक विभाग**

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
|---|---|---|---|---|---|
| नाशिक | | नाशिक | निफाड<br>सिन्नर | दिंडोरी<br>येवला<br>इगतपूरी | पेठ<br>सुरगणा<br>कळवण<br>बागलाण<br>चांदवड<br>नांदगांव<br>त्र्यंबकेश्वर<br>देवळा<br>मालेगांव |
| अहिल्यानगर | | | | नगर<br>राहूरी<br>श्रीरामपूर<br>नेवासा<br>कर्जत<br>श्रीगोंदा<br>अकोले<br>संगमनेर<br>कोपरगांव<br>रहाता | शेवगांव<br>पाथर्डी<br>जामखेड<br>पारनेर |
| धुळे | | | | धुळे | साक्री<br>शिरुर<br>सिंदखेडा |
| नंदूरबार | | | | | नंदूरबार<br>नवापूर<br>शहादा<br>तळोदा<br>अक्रणी<br>अक्कलकुवा |
| जळगांव | | | | | जळगांव<br>यावल<br>चाळीसगांव<br>अमळनेर<br>धरणगांव<br>चोपडा<br>रावेर<br>मुक्ताईनगर<br>भुसावळ<br>जामनेर<br>पाचोरा<br>भडगांव<br>परोळा<br>एरंडोल<br>बोदवड |

### ४. छत्रपती संभाजीगर विभाग

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
|---|---|---|---|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | | | | छत्रपती संभाजीनगर | खुलदाबाद<br>कन्नड<br>सोयगांव<br>सिल्लोड<br>पैठण<br>गंगापूर<br>वैजापूर<br>फुलंब्री |
| जालना | | | | | जालना<br>अंबड<br>जाफराबाद<br>परतूर<br>भोकरदन<br>बदनापूर<br>घनसावंगी<br>मंठा |
| बीड | | | | | बीड<br>गेवराई<br>माजलगांव<br>अंबेजोगाई<br>केज<br>पाटोदा<br>आष्टी<br>धारुर<br>परळी<br>वाढवणी<br>शिरुर कासार |
| धाराशिव | | | | | धाराशिव<br>कळंब<br>उमरगा<br>तुळजापूर<br>परांडा<br>भूम<br>वाशी<br>लोहारा |
| परभणी | | | | | परभणी<br>जिंतूर |

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | सेलू<br>गंगाखेड<br>पाथ्री<br>पालम<br>पूर्णा<br>मानवत<br>सोनपेठ |
| हिंगोली | विना उद्योग जिल्हा | | | | |
| लातूर | | | | | लातूर<br>अहमदपूर<br>उदगीर<br>निलंगा<br>औसा<br>चाकूर<br>देवणी<br>शिरुर- अनंतपाल<br>जळकोट<br>रेणापूर |
| नांदेड | | | | | नांदेड<br>भोकर<br>हदगांव<br>किनवट<br>बिलोळी<br>देगलूर<br>मुखेड<br>कंधार<br>लोहा<br>मुदखेड<br>अर्धापूर<br>नायगांव<br>धर्माबाद<br>हिमायतनगर<br>उमरी<br>माहूर |

**५. अमरावती विभाग**

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
|---|---|---|---|---|---|
| अमरावती | | | | | अमरावती<br>अचलपूर<br>भातकुली<br>नांदगांव खंडेश्वर<br>चांदूर बाजार<br>मोर्शी<br>वरुड<br>चांदूर रेल्वे<br>तिवसा<br>दर्यापूर<br>अंजनगांव सुर्जी<br>चिखलदरा<br>धारणी<br>धामणगांव रेल्वे |
| अकोला | | | | | अकोला<br>बार्शीटाकळी<br>अकोट<br>तेल्हारा<br>बाळापूर<br>पातूर<br>मूर्तीजापूर |
| वाशिम | | | | | वाशिम<br>मालेगांव<br>रिसोड<br>मंगळूरपीर<br>मानोरा<br>कारंजा |
| बुलढाणा | | | | | बुलढाणा<br>चिखली<br>शेगांव<br>देऊळगांव राजा<br>मलकापूर<br>मोताळा<br>नांदूरा<br>जळगांव जामोद<br>संग्रामपूर<br>खामगांव<br>मेहकर<br>सिंदखेड-राजा<br>लोणार |

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| यवतमाळ | | | | | यवतमाळ<br>बाभूळगांव<br>कळंब<br>केळापूर<br>राळेगांव<br>घाटंजी<br>वणी<br>मारेगांव<br>पुसद<br>महागांव<br>उमरखेड<br>दारव्हा<br>नेर<br>दिग्रस<br>आर्णी<br>झरी-जामणी |

**६. नागपूर विभाग**

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| नागपूर | | | | नागपूर शहर | नागपूर (ग्रामीण)<br>कामठी<br>हिंगणा<br>काटोल<br>नरखेड<br>सावनेर<br>कळमेश्वर<br>रामटेक<br>पारशिवनी<br>मौदा<br>उमरेड<br>भिवापूर<br>कुही |
| भंडारा | | | | | भंडारा<br>पवनी<br>तुमसर<br>मोहाडी<br>साकोली<br>लाखांदूर<br>लाखनी |

| जिल्हा | गट अ | गट ब | गट क | गट ड | गट ड+ |
|---|---|---|---|---|---|
| गोंदिया | | | | | गोंदिया<br>गोरेगांव<br>तिरोडा<br>अर्जुनी-मोरगांव<br>देवरी<br>सडक अर्जुनी<br>आमगांव<br>सालेकसा |
| वर्धा | | | | | वर्धा<br>देवळी<br>सेलू<br>आर्वी<br>कारंजा<br>आष्टी<br>हिंगणघाट<br>समुद्रपूर |
| चंद्रपूर | | | | | चंद्रपूर<br>गोंडपिंपरी<br>मुल<br>वरोरा<br>चिमूर<br>भद्रावती<br>ब्रम्हपुरी<br>सिंदेवाही<br>नागभीड<br>राजूरा<br>कोरपना<br>सावली<br>पोम्भूर्णा<br>बल्लारपूर<br>जिवती |
| गडचिरोली | विना उद्योग जिल्हा | | | | |

## जोडपत्र २: सेवा क्षेत्र वर्गीकरण

**(नीती आयोगाचे कार्यपत्र - संभाव्य सेवा उप-क्षेत्रांची ओळख: जीव्हीए, निर्यात आणि रोजगार डेटामधील अंतर्दृष्टी)**

| अ.क्र. | वर्गीकरण | तपशील |
|---|---|---|
| १. | संगणक आणि माहिती सेवा | यामध्ये हार्डवेअर कन्सल्टन्सी, सॉफ्टवेअर अंमलबजावणी, माहिती सेवा (डेटा प्रोसेसिंग, डेटा बेस, वृत्तसंस्था), आणि संगणक आणि संबंधित उपकरणांची देखभाल आणि दुरुस्ती यांच्याशी संबंधित निवासी/अनिवासी व्यवहारांचा समावेश आहे. |
| २. | व्यावसायिक, वैज्ञानिक आणि व्यवसाय सेवा (संशोधन आणि विकासासह) | संशोधन आणि विकास सेवांमध्ये पेटंट विक्रीसह विविध क्षेत्रांमध्ये मूलभूत आणि उपयोजित संशोधन, प्रायोगिक विकास आणि व्यावसायिक संशोधन समाविष्ट आहे. व्यावसायिक आणि व्यवस्थापन सल्लागार सेवांमध्ये कायदेशीर, लेखा, सल्लागार, जाहिरात आणि बाजार संशोधन समाविष्ट आहे, तर उत्पादन सेवांमध्ये शुल्क आकारून इतरांच्या मालकीच्या वस्तूंवर प्रक्रिया आणि असेंब्ली समाविष्ट आहे. |
| ३. | विमा आणि पेन्शन सेवा | विमा आणि पेन्शन सेवांमध्ये Life and Non-life Insurance, वार्षिकी, पुनर्विमा, मालवाहतूक विमा, पेन्शन, प्रमाणित हमी आणि संबंधित सहाय्यक सेवांचा समावेश आहे. |
| ४. | व्यापार आणि दुरुस्ती | यामध्ये हे समाविष्ट आहे: (अ) स्थापत्य, अभियांत्रिकी आणि इतर तांत्रिक सेवा; (ब) कचरा प्रक्रिया आणि प्रदूषण, कृषी आणि खाण सेवा; (क) ऑपरेटिंग लीजिंग सेवा; (ड) व्यापार-संबंधित सेवा; आणि (इ) इतर व्यवसाय सेवा SB<br>दुरुस्ती आणि दुरुस्ती सेवा, ज्यामध्ये इतरत्र समाविष्ट नाही, त्यामध्ये रहिवाशांनी अनिवासी मालकीच्या वस्तूंवर केलेल्या दुरुस्तीच्या कामाचा समावेश आहे आणि त्याउलट, साइटवर किंवा इतरत्र केलेल्या दुरुस्तीच्या कामाचा समावेश आहे. यामध्ये जहाजे, विमाने आणि इतर वाहतूक उपकरणांची दुरुस्ती समाविष्ट आहे, परंतु बांधकामाधीन असलेल्या बांधकामाशी संबंधित देखभाल आणि दुरुस्ती वगळण्यात आल्या आहेत. |
| ५. | शिक्षण सेवा | शैक्षणिक सेवा (उदा., भारतीय संस्थांकडून अनिवासी लोकांना दिल्या जाणाऱ्या पत्रव्यवहार अभ्यासक्रमांसाठी मिळणारे शुल्क) |
| ६. | वित्तीय सेवा | वित्तीय सेवांमध्ये बँका आणि वित्तीय संस्थांद्वारे प्रदान केलेल्या मध्यस्थ आणि सहाय्यक सेवांचा समावेश आहे, जसे की ठेवी घेणे, कर्ज देणे, आर्थिक सल्लागार, मालमत्ता व्यवस्थापन, क्रेडिट रेटिंग आणि पेमेंट क्लिअरिंग, विमा आणि पेन्शन सेवा वगळून. |
| ७. | प्रवास आणि पर्यटन सेवा | प्रवास सेवांमध्ये एका वर्षापेक्षा कमी कालावधीच्या प्रवासादरम्यान प्रवाशांनी अर्थव्यवस्थेतून मिळवलेल्या वस्तू आणि सेवांचा समावेश होतो. पर्यटन सेवांमध्ये ट्रॅव्हल एजन्सीजद्वारे प्रदान केलेल्या सेवा आणि आतिथ्य सेवांचा समावेश होतो. यामध्ये वैद्यकीय आणि निरोगी पर्यटनाचा समावेश होतो. |
| ८. | आरोग्य सेवा | आरोग्य सेवा (भारतीय रुग्णालये, डॉक्टर, परिचारिका, पॅरामेडिकल आणि तत्सम सेवा इत्यादींद्वारे दूरस्थपणे किंवा प्रत्यक्ष जागेवर प्रदान केलेल्या सेवांबद्दलच्या पावत्या) |
| ९ | वैयक्तिक, सांस्कृतिक, मनोरंजनात्मक सेवा | वैयक्तिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक सेवा i) मनोरंजन सेवा ii) संग्रहालये, ग्रंथालय आणि अभिलेखागार सेवा iii) मनोरंजन आणि क्रीडा क्रियाकलाप सेवा vi) इतर वैयक्तिक, सांस्कृतिक आणि मनोरंजनात्मक सेवा |

| अ.क्र. | वर्गीकरण | तपशील |
|---|---|---|
| १०. | वाहतूक आणि लॉजिस्टीक्स सेवा | वाहतूक सेवांमध्ये समुद्र, हवाई, रेल्वे, रस्ते, अंतर्गत जलमार्ग, पाइपलाइन, अंतराळ वाहतूक आणि वीज ट्रान्समिशन यासारख्या विविध मार्गांनी लोक आणि वस्तूंची वाहतूक समाविष्ट आहे. यामध्ये प्रवासी आणि मालवाहतूक सेवा दोन्ही समाविष्ट आहेत. |
| ११. | दृक-श्राव्य आणि संबंधित सेवा | दृक-श्राव्य आणि संबंधित सेवांमध्ये मोशन पिक्चर्स (चित्रपट, व्हिडिओ टेप, डिस्क किंवा इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्रसारित केलेले, इ.), रेडिओ आणि टेलिव्हिजन कार्यक्रम (लाइव्ह किंवा टेपवर), आणि संगीत रेकॉर्डिंगच्या निर्मितीशी संबंधित सेवा आणि शुल्क समाविष्ट आहे. |
| १२. | दूरसंचार सेवा | दूरसंचार सेवांमध्ये प्रतिष्ठापन आणि डेटाबेस सेवा वगळता, मोबाइल, इंटरनेट आणि प्रसारण सेवांसह विविध माध्यमांद्वारे ध्वनी, प्रतिमा, डेटा आणि माहितीचे प्रसारण समाविष्ट आहे. |

**जोडपत्र ३: एनएसडीसी अंतर्गत उल्लेखित ३६ क्षेत्रनिहाय कौशल्य परिषदा**

१) एरोस्पेस आणि एव्हिएशन सेक्टर स्किल कौन्सिल
२) ॲग्रीकल्चर स्किल कौन्सिल ऑफ इंडिया
३) परिधान बनवणे आणि होम फर्निचर क्षेत्र स्किल कौन्सिल
४) ऑटोमोटिव्ह स्किल्स डेव्हलपमेंट कौन्सिल
५) ब्युटी अँड वेलनेस सेक्टर स्किल कौन्सिल
६) बीएफएसआय सेक्टर स्किल कौन्सिल ऑफ इंडिया
७) कॅपिटल गुड्स स्किल कौन्सिल
८) कन्स्ट्रक्शन स्किल डेव्हलपमेंट कौन्सिल ऑफ इंडिया
९) डोमेस्टिक वर्कर्स सेक्टर स्किल कौन्सिल
१०) इलेक्ट्रॉनिक्स सेक्टर स्किल्स कौन्सिल ऑफ इंडिया
११) फूड इंडस्ट्री क्षमता आणि स्किल इनिशिएटिव्ह
१२) फर्निचर आणि फिटिंग्ज कौशल्य परिषद
१३) रत्न आणि दागिने कौशल्य परिषद ऑफ इंडिया
१४) हस्तकला आणि कार्पेट क्षेत्र कौशल्य परिषद
१५) आरोग्य सेवा क्षेत्र कौशल्य परिषद
१६) हायड्रोकार्बन क्षेत्र कौशल्य परिषद
१७) भारतीय लोह आणि स्टील क्षेत्र कौशल्य परिषद
१८) पायाभूत सुविधा उपकरणे कौशल्य परिषद
१९) इन्स्ट्रुमेंटेशन ऑटोमेशन सर्व्हेलन्स आणि कम्युनिकेशन क्षेत्र कौशल्य परिषद
२०) आयटी-आयटीईएस क्षेत्र कौशल्य परिषद
२१) लेदर क्षेत्र कौशल्य परिषद
२२) लाईफ सायन्सेस क्षेत्र कौशल्य विकास परिषद
२३) लॉजिस्टिक्स क्षेत्र कौशल्य परिषद
२४) व्यवस्थापन व उद्योजकता आणि व्यावसायिक कौशल्य परिषद (MEPSC)
२५) माध्यम आणि मनोरंजन कौशल्य परिषद
२६) पॉवर सेक्टर कौशल्य परिषद
२७) रिटेलर्स असोसिएशनची कौशल्य परिषद ऑफ इंडिया
२८) रबर, केमिकल आणि पेट्रोकेमिकल कौशल्य विकास परिषद
२९) ग्रीन जॉब्ससाठी कौशल्य परिषद
३०) माईनिंग सेक्टर कौशल्य परिषद
३१) अपंग व्यक्तींसाठी कौशल्य परिषद
३२) क्रीडा, शारीरिक शिक्षण, फिटनेस आणि फुरसतीचे कौशल्य परिषद
३३) टेलिकॉम सेक्टर कौशल्य परिषद
३४) टेक्सटाइल सेक्टर कौशल्य परिषद
३५) टुरिझम अँड हॉस्पिटॅलिटी कौशल्य परिषद
३६) वॉटर मॅनेजमेंट अँड प्लंबिंग कौशल्य परिषद

## जोडपत्र ४: संक्षेपाक्षरे

| | |
|---|---|
| BRAP | Business Reforms Action Plan |
| CETP | Common Effluent Treatment Plant |
| CFC | Common Facilities Centre |
| CGTMSE | Credit Guarantee Fund Trust for Micro and Small Enterprises |
| CMEGP | Chief Minister Employment Generation Programme |
| DCPR | Development Control and Promotion Regulations |
| EDTP | Entrepreneurial Development Training Program |
| EFC | Export Facilitation Cell |
| EoDB | Ease of Doing Business |
| EPI | Export Preparedness Index framework published by NITI Aayog |
| FCI | Fixed Capital Investment |
| FDI | Foreign Direct Investment |
| GDP | Gross Domestic Product |
| GI | Geographical Indication |
| GoI | Government of India |
| GoM | Government of Maharashtra |
| MAITRI | Maharashtra Industry, Trade & Investment Facilitation Cell |
| MIDC | Maharashtra Industrial Development Corporation |
| MLI | Member Lending Institutions |
| MMR | Mumbai Metropolitan region |
| MoMSME | Ministry of Micro, Small and Medium Enterprises |
| MSE | Micro and Small Enterprises |
| MSEFCs | Micro and Small Enterprises Facilitation Council |
| MSI-CDP | Maharashtra State Industrial Cluster Development Programme |
| MSKVIB | Maharashtra State Khadi and Village Industries Board |
| MSME | Micro, Small and Medium Enterprises |
| MSMED | Micro, Small, and Medium Enterprises Development |
| MSSDS | Maharashtra State Skill Development Society |
| MSSIDC | Maharashtra Small Scale Industries Development Corporation |
| NSDC | National Skill Development Corporation |
| ODOP | One District One Product |
| ONDC | Open Network for Digital Commerce |
| PCI | Per-Capita Income |
| PMR | Pune Metropolitan region |
| PPP | Public-Private Partnership |
| PSI | Package Scheme of Incentives, 2019 |
| R&D | Research & Development |
| SCP | Special Component Plan |
| SICOM | State Industrial and Investment Corporation of Maharashtra |
| SIDBI | Small Industries Development Bank of India |
| SLBC | State Level Bankers Committee |
| SLC | State Level Commitee |
| SOP | Standard Operating Procedures |
| SSC | Sector Skill Councils |